# <u>श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)</u>

## सभा क्र.१७/ २०१४
## दिनांक ०६.११.२०१४
## स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
## वेळ- दुपारी ०२.३० वाजता

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दिनांक ०६.११.२०१४ रोजी दुपारी ०२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३६८७/ २०१४, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१४ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक ०६.११.२०१४ रोजी दुपारी ०२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१ दिनांक ०९.१०.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.९२४** दिनांक **०९.१०.२०१४** रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.०२ दिनांक २१.१०.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.९२५** दिनांक **२१.१०.२०१४** रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **दिपावली सुट्टीचे कालावधीत तसेच डिसेंबर- २०१४ मधील नाताळ सुट्टीव नववर्षा निमित्ताने होणारे गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व**

**इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा उघडून त्यावर निर्णय घेणेबाबत. (रु.२,७८,१९२/-)**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट – कलम (१) च्या खंड (ख) अन्वये ''रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे'' या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (1) च्या खंड (ग) अन्वये ''भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा सामरंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे'' या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निणर्यः-**

दि.०९/१०/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र. ८९६ अन्वये याकामी येणा-या अंदाजे रु.२,७८,१९२/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.

**प्रस्तावना:-**

दिनांक २३ ऑक्टोंबर ,२०१४ ते दि.०६ नोव्हेंबर,२०१४ अखेर १५ दिवस दिपावली सणानिमित्त तसेच दिनांक २५ डिसेंबर ,२०१४ ते दि.०२ जानेवारी,२०१५ अखेर ०९ दिवस शैक्षणिक व इतर कार्यालयांना सुट्टया आहेत. या कालावधीत साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने, साईभक्तांचे सोयीसाठी मंदिर परिसरात एम.एस. पाईपचे स्ट्रक्चर असलेले ताडपत्रीचे छतासह कापडी मंडप, टाकणे आवश्यक बाब असल्याने याकामी येणारे अंदाजे रु.२,७८,१९२/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

दिपावली सणानिमित्त तसेच दिनांक २५ डिसेंबर ,२०१४ ते दि.०२ जानेवारी,२०१५ अखेर ०९ दिवस शैक्षणिक व इतर कार्यालयांना सुट्टया आहेत. या कालावधीत साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र ८९६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार याकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन को-या निविदा फॉर्मची विक्री दि.१५/१०/२०१४ ते दि.२०/१०/२०१४ अखेर व सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि.२०/१०/२०१४ अखेर ५ वाजेपर्यंत ठेवणेत आली होती. याकामी विहीत मुदतीत खालील मंडप ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

१. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, मु.संक्रापूर, पो.आंबी, ता. राहुरी

२. झुरळे टेन्ट हाऊस मंडप डेकोरेटर्स, मु.पो. निमगांव खैरी, ता. श्रीरामपूर जि.अ.नगर
३. न्यु बालाजी मंडप, मु.पो.निमोण, ता. चांदवड
४. जगदंबा मंडप लाईट डेकोरेटर्स, मु.पो. वावी, ता.सिन्नर
५. सह्याद्री स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत, मु.पो. कोतुळ, ता.अकोला

खालील मंडप ठेकेदारांनी विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेशन, मु.संक्रापूर, पो.आंबी, ता. राहुरी | १३६२७ | २०/१०/२०१४ |
| ०२ | न्यु बालाजी मंडप, मु.पो.निमोण, ता. चांदवड | १३६२८ | २०/१०/२०१४ |
| ०३ | जगदंबा मंडप लाईट डेकोरेटर्स, मु.पो. वावी, ता.सिन्नर | १३६२९ | २०/१०/२०१४ |
| ०४ | सह्याद्री स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत, मु.पो. कोतुळ, ता.अकोला | १३६२६ | २०/१०/२०१४ |

दिपावली व नाताळ सुट्टीमध्ये साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत समक्ष उघडणेत येऊन त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता बनविणेत आला.

**दिपावली मंडप दि.23 ऑक्टोंबर,2014 ते दि.06 नोव्हेंबर, 2014 अखेर 15 दिवस व**

**नाताळ मंडप दि.25 डिसेंबर,2014 ते दि.02 जानेवारी, 2015 अखेर 09 दिवस**

| अ.नं. | तपशील | रोशनी मंडप ण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर ता. राहुरी | न्यु बालाजी मंडप, निमोण, ता. चांदवड | जगदंबा मंडप लाईट डेकोरेटर्स, मु.पो.वावी | सह्याद्री स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत मु.पो. कोतुळ |
|---|---|---|---|---|---|
| | | **निविदेमधील दर** | **निविदेमधील दर** | **निविदेमधील दर** | **निविदेमधील दर** |
| ०१ | **दिपावली मंडप** लाडू विक्री काउंटर, सभाकुंड उदी | रु.२.५० | रु.१.९७ प्रती चौ.फुट प्रति दिवस | निविदेसोबत आवश्यक कागदपत्रांची | ६/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | काऊंटर, गुरुस्थान मंदिरासमोर गेट नं.03 चे बाहेरील बाजूस एस.एस. पाईप फ्रेममध्ये ताडपत्रीचे छत असलेले मंडप टाकणे. (8,671 चौ.फुट) | | | पुर्तता केलेली नसल्यामुळे अपात्र | |
| ०२ | **नाताळ मंडप** गुरुस्थान समोर, उदी काउंटर, नगर-मनमाड रोड पूर्व बाजू, पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजू, फुटपाथ, लाडू विक्री, पिंपळवाडी रोड गेट नं.02 ते महालक्ष्मी मंदिर दर्शन रांगेसाठी एम.एस.पाईप फ्रेममध्ये ताडपत्रीचे छत असलेले मंडप टाकणे. (14854 चौ.फुट ) | रु.२.१० | रु.१.९७ प्रती चौ.फुट प्रति दिवस | | ६/- |
| ०३ | श्री साईप्रसादालयातील भोजन प्रतिक्षालय रेलींगला संरक्षक कठडे बांधणेकामी 4 फुट उंचीची बॅरेकेडींग करणे. (651 र.फुट) | रु.१५/- | रु.१०/- प्रती र.फुट प्रति दिवस | | १०/- |
| ०४ | साईनगर मैदानाकडे जाणा- | रु.४५००/- | रु.४९००/- | | ११०००/- |

प्रती नग

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | या रस्त्यावर स्वागत कमान (01 नग) | | | | |
| ०५ | साईनगर मैदान येथे शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी ग्रीनरुमसह स्टेजची उभारणी करणे. (600 चौ.फुट) | रु.६०,०००/- स्टेज व इतर व्यवस्था (२००० नग फायबर खुर्चीसह) | रु.७०,०००/- स्टेज व इतर व्यवस्था (२००० नग फायबर खुर्चीसह) | | रु.२०,०००/- स्टेज व इतर व्यवस्था (२००० नग फायबर खुर्चीसह) |
| | एकूण कामाचे दर- | रु.७,५८,२८८/- | **रु.६,५३,०७९/-** | अपात्र | रु.१६,७२,०९६/- |

प्रस्तावितकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक न्यु बालाजी मंडप, निमोण यांनी दिवाळी व नाताळसणानिमित्त श्री साईबाबांची सेवा करण्याची इच्छा असल्याने निविदेतील दरामध्ये आणखी विशेष सुट देत असलेबाबत आजचे सभेत पत्राव्दारे कळविले आहे, त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे अंतीम दर देऊ केले.

| अ.नं. | तपशील | **न्यु बालाजी मंडप, निमोण, ता. चांदवड** | |
|---|---|---|---|
| | | **निविदेमधील दर** | **अंतीम दर** |
| ०१ | **दिपावली मंडप**<br>**दि.23 ऑक्टोंबर,2014 ते दि.06 नोव्हेंबर, 2014 अखेर 15 दिवस**<br>लाडू विक्री काउंटर, सभाकुंड उदी काऊंटर, गुरुस्थान मंदिरासमोर गेट नं.03 चे बाहेरील बाजूस एस.एस. पाईप फ्रेममध्ये ताडपत्रीचे छत असलेले मंडप टाकणे. **(8,671 चौ.फुट)** | रु.१.९७ प्रती चौ.फुट प्रति दिवस | रु.**१.११** प्रती चौ.फुट प्रति दिवस |
| ०२ | **नाताळ मंडप**<br>**नाताळ मंडप दि.25 डिसेंबर,2014 ते दि.02 जानेवारी, 2015 अखेर 09 दिवस**<br>गुरुस्थान समोर, उदी काउंटर, | रु.१.९७ प्रती चौ.फुट प्रति दिवस | रु.**१.१७** प्रती चौ.फुट प्रति दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| | नगर- मनमाड रोड पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजू, फुटपाथ, लाडू विक्री, पिंपळवाडी रोड गेट नं.02 ते महालक्ष्मी मंदिर दर्शन रांगेसाठी एम.एस.पाईप फ्रेममध्ये ताडपत्रीचे छत असलेले मंडप टाकणे. **(14854 चौ.फुट )** | | |
| ०३ | श्री साईप्रसादालयातील भोजन प्रतिक्षालय रेलींगला संरक्षक कठडे बांधणेकामी 4 फुट उंचीची बॅरेकेडींग करणे. **(651 र.फुट)** **नाताळ मंडप दि.25 डिसेंबर,2014 ते दि.02 जानेवारी, 2015 अखेर 09 दिवस** | रु.१०/- प्रती र.फुट प्रति दिवस | रु.<u>९.००</u> प्रती र.फुट प्रति दिवस |
| ०४ | साईनगर मैदानाकडे जाणा-या रस्त्यावर स्वागत कमान 20 फुट उंच व 25 फुट रुंद **(01 नग)** **दि.31/12/2014 दि.01/01/2015 अखेर 01 दिवस** | रु.४९००/- प्रती नग | रु.<u>४०००/-</u> प्रती नग |
| ०५ | साईनगर मैदान येथे शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी ग्रीनरुमसह स्टेजची उभारणी करणे. **(600 चौ.फुट)** **दि.31/12/2014 दि.01/01/2015 अखेर 01 दिवस** | रु.७०,०००/- स्टेज व इतर व्यवस्था (२००० नग फायबर खुर्चीसह) प्रती दिवस | **<u>रु.२१,०००/-</u>** स्टेज व इतर व्यवस्था (५०० नग फायबर खुर्चीसह) प्रती दिवस |
| | एकूण कामाचे दर- | रु.६,५३,०७९/- | **<u>रु.३,७८,५१६/-</u>** |

वर नमूद साईनगर येथील स्टेजचे काम हे निविदेतील तपशिलानुसार २००० नग फायबर खुर्च्यांसह करावयाचे होते. तथापी ठेकेदार न्यु बालाजी मंडप यांनी सदर काम २००० नग फायबर खुर्च्यांऐवजी ५०० नग खुर्च्या पुरविणेसह रु.२१,०००/- मात्र या अंतीम निम्नतम दराने करावयाची तयारी दर्शविलेली आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दिपावली, नाताळ, शिर्डी महोत्सव 2014-2015 कालावधीत मंडप, स्टेज, स्वागत कमान बॅरेकेडींग उभारणीचे काम करुन घेणेसाठी न्यु बालाजी मंडप, निमोण, ता. चांदवड यांचे उपरोक्त तक्त्यातील गडद व अधारेखीत केलेले अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश**

**देण्यात यावा. त्यासाठी येणा-या रु.१,००,३२४/- मात्रचे जादा खर्चास मान्यता देण्यात यावी.**

**तसेच वरील तपशिलातील सुट्टयांचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चासही मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

०२ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे लॉण्ड्री व प्रयोगशाळेच्या रसायनिक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP उभारणेकामी तज्ञ सल्लागार यांचेकडून प्राप्त झालेले RFP Document वजा प्रस्ताव उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.२,००,०००/-)**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद :-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट–कलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय:-** मा. त्रीसदस्य समितीचे दिनांक ०७/०८/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६६५ अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथे लॉण्ड्री व प्रयोगशाळेच्या रसायनीक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP उभारणेसाठी त्यांचे डिझाईन, ड्रॉईग, निविदा वगैरे तयार करुन घेणेसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागार यांची विहीत पध्दतीने नेमणूक करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

**प्रस्ताव:-** मा. त्रीसदस्य समितीचे उपरोक्त निर्णयानुसार विषयांकीत कामासाठी डिझाईन, ड्रॉईग, निविदा वगैरे तयार करुन घेणेसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागार यांचेकडून प्रस्ताव मागविणेकामी इकडील विभागामार्फत Request for Proposal (RFP) Document तयार करणेत आले आहे. त्याकरीता नामांकीत व तज्ञ सल्लागार यांचेकडून प्रस्ताव मागविणेकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.२३/०९/२०१४ अखेर Request for Proposal (RFP) Document मागविणेत आलेले आहे. सदरचे मुदतीत खालील संस्थांनी सिलबंद RFP Document वजा प्रस्ताव सादर केलेले आहेत.

| Sr. No. | Name of Consultant | Inward No. /Date |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 01. | Enviro Analysts & Engineers Pvt. Ltd., Mumbai. | 11723 / 22.09.2014 |
| 02. | ECO System Resource Management Pvt. Ltd., Surat. | 11779 / 22.09.2014 |

विषयांकीत कामासाठी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले दोन सिलबंद RFP Document वजा प्रस्ताव आजचे उपसमिती सभेत समक्ष उघडणेत आले. त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| Sr. no. | Name of Consultant | Quotated amount |
|---|---|---|
| १ | Enviro Analysts & Engineers Pvt. Ltd., Mumbai. | Rs 1,72,000/- (Inclusive of taxes for both ETP'S) |
| २ | ECO System Resource Management Pvt. Ltd., Surat. | Rs 2,72,000/- + Service Tax Extra as applicable |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी फक्त दोनच RFP Document वजा प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत व त्या दोन्हीही प्रस्तावांमध्ये फारच तफावत दिसून येत आहे. त्याकरीता याकामी फेर-प्रस्ताव मागविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**०३ शांतिनिवास दर्शनरांग हॉलकरीता वायुवीजनसाठी डक्टचे काम करुन घेणेसाठी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून निर्णय होणेबाबत. (रु.१,५०,०००/-)**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक १२-०६-२०१४ चे सभेतील विषय नं.४५ निर्णय क्र.४९५ अन्वये शांतीनिवास दर्शनरांग हॉलकरीता वायुवीजनसाठी डक्टचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणारे रक्कम रुपये १,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विदयुत/ २९२० / २०१४ दि.१५-०९-२०१४ अन्वये कोटेशन धारकांना पत्र पाठवून कोटेशन्स मागविण्यात आलेली होती. कोटेशन सादर करण्याची मुदत दिनांक २२-०९-२०१४ पर्यंत देण्यात आली होती. त्यानुसार

दिलेल्या मुदतीत खालीलप्रमाणे चार कोटेशन्स प्राप्त झाली आहे. कोटेशन्सचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | प्रशा आवक / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, अंबड, नाशिक | ११८१५ / २२-०९-२०१४ | बंद कोटेशन पाकीट-०१ सोबत ईएमडी पाकीट-०१ |
| २ | मे.साई समर्थ इंजिनिअरींग, अंबड, नाशिक | ११८१६ / २२-०९-२०१४ | बंद कोटेशन पाकीट-०१ सोबत ईएमडी पाकीट-०१ |
| ३ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ११८१८ / २२-०९-२०१४ | बंद कोटेशन पाकीट-०१ सोबत ईएमडी पाकीट-०१ |
| ४ | मे.साई इलेक्ट्रीकल्स, मु.पो. अस्तगाव, ता.राहाता | ११८१५ / २२-०९-२०१४ | बंद कोटेशन पाकीट-०१ सोबत ईएमडी पाकीट-०१ |

शांतीनिवास दर्शनरांग हॉलकरीता वायुवीजनसाठी डक्टचे काम करुन घेणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत समक्ष उघडणेत आल्या. त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **निविदेमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| १ | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, अंबड, नाशिक | १,९८,८०६/- |
| २ | **मे.साई समर्थ इंजिनिअरींग, अंबड, नाशिक** | **१,७०,५५३/-** |
| ३ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स, नाशिक | २,३५,८७२/- |
| ४ | मे.साई इलेक्ट्रीकल्स, मु.पो. अस्तगाव, ता.राहाता | २,०१,४२०/- |

शांतिनिवास दर्शनरांग हॉलकरीता वायुवीजनसाठी डक्टचे काम करुन घेणेसाठी रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीची मान्यता आहे. परंतु उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं, अंबड, नाशिक यांचे रु.१,७०,५५३/- मात्र निम्नतम दर आलेले

आहेत. त्यामुळे मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं, अंबड, नाशिक यांचेशी उपसमितीने दुरध्वनीवरुन दराबाबत चर्चा केली असता, त्यांनी रु.१,५०,०००/- मात्र रकमेमध्ये सदरचे काम करुन देणेस सहमती दर्शविली.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतिनिवास दर्शनरांग हॉलकरीता वायुवीजनसाठी डक्टचे काम करुन घेणेकामी मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं, अंबड, नाशिक यांनी दुरध्वनीवरुन दिलेले रु.१,५०,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना सदरहू कामाचा कार्यादेश देण्यात यावा. तसेच त्यांनी दुरध्वनीवरुन देऊ केलेले दर लेखी स्वरुपात घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**०४ राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकरिता संगणक संच व इतर साहित्य खरेदी करणेकामी प्राप्त झालेली दरपत्रके उघडणेबाबत. (रु.९,००,०००/-)**

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविणेबाबत मान्यता मिळालेली आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वीत करणेत आली आहे. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सदर योजना कार्यान्वीत करणेकामी दि. २३.०५.२०१४ रोजीच्या मा. व्यवस्थापन सभेतील विषय क्र. ३६ निर्णय क्र. ३२५ अन्वये संगणक संच व इतर साहीत्य विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ९,००,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख मात्रचे) खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थानचे वेब साईटवर माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत निविदा प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदा सादर करणेची अंतीम मुदत दि.०५.०९.२०१४ ठेवण्यात आली होती. त्यानुसार सदर कालावधीमध्ये खालीलमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहे.

परिशिष्ट “ अ ”

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | युनिक्युव्ह सोल्युशन्स, पुणे | २७७० | ०४.०९.२०१४ |
| २. | राका इन्फोटेक प्रा. लि., नाशिक | २८७१ | ०६.०९.२०१४ |
| ३. | सुरेन्द्र टेडर्स, नाशिक | २८१५ | ०६.०९.२०१४ |

तरी उपरोक्त प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत समक्ष उघडणेत आल्या. त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| १. | युनिक्युव्ह सोल्युशन्स, पुणे | ६,३७,२११/- टॅक्ससह (आवश्यक Cable, Caseing Capping चे दर वेगळे) |
| २. | राका इन्फोटेक प्रा. लि., नाशिक | ६,९७,६७३/- टॅक्ससह (आवश्यक Cable, Caseing Capping चे दर वेगळे) |
| ३. | **सुरेन्द्र टेडर्स, नाशिक** | **५,४३,५००/- टॅक्ससह** (आवश्यक Cable, Caseing Capping चे दर वेगळे) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकरिता १० नग संगणक संच व इतर संगणकीय साहित्य (प्रिन्टर्स- १० नग, स्कॅनर- ०७ नग, नेटवर्किंग स्विच- ०१ नग) खरेदी करणेकामी सुरेंद्र टेडर्स, नाशिक यांचे रु.५,४३,५००/- सर्व करांसह मात्र निम्नतम दर स्विकारणेत यावेत व नेटवर्कींग (Cable, Caseing Capping) साठीचे वेगळे दर देणेत येऊन त्यांना सदरहू कामाचा पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.०३ जमाखर्च तक्ता माहे, जुलै-२०१४.**

माहे, जुलै- २०१४ मधील जमा रु.४३,९८,०१,९८८/- आणि खर्च रु.१८,०७,२६,७५७/- मात्र तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.९२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त जमाखर्च तक्त्याची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.०४ इसेंल पेंट प्रा.लि., मुंबई यांचे संस्थान इमारतींचे रंगकाम देणगीदाखल करणेबाबतच्या पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** इसेल पेंट प्रा.लि., मुंबई यांनी दि.१८/१०/२०१४ रोजीचे इ- पत्राद्वारे मंदिर परिसरातील संस्थान इमारतींचे अथवा श्री साई प्रसादालयाचे बाहेरील रंगकाम देणगीदाखल करणेकामी इच्छा व्यक्त केली आहे. सदर रंगकाम आवश्यक

रंगमटेरिअल व मजुरीसह त्यांचे मार्फत करणेत येणार आहे. त्यासाठी रंगकाम करणारे पेंटर यांचे राहण्याची व जेवणाची व्यवस्था संस्थानमार्फत होणेस त्यांनी विनंती केली आहे. श्री. नरेंद्र पटेल, मुंबई यांनी यापुर्वी सन २००६ साली शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीचे बाहेरील रंगकाम देणगी दाखल केलेले आहे.

मंदिर परिसरातील शांतीनिवास व भक्तनिवास इमारतींचे रंगकाम अद्याप सुस्थितीत असून, नियोजित मंदिर पुनर्विकास प्रकल्पात या इमारतींमध्ये फेरबदल करण्याचे प्रस्तावित आहे. श्री साई प्रसादालय इमारतीस रंगकाम होऊन सात वर्षे झालेली असून, आता बाहेरील भागास रंगकाम करणे गरजेचे आहे.

तरी श्री साई प्रसादालय इमारतीचे बाहेरील रंगकाम वर नमूद देणगीदार यांचेकडून देणगीदाखल करुन घेणेसाठी व देणगीदार यांचे मजुरांची जेवणाची सोय श्री साई प्रसादालय येथे व निवासव्यवस्था श्री साई धर्मशाळा येथे विनामुल्य करणेस मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.९२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, इसैल पेंट प्रा.लि., मुंबई यांचेकडून श्री साई प्रसादालय इमारतीच्या बाहेरील बाजूचे रंगकाम देणगीदाखल करुन घेणेस मान्यता देणेत आली.**

**तसेच, देणगीदार यांच्या मजुरांची जेवणाची सोय श्री साई प्रसादालय येथे व निवासव्यवस्था श्री साई धर्मशाळा येथे विनामुल्य करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.०५ व्दारावती भक्तनिवास हाऊसकिपींग कामासाठी फेर ई-निविदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती भक्तनिवास विभागाचे इमारतीमध्ये 80 ए.सी. व 236 नॉन ए.सी. अशी एकुण 316 खोल्या साईभक्तांना निवासासाठी देण्यात येतात. त्या खोल्या भक्तांनी खाली केलेनंतर त्यांची साफ-सफाई तसेच हाऊस किंपीग व व्दारावती विभागाचे इतर परिसराची स्वच्छता इत्यादी कामे -आऊट सोर्सिग पध्दतीने करुन घेतली जातात. संस्थानच्या व्दारावती भक्तनिवास विभागाकडे मे.बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि.पुणे ही कंपनी दि.01/04/2010 पासून स्वच्छता व हाऊसकिंपीगची कामे आऊटसोर्स पध्दतीने सध्या काम करत आहे.

सन 2014-15 या वर्षाकरीता व्दारावती भक्तनिवास विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक हाऊसकिपींग कामासाठी ई-निविदाची जाहीरात देऊन ई -निविदा मागविण्यास मा. व्यवस्थापन समिती सभा दि.15/02/2014 रोजीचा विषय नं.12, निर्णय क्रं. 163 अन्वये सविस्तर चर्चा होऊन सध्या व्दारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता / हाऊसकिंपीग ( आऊट सोर्सिंग ) काम करत असलेले मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांची मुदत दि. 30/04/2014 अखेर

संपुष्टात येत असल्याने सन 2014-15 या आर्थिक वर्षाकरीता व्दारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता /हाऊसकिंपीग काम करुन घेणेसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकंडून निविदांची मागणी करणेत यावी. याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये-1,20,00,000/- (अक्षरी रुपये- एक कोटी, वीस लाख) मात्र खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

अ) संदर्भिय क्रं. 01 अन्वये व्दारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता / हाऊसकिंपीग ( आऊट सोर्सिंग) कामासंबंधी ई-निविदा कामासंबंधी टेंडर साठी जाहीरात देऊन निविदा मागवुन निविदाधारकांचे Technical Doucument मध्ये दिलेल्या अटी / शर्तीनुसार शासनाच्या कॅग रिपोर्ट प्रमाणे निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन Technical Scores देण्यात येऊन ज्या कंपनीला 70 व त्यापेक्षा जास्त गुण मिळेल अशा 5 निविदाधारकांपैकी 2 पात्र 0 3 अपात्र अशा कंपनीचे बीड ऑफ कोटेशन दि.12/06/2014 रोजीचे मा.व्य.समिती सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. 01, निर्णय क्रं. 524 अन्वये विषय सादर करण्यात आला असून याबाबत 5 पैकी फक्त 2 पात्र उमेदवार असल्याने नविन ई-टेंडर मागवुन कार्यवाही करावी,असा निर्णय झालेला आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-विधी/163/14 दि.09/04/2014 रोजी संस्थान वकिलामार्फत व्दारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता हाऊसकिंपीग ( आऊट सोर्सिंग ) काम करुन घेणेसाठी येणाऱ्या खर्चाचे रक्कमेस मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळणेकामी मा.कोर्टात सिव्हील अर्ज दाखल करण्यात आलेला होता. जा.न.एसएसएस/वशी-विधी/103/2014 दि.26.07.2014 अन्वये मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील सिव्हील □प्लीकेशन क्र. 5814/14 मधील दि.11.07.2014 चे आदेशातील अं.नं. 5 प्रमाणे मे. बी.व्ही.जी. इंडिया लि, पुणे यांचे हाऊसकिंपीगची मुदत संपलेली असुन स्थानिक पेपर व राष्ट्रीय पेपर मध्ये जाहिरात देऊन ई -निविदा टेंडर लवकरात लवकर करण्यात यावे,असा आदेश देण्यात आलेला आहे.

ब) तसेच नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत आहे त्याच अटी/शर्तीवर मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना मुदतवाढ देणेत यावी व दरम्यानचे कालावधीत याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठास अर्ज करणेत येऊन मा.खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरलेले आहेत.त्यानुसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना रुपये- 8,30,000/- इतक्या रक्कमेस हाऊस किंपीग काम करुन घेणेकरीता मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता मिळाली असून त्यानुसार त्यांना प्रत्येक महिन्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

01) उपरोक्त निर्णयास अनुसरुन हाऊस किपींग कामासाठी जनसंपर्क कार्यालयामार्फत दि.27/10/2014 रोजी लाईफ-365 मुंबई, प्रहार मुंबई,

पुण्यनगरी औरंगाबाद, संध्यानंद पुणे, दि फ्रि प्रेस जरनल मंुबई या विविध दैनिक वर्तमान पत्रातून व श्री साईबाबा हॉस्पीटल ई.डी.पी. विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानच्या संकेतस्थळावर ई-निविदाबाबतची जाहीरात प्रसिध्द करण्यात आली.

02) महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदामध्ये तांत्रिक बीडचे (Technical Bid ) कागदपत्र ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.25/09/2014 रोजी सांय. 05.00 वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. तद्नंतर स्कॅन केलेले कागदपत्राचे व इतर मागणी केलेले कागदपत्राच्या सत्यप्रती (Soft copy ) शिर्डी कार्यालयात दि.27/09/2014 रोजी सांय.05.00 वाजेपर्यंत सादर करावेत,अशी जाहीरात प्रसिध्दी मध्ये देण्यात आलेली होती.

03) निविदा विक्री दि.11/09/2014 ते दि.25/09/2014 या कालावधीत श्री साईबाबा हॉस्पीटल ई.डी.पी. विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर टाकुन निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये उपरोक्त कालावधीत एकुण 4 निविदा शिरडी कार्यालयात प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहेत.

ई-निविदाधारकांची माहिती :-

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | निविदा जमा झाल्याचे ठिकाण | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|---|
| 01 | मे.रिलायन्स एन्टरप्रायझेस, कॅम्प पुणे | शिर्डी कार्यालय | 11990/24/09/2014 |
| 02 | मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. कॅम्प पुणे | शिर्डी कार्यालय | 12047/26/09/2014 |
| 03 | मे.बी.एस.अे.कॉर्पोरेशन लि.कॅम्प, पुणे | शिर्डी कार्यालय | 21165/27/09/2014 |
| 04 | मे.संजय मेन्टनन्स सर्व्हीसेस प्रा.लि.मुंबई | शिर्डी कार्यालय | 12224/27/09/2014 |

04) वरील 04 ई-निविदा टेंडरधारकांचे निविदा रक्कम रुपये-1,000/- व बयाणा रुपये- 1,00,000/- इतक्या रक्कमेचे डी.डी.लेखाशाखा विभागामार्फत संस्थान खाते जमा करुन प्रत्येक कंपनीच्या नांवे वेगवेगळया जमा पावतीची कार्यवाही करण्यात आलेली आहेत.

05) उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदांच्या हार्ड कॉपी निविदा धारकांनी व्दारावती भक्तनिवास कार्यालयात दि. 24/09/2014 ते दि. 27/09/2014 रोजी सादर केल्या आहेत. दि. 08/10/2014 रोजी उपरोक्त निविदाधारकांनी दिलेले हाऊसकिंपीग कामासंबंधीचे तांत्रिक लिफाफे ( लिफाफा क्रं. 01 ) मा.कार्यकारी अधिकारी साो. यांचे मान्यतेने समक्ष उघडणेत आलेल्या आहेत.

निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला. सर्व निविदाधारकांचे कागदपत्रे असून, Nit Document मधील अटी/शर्ती अ.नं. 11 निविदाधारकांचे हाऊसकिपींगचे क्षेत्रात मागिल 2 वर्षापासून 10 कोटी पेक्षा जास्त उलाढाल असावी, अशी अट आहे. त्यामुळे फक्त मे. रिलायन्स एन्टरप्राईझेस, पुणे यांचे मागिल दोन वर्षापासून 10 कोटीपेक्षा कमी उलाढाल आहे. वर्षाच्या वार्षिक उलाढालीची माहिती लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात आलेले आहे. सोबत कागदपत्राचा तुलनात्मक तक्ता अवलोकनार्थ सादर केलेला आहे.

06) तसेच निविदाधारकांचे Technical Doucument मध्ये दिलेल्या अटी /शर्तीनुसार शासनाच्या कॅग रिपोर्ट प्रमाणे 4 निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन Technical Scores देण्यात येऊन ज्या कंपनीला 70 व त्यापेक्षा जास्त गुण मिळेल अशा कंपनीचे बीड ऑफ कोटेशन उघडण्यात येईल. त्यानुसार निविदाधारकांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे गुण मिळालेले आहेत. त्याचा सविस्तर गुणाचा तक्ता सोबत अवलोकनार्थ सादर.

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | मिळालेले गुण | पात्र | अपात्र |
|---|---|---|---|---|
| 01 | मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. कॅम्प पुणे | 100 | पात्र | |
| 02 | मे.संजय मेन्टनन्स सर्व्हीसेस प्रा.लि.मुंबई | 80 | पात्र | |
| 03 | मे.बी.एस.अे.कॉर्पोरेशन लि.कॅम्प, पुणे | 52 | | अपात्र |
| 04 | मे.रिलायन्स एन्टरप्रायझेस, कॅम्प पुणे | 31 | | अपात्र |

अ) मा. व्य.स.सभा दि.15/02/2014 रोजीचा विषय नं.12, निर्णय क्रं. 163 अन्वये व्दारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊट सोर्सिंग) कामासाठी वर्तमान पत्रामध्ये जाहीरात देऊन ई-निवीदा मागविण्यात आल्या होत्या. त्यावेळी 05 ई-निविदा प्राप्त झाल्या असता त्यापैकी 02 ई-निविदा शासनाच्या कॅग (OFFICE OF THE COMPTROLLER AND AUDITOR GENERAL OF INDIA NEW DELHI ) रिपोर्ट प्रमाणे पात्र ठरल्या होत्या. नियमा प्रमाणे 03 निविदा चर्चा-वाटाघाटी साठी असाव्यात त्यावेळी 02 पात्र ई-निवीदावर चर्चा -वाटाघाटी करता येत नाही, त्यामुळे हाऊसकिपींग करीता पुन्हा जाहीरात देऊन ई-निविदा मागविण्यात यावे, असे ठरले.

ब) मा.व्य.स.सभा दि.12/06/2014 चे आयत्या वेळेचा विषय नं.01 निर्णय क्र.524 अन्वये व्दारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊट

सोर्सिंग) कामासाठी वर्तमान पत्रामध्ये जाहीरात देऊन ई-निवीदा मागविण्यात आलेल्या आहेत. मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील सिव्हल ॲप्लीकेशन क्र. 5814/14 मधील दि.11.07.2014 चे आदेशातील अं.नं. 5 प्रमाणे हाऊसकिपींग करीता पुन्हा जाहीरात देऊन ई-निविदा मागविण्यात यावेळी 04 ई-निवीदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी शासनाच्या कॅग (OFFICE OF THE COMPTROLLER AND AUDITOR GENERAL OF INDIA NEW DELHI ) रिपोर्ट प्रमाणे पुन्हा 02 ई-निवीदा पात्र ठरल्या आहेत. ई-टेंडर निविदेतील अटी /शर्ती मध्ये अ.नं.62 मध्ये निविदेतील दराबाबत चर्चा/वाटाघाटी केल्या जाणार नाहीत. आपण (इच्छुक निवीदाधारकांनी )अतिम न्युनतम दर द्यावेत. आणि निवीदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार समितीला राहिल, असे नमुद केले आहे.

क) उपरोक्त "अ" नुसार ई-टेंडर केले नंतर 05 पैकी 02 निवीदा पात्र ठरल्या होत्या. नियमा प्रमाणे कमीत-कमी 03 निवीदा पात्र असणे आवश्यक असल्याने चर्चा-वाटाघाटी करण्यात आली नाही. मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील सिव्हील ॲप्लीकेशन क्र. 5814/14 मधील दि.11.07.2014 चे आदेशातील अं.नं. 5 प्रमाणे हाऊसकिपींग करीता पुन्हा जाहीरात देऊन ई-निविदा मागविण्यात यावे, असे ठरल्याने "ब " प्रमाणे पुन्हा ई-टेंडरीग करण्यात आले. त्यावेळी फक्त 04 निवीदा प्राप्त झाल्या असुन शासनाच्या कॅग (OFFICE OF THE COMPTROLLER AND AUDITOR GENERAL OF INDIA NEW DELHI) रिपोर्टप्रमाणे 02 निविदा पात्र ठरलेल्या आहे. यावर मुख्य लेखाधिकारी यांनी तिस-यांदा ई-निविदा जाहिरात देवुन त्यानंतर आलेल्या पैकी कितीही निविदा पात्र असल्या तरी निविदा प्रक्रिया अंतिम करावी असा अभिप्राय दिलेला आहे.त्या नुसार फेर ई-निविदा करणेकामीचा विषय मा.त्रिसदस्य समिती पुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित हाऊसकिंपींगकामी तिस-या वेळेस फेर ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सध्या संस्थानला प्राप्त झालेल्या प्रस्तावित निविदाधारकांच्या अनामत रकमांचे डी.डी. त्यांना परत करण्यात यावेत व तिस-या वेळेस फेर ई-निविदांमध्ये तीनपेक्षा जास्त किंवा कमी पात्र निविदा प्राप्त झाल्या तरीही निविदा प्रक्रिया अंतीम करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

---

**विषय नं.०६ निवासस्थान विभागांसाठी ISO- 9001 व ISO- 14001 मानांकन प्राप्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री क्षेत्र शिर्डी येथे मा.व्यवस्थापन समितीने साईभक्तांच्या सोयी/सुविधेसाठी व्दारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, साईप्रसाद निवासस्थान व श्री साईबाबा भक्तनिवासस्थान या ठिकाणी साईभक्तांना निवासासाठी निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तथपि सेवा पुरवितांना त्यामध्ये सेवाभाव, कार्यतत्परता व गुणवत्ता राखणे जरुरीचे असते. सेवेचा दर्जा राखण्यासाठी कर्तव्यामध्ये सातत्य ठेवणे गरजेचे असते. सदरील कार्य तत्परता व गुणवत्ता सातत्याने राखण्यासाठी ISO -9001 व ISO -14001 चे मानांकन घेणे महत्वाचे आहे. मा. श्री सी.केशव मुर्ती, C/o साई एन्टरप्राईजेस, बेंगलोर हे साईभक्त असल्याने नियमीतपणे श्रींच्या दर्शनासाठी येत असतात.

मा. श्री सी.केशव मुर्ती, C/o साई एन्टरप्राईजेस, बेंगलोर यांनी दि. 06/05/2009 चे पत्रामध्ये संपुर्ण श्री साईबाबा संस्थानला ISO चे मानांकन मिळवुन देण्याची इच्छा प्रदर्शित केलेली आहे. दि. 07/08/2014 रोजी व दि.06/09/2014 रोजी व्दारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, साईप्रसाद निवासस्थान, श्री साईबाबा भक्तनिवास या विभागांची पहाणी केली, असता संस्थानचे सर्वच निवासस्थाने ISO -9001 व ISO -14001 हे मानांकन मिळणेस पात्र आहेत. त्यानुसार पांचही निवासस्थानाचे अधिक्षक, प्रभारी अधिक्षक यांनी ISO -9001 व ISO -14001 चे मानांकन मिळवुन देणारे मा. श्री सी.केशव मुर्ती, C/o साई एन्टरप्राईजेस, बेंगलोर व त्यांचे सल्लागार श्री एस. मदन रेड्डी यांना लागणारी सर्व माहिती देवून कार्यवाही करणेसाठी आवश्यक कागदपत्राची पुर्तता करावी व ISO -9001 व ISO -14001 चे मानांकन मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव तयार करावा, असे सुचविले आहे.

मा. श्री सी.केशव मुर्ती, C/o साई एन्टरप्राईजेस, बेंगलोर व त्यांचे सल्लागार श्री एस. मदन रेड्डी हे श्री साईबाबा संस्थानला वेळोवेळी सर्व निवासस्थानासंबधी ऑडीट करणे कामी उपस्थित राहतील, त्यावेळी त्यांची साईनिवास / व्दारावती भक्तनिवास येथे निवास व्यवस्था, प्रसाद भोजन, दर्शन/आरती व संस्थान परिसरात भेट देणेकामी संस्थानचे वाहनाची सोय विनामुल्य करण्यात यावी, असे मत आहे.

तरी उपरोक्त विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, निवासस्थान विभागांसाठी ISO- 9001 व ISO- 14001 मानांकन प्राप्त करुन घेण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**सर्व निवासस्थानांचे ऑडीट करणेकामी मा.श्री.सी.केशव मुर्ती, C/o साई एन्टरप्राईजेस, बेंगलोर व त्यांचे सल्लागार श्री.एस. मदन रेड्डी अथवा इतर सहाय्यक हे वेळोवेळी संस्थानला भेट देतील, त्या-त्या वेळी त्यांची**

**निवासव्यवस्था साईनिवास/ व्दारावती भक्तनिवास येथे विनामुल्य करणेत यावी. तसेच त्यांची प्रसाद भोजन, दर्शन/आरती आणि संस्थान परिसरात भेट देणेकामी संस्थान वाहनाची व्यवस्थाही विनामुल्य करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सर्व निवासस्थाने)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.०७ मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार संस्थान आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना अदा करणेत आलेल्या सन २०१४ दिपावली सानुग्रह अनुदानास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी दिनांक 08 ऑगष्ट, 2014 रोजीचे पत्राने, माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये साजऱ्या करणेत येणाऱ्या दिपावली उत्सवासाठी संस्थान सेवेतील कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान मिळणेबाबत विनंती केलेली होती.

त्यास अनुसरुन, सामान्य प्रशासन शाखेमार्फत दिनांक 27 ऑगष्ट, 2014 रोजीचे मंजूर टिपणीनुसार , संस्थान सेवकांना दिपावली - सन 2014 सानुग्रह अनुदान देणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 28 ऑगष्ट, 2014 रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला होता. या प्रस्तावाचे अनुषंगाने निर्णय क्रमांक 696 खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला आहे :

.. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील कायम कर्मचा-यांना सन-2013 दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजुरी मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये पी.आय.एल,18/2011 सिव्हील अर्ज क्रमांक 13284/2013 दाखल असून त्या अर्जावर अद्याप निर्णय झालेला नाही. मा. खंडपीठाने या सिव्हील अर्जावर दि.! 25.10.2013 रोजीचे आदेशान्वये, सन-2013 दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान तुर्तास देण्याविषयी अंतरीम आदेश केलेला आहे व जर का शासन धोरणानुसार असे अनुदान देता येणार नाही, असे मा. खंडपीठाचे मत झाले तर दिले गेलेले अनुदान संबंधीत कर्मचा-यांच्या पगारामधून पुन्हा वसूल करुन घ्यावे, अशी अट घातली आहे.

त्यामुळे सन-2014 चे सानुग्रह अनुदान देण्यासाठी संस्थानला आर्थिक अडचण जरी नसली, तरी मागील वर्षीच्या सानुग्रह अनुदानाबाबत निर्णय अद्याप झालेला नाही व त्यावर मा. खंडपीठाचा अंतिम निर्णयहोईपर्यन्त चालु वर्षाचे अनुदान देण्याविष्यी समिती निर्णय घेऊ शकत नाही, असे ठरले.

तथापी, दरम्यानचे कालावधीत, संस्थान कर्मचारी श्री. रामराव रंभाजी शेळके व इतर 2 यांनी तसेच श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी संस्थान कर्मचा-यांना सन 2014 चे दिपावलीकरीता सानुग्रह अनुदान मंजूर व्हावे या कारणास्तव मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे

न्यायालयात अनुक्रमे दिवाणी अर्ज क्रमांक अर्ज क्र. 9217/2014 व 9437/2014 (जनहित याचिका क्रमांक 18/2011 मध्ये) दाखल केलेला होता.

उपरोक्त दिवाणी अर्जाचे अनुषंगाने, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ अरंगाबाद यांनी झालेला सुनावणींचे अनुषंगाने **दिनांक 13 ऑक्टोबर, 2014** रोजी खालीलप्रमाणे **<u>आदेश</u>** दिलेलाआहे **:**

**.. .. 4. In the light of that, we pass the following order.**
**5. The Sansthan is allowed to make ex-gratia payment to its employees as is made every year. However, the said payment shall be made provisional and would be subject to the further decision in Civil Application No. 13284 of 2013.**
**6. The State Government shall file affidavit clearly spelling out its stand about the right of the Sansthan to make ex-gratia payment.**
**Stand over to 15.11.2014.**

**थोडक्यात,** मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी, दिवाणी अर्ज क्रमांक 13284/2013 मध्ये अंतिम निर्णय होईपर्यन्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे कर्मचा-यांना सन 2014 चे दिपावली उत्सवाकरीता सानुग्रह अनुदान आदा करणेबाबत **सशर्त (तात्पुरती) मंजुरी** दिलेली आहे. तसेच या दिवाणी अर्जात राज्य शासनाने संस्थानला सानुग्रह अनुदान देणेबाबत अधिकार आहेत किंवा नाहीत याबाबत स्पष्ट प्रतिज्ञापत्र सादर करावे, असा आदेश दिलेला आहे.

**(ब)** उपरोक्त **परिच्छेद अ** मध्ये नमुद केलेल्या मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक 13 ऑक्टोबर, 2014 रोजीचे आदेशास अनुसरुन आणि मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 28 ऑगष्ट, 2014 रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आलेल्या प्रस्तावात सविस्तर नमुद केल्याप्रमाणे, तसेच महाराष्ट्र शासनाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन पहाणेकरीता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम - 2004 (अधिनियम क्रमांक 14) या अधिनियमांतील कलम 15, कलम 16, कलम 17 व कलम 22 मधील तरतुदीनुसार, संस्थान आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना सन 2014 चे दिपावली उत्सवाचे सानुग्रह अनुदान मंजूर होऊन आदा करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये 6.50 कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सामान्य प्रशासन शाखेमार्फत दिनांक 17 ऑक्टोबर, 2014 प्रशासकीय स्तरावर मंजुरीस्तव टिपणी सादर करणेत आली.

उपरोक्त शासकीय मंजूर टिपणीनुसार, जा. क्र. एसएसएस / वशी-01/3350/2014, दिनांक 17 ऑक्टोबर, 2014 रोजीचे आदेशानुसार, संस्थान आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना दिनांक 01 ऑक्टोबर, 2013 ते दिनांक 30 सप्टेंबर, 2014 दिलेल्या एकूण वेतनाचे / पगाराच्या 8.33 टक्के

दराने होणारी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून विहित पध्दतीने लेखी हमीपत्र घेऊन आदा करणेत आलेली आहे.

तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक 13 ऑक्टोबर,2014 रोजीचे आदेशातील निर्देशानुसार, मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने प्रतिज्ञापत्र सादर करणेकामी मा. शासनस्तरावर उचित कार्यवाही करणेबाबत कळविणेत आलेले आहे.

**(क)** तरी आता, उपरोक्त **परिच्छेद अ व ब** मध्ये नमुद केलेनुसार, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक 13 ऑक्टोबर, 2014 रोजीचे आदेशानुसार, संस्थान प्रशासनामार्फत, संस्थान आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना आदा करणेत आलेल्या सन 2014 दिपावली सानुग्रह अनुदानास, याकामी करण्यात आलेल्या उचित खर्चास तसेच करणेत आलेल्या कार्यवाहीस मा. त्रिसदस्यीय समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक 13 ऑक्टोबर, 2014 रोजीचे आदेशानुसार, संस्थान प्रशासनामार्फत, संस्थान आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना देण्यात आलेल्या सन- 2014 दिपावली सानुग्रह अनुदानास तसेच याकामी करण्यात आलेल्या उचित खर्चास व कार्यवाहीस मा.खंडपीठामधील १३२८४/२०१३ चे निकालाचे अधीन राहून कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.०८ संस्थान आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत असणा-या शासकीय अधिका-यांचे महिन्याच्या दुस-या व चौथ्या शनिवारचे कामकाज व अनुज्ञेय सरकारी सुट्यांबाबत.**

**प्रस्ताव-** अ) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील निर्णय क्रं. समय-1088/19/अठरा (र.व.का), दि.31 ऑगस्ट 1988 अन्वये "शासकीय कार्यालयांची कामकाजाची वेळ" या शीर्षाखाली करणेत आलेल्या निर्णयात खालील प्रमाणे नमूद करणेत आलेले आहे.

2."... पुर्वी ज्या प्रशासकीय कार्यालयांना 5 दिवसांचा आठवडा वरील आदेशाप्रमाणे लागू केला आहे अशी शासनाची सर्व प्रशासकीय कार्यालये, दिनांक 1 सप्टेंबर, 1988 पासून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी बंद राहतील व इतर सर्व शनिवार पूर्ण वेळ चालू राहतील."

3. "ज्या शासकीय कार्यालयांना कारखाना अधिनियम किंवा औद्योगिक विवाद अधिनियम लागू आहे किंवा ज्यांच्या सेवा अत्यावश्यक म्हणूत

समजल्या जातात अशा कार्यालयांना व शासकीय महाविद्यालये, तंत्र निकेतने यांना हे आदेश लागू राहणार नाहीत. अशा कार्यालयांची यादी सोबत जोडली आहे. ही यादी केवळ विवादीकरणात्मक (Illstrative) आहे, संपूर्ण (exhausting) नाही. "

उपरोक्त शासन निर्णयानुसार प्रशासन शाखा, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी जा.नं.एसएसएस/ वशी-01/ 4152/2008 दि.31/12/2008 रोजीचे आदेशाने, शिफ्टमधील तसेच मंुबई कार्यालयाच्या कामाचे वेळे व्यतिरिक्त संस्थानचे सर्व विभागांची कार्यालयीन कामकाजाची वेळ सकाळी 10.00 ते दुपारी 01.30 व दुपारी 02.00 ते सायंकाळी 06.00 अशी निश्चित करण्यात आलेली आहे. सध्या याप्रमाणेच कार्यालयीन दैनंदिन कामकाज सुरु आहे.

ब) सध्या संस्थान आस्थापनेवर खालील पदांवर शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत.

1. कार्यकारी अधिकारी.
2. उपकार्यकारी अधिकारी.
3. मुख्यलेखाधिकारी (लेखाशाखा)
4. संरक्षण अधिकारी (संरक्षण विभाग)

उपरोक्त पैकी सध्या संरक्षण अधिकारी या पदावर शासकीय अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती करणेत आलेली नाही, तथापी सदरची नियुक्ती प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रतिनियुक्तीवर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना संस्थान कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने अनुज्ञेय असलेल्या सरकारी सुट्या आहे त्याच दिवशी घेणे अथवा देता येणे शक्य नाही.

सदरच्या सुट्या प्रशासकीय कामकाजाच्या सोईनुसार अन्य दिवशी देणेत येतात. तसेच प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी संस्थानचे कार्यालयीन कामकाज पूर्णपणे बंद ठेवणे शक्य नाही. अशावेळी कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांचे पैकी शक्यतोवर किमान एकजण मुख्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांनी आपसात नियोजन करुन तसेच उर्वरीत उपरोक्त अधिकाऱ्यांनी आपल्या कामकाजाचे यथोचीत नियोजन करुन अनुज्ञेय असलेल्या सरकारी सुट्या व शासकीय परिपत्रकाप्रमाणे प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्याशनिवारी अनुज्ञेय सुट्टी (off) मंजुर करता येईल, असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त सुचवलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---------------------------------------------------------------------------------------------------------------
-------------------------------

**विषय नं.०९ संस्थान आस्थपनेवरील कर्मचा-यांनी संस्थान व्यवस्थापनाचे पूर्वपरवानगीशिवाय श्री साईंचे जीवनकार्याविषयी लेखन साहित्य, ऑडीओ-व्हीडीओ सीडीज् तसेच संस्थान विषयक इतर माहिती प्रकाशित न करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांची ख्याती जगभरात परसलेली असून देशाच्या कानाकोपऱ्यातून तसेच परदेशातून लाखोंच्या संख्येने साईभक्त श्रींच्या देर्शनासाठी येत असतात. श्री साईबाबाविषयी विविध प्रकारच्या प्रसार माध्यमांव्दारे जगभर माहिती दुरचित्रवाणीवर दाखविली जाते.

परंतू असे निदर्शनास आले आहे की, संस्थानचे काही कर्मचारी हे श्री साईबाबांविषयी स्वतःचे पुस्तक व लेख छापून स्वतःचे नांवे प्रकाशित करतात. तसेच विविध प्रकारच्या ऑडीओ-व्हीडीओ सी.डी तयार करतात अथवा संस्थान विषयी विविध प्रकारची माहिती संस्थान प्रशासनाची पूर्वपरवानगी न घेता प्रसार माध्यमांना पुरवितात सदरची बाब गैरशिस्त वर्तनात मोडते.

त्यामूळे येथून पूढे श्री साईबाबांविषयी पुस्तक छापणे, ऑडीओ-व्हीडीओ कॅसेट तयार करावयाची झाल्यास अथवा विविध प्रकारचे लेख किंवा संस्थान विषयीची माहिती प्रसार माध्यमांना द्यावयाची असल्यास सदरची माहिती मा.कार्यकारी अधिकारी यांची अथवा मा.व्यवस्थापन समितीची रितसर परवानगी घेऊनच प्रसिध्दीबाबत पूढील कार्यवाही होणे गरजेचे आहे.

त्याकामी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांनी प्रशासनाची पूर्व परवानगी न घेता कार्यवाही केल्यास ते गैरकृत्य धरण्यात यावे व तशी अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाने मान्य केलेल्या विनिमयात तरतूद करणेस, तसेच संस्थान कर्मचाऱ्यांना परिपत्रकाव्दारे कळविणेबाबत प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---------------------------------------------------------------------------------------------------------------
-------------------------------

**विषय नं.१० जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांनी जा.क्र.१३१२/१/जिसैकका-३/३८२८ दि.२०/९/२०१४ चे पत्राने सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास आर्थिक मदतीबाबत खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

भारतीय सरहद्दीवर तसेच देशांतर्गत मोहिमेमध्ये दरवर्षी सैनिक विरगती प्राप्त होतात. तसेच असंख्य जखमी व अपंग होतात. त्या सैनिकांनी केलेल्या बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी डिसेंबर महिन्यात सर्वत्र ध्वनदिन साजरा करण्यात येऊन ध्वजदिन निधी संकलित करण्यात येतो. सदर निधीचा विनीयोग युध्दात शहिद होणा-या विरांच्या व अपंगत्व आलेल्या सैनिकांच्या कुटुंबाकरीता कल्याणकारी योजना राबविण्यासाठी आणि पुर्नवसनासाठी केला जातो. महाराष्ट्र शासनाकडून अहमदनगर जिल्हयास या वर्षीचे उदिष्ट रुपये १.३० कोटी ठरवून देण्यात आलेले आहे.सदरचे उदिष्ट पुर्ततेसाठी श्री साईबाबा संस्थानकडून रुपये ११ लाख मदत मिळावी.

**अधिनियमातील तरतुद-**

सन २००४ चा अधिनियम १७(२)(ण) मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देणे तसेच अधिनियम क्र.१७(६) या अधिनियमाच्या तरतुदीस अधिन राहुन समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्य व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील अशी तरतुद आहे.

**मागील वर्षाची कार्यवाही-**

मागील वर्षी मा.व्यवस्थाप समितीचे दि.८/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६७ अधिनियमातील तरतुदीनुसार मागील वर्षाप्रमाणे कर्मचा-याकडून रक्कम कपात करुन जमा होणारी रक्कम व उर्वरित संस्थानची रक्कम असे रुपये ११ लाख जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना देण्यास मान्यता दिलेली होती.

व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार अधिकारी व कर्मचारी यांचेकडून खालीलप्रमाणे रक्कम त्यांचे वेतनातून कपात करण्यात आलेली होती.

| अ.नं. | वेतनबॅन्ड | वसुल करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी | ३००/- |
| २ | १५६००-३९१०० | ३००/- |
| ३ | ९३००-३४८०० | २४०/- |
| ४ | ५२००-२०२०० | १२५/- |
| ५ | ४६५०-१७४०० | १००/- |
| ६ | ४४४०-७४४० | ७५/- |
| ७ | ३६००० ते त्यापुढील रक्कम (फिक्स पे ) | ३००/- |
| ८ | ३१००० ते ३५००० (फिक्स पे ) | ३००/- |
| ९ | २६००० ते ३०००० (फिक्स पे ) | २५०/- |
| १० | २१००० ते २५००० (फिक्स पे ) | २००/- |
| ११ | १०००० ते २०००० (फिक्स पे ) | १००/- |
| १२ | ७५०० (फिक्स पे ) | ७०/- |
| १३ | २००० ते ५५०० (फिक्स पे ) | २५/- |

उपरोक्त तक्यात दर्शविल्याप्रमाणे कम्रचा-याकडून रक्कम कपात करुन रुपये २८९३६०/- एवढी रक्कम जमा झालेली होती व उर्वरीत संस्थानची रक्कम रुपये ८१०६४०/- असे एकुण रुपये ११ लाख रक्कमेचा युनियन बँक,शिर्डीचा चेक क्र.०७०६२ दि.१२/१२/२०१३ जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना दिलेला होता.

**विभागाचा अभिप्राय-** मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांचे दि.२०/०९/२०१४ चे मागणीस अनुसरुन प्रस्तावाबाबत मागील वर्षाप्रमाणे कार्यवाही करावयाची असल्यास संस्थानकडून देय्य होणारी रक्कम रुपये १० लाखापेक्षा कमी राहणार असल्याने त्यास मा.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद यांची मंजुरी घ्यावी लागणार नाही.

प्रस्ताव निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.९३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३)

---

**विषय नं.११ दिवंगत कर्मचारी कै. भाऊसाहेब पोपट पठारे, लिपीक यांच्या मुलांनी प्रवेश घेतलेला कोर्स पुर्ण करण्यासाठी शैक्षणिक शुल्काचा परतावा मिळणे बाबत.**

**प्रस्ताव- शैक्षणिक फीचा परतावा योजनेची प्रस्तावना-**

सन १९७१ (कोर्ट रिसीव्हर) पासून दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो. सध्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ नुसार बालवाडी ते इयत्ता १० वी व आय.टी.आय. च्या शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेच्या दराप्रमाणे देण्यात येतो. तसेच इयत्ता ११ वी ते प्रथम पदवीपर्यंतचा शैक्षणिक शुल्काचा परतावा शासकीय/ शासन अनुदानीत अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येत असलेल्या रकमेच्या मर्यादेपर्यंत देण्यात येत असतो.

**विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांची मंजुरी –**

शासन पत्र क्र. सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा,मंत्रालय मुंबई, दि.१६/०७/२००९ अन्वये सदर योजना व्यवस्थापन मंडळाचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे लागू आहे, त्याच धरर्तीवर ती यापुढेही प्रचलित पध्दतीने चालू राहील अशी मंजुरी दिलेली आहे.

**मा.व्यवस्थापन समिती व उच्च न्यायालयाची मंजुरी-**

सन २०१४-१५ चा शैक्षणिक शुल्कांच्या परताव्यासाठी बजेटमध्ये रुपये ५० लाख रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे. मा.त्रिसदस्य समितीने दि.२६/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.५३९ अन्वये सदरच्या प्रस्तावास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद .खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले होते त्यास अनुसरुन मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांचे सिव्हील अॅप्लीकेशन नं.९२२२/२०१४ पी.आय.एल.नं.१८/२०११, दि.२६/०९/२०१४ चे आदेशाने सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे.

सन २०१४-१५ चा शैक्षणिक शुल्काचा परतावा अदा करण्यासाठी जा.नं.एसएसएस/वशी-६/२१५५/२०१४ दि.१९/०८/२०१४ चे परिपत्रक पारित करुन शैक्षणिक फि परताव्याबाबत कार्यवाही चालू आहे.

**अर्जदाराची मागणी-**

श्रीमती संगिता भाऊसाहेब पठारे ,(कै.भाऊसाहेब पठारे यांची पत्नी ) यांनी दि.२४/०९/२०१४ चे अर्जाने माझे पती ३१ वर्षापासून संस्थान सेवेत होते त्यांचे दि.१६/०९/२०१४ रोजी डयुटीवर असताना हृदयविकाराने निधन झाले आहे. माझे पती घरात एकटेच कमावते होते. मला त्यांच्या शिवाय दुसरे कोणतेच उत्पनाचे साधन नाही. माझे दोन मुले नामे-

१) स्वप्नील भाऊसाहेब पठारे –डिप्लोमा इंजिनिअर- तिसरे वर्ष–सन २०१४-२०१५, शैक्षणिक फि रु.२५,४१०/-

२) रोहिणी भाऊसाहेब पठारे – बी.एच.एम.एस. – दुसरे वर्ष –सन २०१४-२०१५, शैक्षणिक फि रुपये

३५,०००/- व होस्टेल,मेस, पुस्तके रुपये ३२,०००/- एकुण रुपये -६७,८००/-

वरीलप्रमाणे स्वप्नीलचे चालू वर्ष हे शेवटचे वर्षे असून कुमारी रोहिणीचे वैदयकिय शिक्षणाचे चालू वर्ष व यानंतरचे तिसरे व चौथे वर्ष या सर्व शिक्षणासाठी साधारण रुपये २,२८,८१०/- खर्च अपेक्षित आहे. सदरची फि भरणे माझ्या अवाक्याबाहेर असून मी जर फि भरली नाही तर माझे मुले शिक्षणापासून वंचित होतील. तरी मे.साहेब यांनी माझ्या मुलांचा शैक्षणिक फि परतावा यापुढेही दरवर्षी नियमाप्रमाणे मिळण्याची विंनती केली आहे.

**विभागाचा अभिप्राय –** कै.भाऊसाहेब पठारे हयात असतांना सन २०१४-२०१५ या शैक्षणिक शुल्काचा परतावा देणेसाठी दि.१९/०८/२०१४ रोजी परिपत्रक पारित करण्यात आलेले असल्यामुळे पठारे यांच्या मुलांचा चालू वर्षाचा शैक्षणिक फि परताव्याची रक्कम संस्थान नियमाप्रमाणे खालीलप्रमाणे मंजुर करण्यात आलेली आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| स्वप्निल भाऊसाहेब पठारे | डिप्लोमा इंजिनियर (शेवट वर्ष) २०१४-२०१५ | शिक्षण फी रु.६,०००/- | परिक्षा फि- रु.४१०/- | एकुण देय्य फि रु.६,४१०/- |
| रोहिणी भाऊसाहेब पठारे | बी.एच.एम.एस (दुसरे वर्ष) २०१४-२०१५ | शिक्षण फी- रु.१५,०००/- | मागणी नाही | एकुण देय्य फि रु.१५,०००/- |

**<u>पुढील वर्षाच्या शैक्षणिक फि बाबत निर्णय घेणे -</u>**

०१) स्वप्निल भाऊसाहेब पठारे यांचे ही शेवटचे वर्ष असलयाने त्याच्या पुढील वर्षाच्या शैक्षणिक फि चा सबंध येत नाही.

२) रोहिणी भाऊसाहेब पठारे हिचे वैदयकिय शिक्षण पुढे दोन वर्ष शिल्लक असल्याने त्यासाठी प्रति वर्ष शिक्षण फि रुपये १५,०००/- याप्रमाणे पुढील दोन वर्षासाठी एकुण रुपये ३०,०००/-( रु.तीस हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे.

अर्जदाराच्या मागणीस अनुसरुन मुलीचे वैदयकिय शिक्षण अर्धवट राहू नये याकरीता, मानवतेच्या दृष्टीकोनातुन एक विशेष बाब म्हणून व सदर

प्रस्तावाचा पुर्वोदारण म्हणून उल्लेख केला जाणार नाही. या अटीच्या अधिन राहुन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित आहे, परंतु सध्या अस्थायी समिती अस्तित्वात असल्यामुळे धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नाही, त्यामुळे सदरचा विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०६)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१२ श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१४ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणोबबत.**

**प्रस्ताव-** श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१४ मधील खर्चाकरीता मा.त्रिसदस्यीय समितीचे दि ५/६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४३८ अन्वये एकुण रुपये ४२,७००००/-चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१४ साठी प्रत्यक्षात खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ. नं | तपशील | अंदाजपत्रकातील मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतुदीपेक्षा जादा खर्च | तरतुदीपेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप, कमानी, स्टेज व इतर | ९३५०००.०० | २७२८८४.०० | ०.०० | ६६२११६.०० |
| २ | कलाकार बिदागी (किर्तनकार व निमंत्रीत कलाकार हजेरी कार्यक्रमासह) | ३०६९८०.०० | १७७६९.०० | ०.०० | २८९२११.०० |
| ३ | भक्तांना मिष्टान्न | ७६३७१०.०० | ५५७८०६.०० | ०.०० | २०५९०४.०० |
| ४ | विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च ) | १३००००.०० | ५०२५६.०० | ०.०० | ७९७४४.०० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, ( आश्रयदाते विदेशी भक्तांसह ) | १३०००००.०० | १२८०४२१.०० | ०.०० | १९५७९.०० |
| ६ | जादा कर्मचारी स्वयसेवक (विदयार्थी) मानधन | २५००००.०० | १४४३२२.०० | ०.०० | १०५६७८.०० |
| ७ | इतर खर्च-मंदिर रंगकाम, | १५९३१०.०० | २१४९०.०० | ०.०० | १३७८२०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | फर्निचर भाडे, रंग मटेरियल ) | | | | |
| ८ | पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था खर्च (टॅकर डिझेलसह) | २२५०००.०० | १९७७५.०० | ०.०० | २०५२२५.०० |
| ९ | मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन | २०००००.०० | ०.०० | ०.०० | २०००००.०० |
| १० | प्रथोमोपचार केंद्राकरीता तातडीचे औषध खरेदी | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | | **४२७००००.००** | **२३६४७२३.००** | **०.००** | **१९०५२७७.००** |

उपरोक्त तपशील पाहता श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१४ करीता ४२७००००/- रुपये ( बेचाळीस लाख सत्तर हजार) मात्र मंजूर करण्यात आलेली होती. या उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकूण रुपये २३६४७२३/- (तेवीस लाख चौसष्ट हजार सातशे तेवीस मात्र ) खर्च झालेला आहे.

तरी सदरचे एकुण खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित खर्चास मा.उच्च न्यायालयामधील सिव्हील अर्ज क्र.५८१९/ २०१४ वरील दि.०४.०७.२०१४ रोजीचे आदेशान्वये मान्यता मिळालेली असल्यामुळे उपरोक्त प्रस्तावास व झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१३ खुले नाटयगृहास व त्यासमोरील जागेत भजनाचे कार्यक्रमास परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.ए.एन.रेड्डी, हैद्राबाद यांना खुले नाटयगृह समोरील जागेत भजनाचा कार्यक्रमास परवानगी बाबतचा प्रस्ताव दि.२८/०८/२०१४ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता. दि.२८/०८/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.६९७ "खुल्या नाटयगृहाच्या जागेबाबत संपुर्ण माहितीची टिपणी संबंधीत विभागाकडून मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावी" असा पारीत झालेला आहे. खुले नाटयगृहाचे जागेबाबतची माहिती पुढील प्रमाणे-

मौजे शिर्डी, ता.राहाता येथील सिटी सर्व्हे नंबर ९३,क्षेत्र ९३.७ चौ.मी.ही जागा मा.महाराष्ट्र शासन यांचे मालकीची असून ती शिर्डी शहराच्या मध्यवर्ती भागात व्दारकामाई समोर आहे. पुर्वी सदर जागा शिर्डी नगरपंचायत,शिर्डी

(पुर्वीची ग्रामपंचायत ) यांचे ताब्यात होती. या जागेत नगरपंचायतीचे खुले नाटयगृह असून या ठिकाणी पूर्वी वाचनालय होते.

दि.२४/०८/२००९ रोजी शिर्डी नगरपंचायतीने खुले नाटयगृह हि इमारत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या ताब्यात दिलेली आहे. संस्थानने या जागेचा ताबा घेतलेला आहे.

सध्या संस्थानमार्फत खुले नाटयगृह ही इमारत, इमारतीसमोरील परिसराची जागा शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मंडळ यांना त्यांचे मागणीनुसार धार्मिक, सांस्कृतिक इ.कार्यक्रमासाठी शिर्डी पोलीस स्टेशन व शिर्डी नगरपंचायत यांचे नाहारकत दाखल्यास अधिन राहुन तात्पुरती परवानगी देण्यात येते.

मा.जिल्हाधिकारी यांनी त्यांचेकडील दि.७/०९/२००७ रोजीचे आदेशानुसार सदरची जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना सुशोभिकरण करण्यास दिलेली आहे. परंतु सदरचे जागेवर महाराष्ट्र शासन यांचे नाव कायम राहुन शासनाची मालकी राहिल अशा अटी व शर्तीनुसार संस्थानकडे दिलेली आहे. खुले नाटयगृह इमारत ही व्दारकामाई मंदिर जवळ असल्याने हजारो संख्येने साईभक्त येवुन ये-जा करत असतात. त्यामुळे या जागेवर सुशोभिकरण करुन या ठिकाणी शिल्प उभारणीस, या जागेचे सुशोभिकरण करणेस दि.२५ नोव्हेबर २००६ रोजी तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेली आहे.

यापुर्वी ए.एन.रेड्डी,हैद्राबाद, श्री.पारस जैन, शिर्डी, राजु मल्हन,दिल्ली, मदनलाल धिग्रा, दिल्ली, श्री.गणेश दळवी,शिर्डी,रुबी शर्मा, दिल्ली, श्री.पवन वर्मा, दिल्ली, हिंदु गर्जना ग्रामस्थ संघटना, शिर्डी, श्री सदगुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर यांना साईभजन संध्या, सांस्कृतिक कार्यक्रम, आयुर्वेदिक शिबीर इ.साठी परवानगी देण्यात आलेली होती.

श्री.ए.एन.रेड्डी,हैद्राबाद यांनी आपले कडील १५/०७/२०१४ रोजीचे अर्जान्वये कळविले आहे की " आम्ही गेल्या ७ ते ८ वर्ष दरवर्षी डिसेंबर महिन्यात संस्थान मंदिर परिसरातील लेंडीबागेत भजनाचा कार्यक्रम करीत असतो. संसथानकडून आम्हांला दरवर्षी याकामी परवानगी दिली जाते. त्याबद्दल आम्ही आपले अत्यंत आभारी आहोत. संस्थानने मागील ४ वर्षापासून आम्हाला व्दाराकामाई समोरील खुले नाटयगृहाजवळची जागा आम्हांला भजनासाठी दिली होती. त्याप्रमाणेच चालूवर्षीही डिसेंबर महिन्यात २४ तारखेपासून ३१ तारखेपर्यत मागीलवर्षीच्याच जागेवर भजन करण्याची परवानगी मिळावी ही नम्र विनंती. तसेच याकामी संस्थानकडून साऊंड सिस्टीम, इलेक्ट्रीक कनेक्शन, मंडप व साईभक्त निवासस्थानामध्ये  साधारण ४०० साईभक्तांसाठी खोल्या, त्यांना जेवण तयार करण्यासाठी मागील वर्षीप्रमाणे जागा मिळावी ही विनंती."

दि.१०/०१/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीची दि.२० डिसेंबर ते ३१ डिसेंबर पर्यत त्यांचे मार्फत लेंडीबागेत आयोजित करण्यात येणा-या नाम सप्ताहास कायम स्वरुपी मान्यता देण्यात यावी. अशी या उपसमितीची

शिफारस मान्य करण्यात आली. त्यानुसार ए.एन.रेड्डी यांना सन २००७ पासून ते २००९ पर्यत लेंडी बागेजवळ असलेल्या मोकळया जागेत भजन करण्यास परवानगी देण्यात आली होती.

मा.व्यवस्थान समितीचे दि.०६/०३/२०१० च्या सभेत निर्णय क्र.३१५ नुसार श्री.ए.एन. रेड्डी,हैद्राबाद यांचेसह कोणासही मंदिर परिसरात तसेच लेंडीबागेत भजन व अन्य कार्यक्रमासाठी परवानगी देण्यात येवू नये. असे ठरले आहे. त्यानंतर सन २०१० पासून ते २०१३ पर्यत लेंडीबाग ऐवजी खुले नाटयगृह समोरील जागेत भजन करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

तरी श्री.रेड्डी यांना दिनांक २४/१२/२०१४ ते ३१/१२/२०१४ या कालावधीत खुले नाटयगृह व त्यासमोरील जागेत भजन करण्यास परवानगी देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३६ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.ए.एन.रेड्डी,हैद्राबाद यांना दिनांक २४/१२/२०१४ ते दि.३१/१२/२०१४ या कालावधीत खुले नाटयगृह व त्यासमोरील जागेत भजन करण्यास परवानगी देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१४ विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांच्या हंगामाकरीता अर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.सर्जेराव काटकर व ह.हे.बनकर,श्री.विरभद्र दल,बिरोबा बन,शिर्डी (बिरेगांव बन ) यांनी त्यांचे दिनांक २१/१०/२०१४ रोजीचे अर्जात विरभद्र (बिरोबा ) या दैवताची यात्रा दि. ५/११/२०१४ ते ७/११/२०१४ अखेर बिरोबा बन,शिर्डी येथे मोठया थाटात भरणार असून यात दि.७/११/२०१४ रोजी कुस्ती हगामाही आयोजित केलेला आहे. या कुस्त्यात भाग घेणा-या व विजयी पहिलवानांना वाटण्यासाठी म्हणून मागील वर्षी रु.७५,०००/- रक्कम मिळाली होती. तरी यावर्षी रु.१,००,०००/- ची आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केलेली आहे.

दि.१७/११/२००४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.११९ नुसार एक विशेष बाब म्हणून विरभद्र यात्रा बन, शिर्डी यांना दि.२६/११/२०१४ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हगाम्यासाठी रु.२५ हजार रक्कम श्री.रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून देण्यात यावी, असे ठरल्याप्रमाणे रक्कम देणेत आली होती. तसेच त्यानंतर दरवर्षी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खालीलप्रमाणे रक्कम मंजूर करुन वाटणेत आलेली आहे.

| अ.नं. | सभेची तारीख व निर्णय क्र. | मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| १ | दि.१७/११/२००४, निर्णय क्र.११९ | २५,०००-०० | २४,४९९-०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | दि.५/११/२००५, निर्णय क्र.७१२ | ५०,०००-०० | ४८,१५२-०० |
| ३ | दि.१४/१०/२००६,निर्णय क्र.८६६ | ५०,०००-०० | ४३,५३३-०० |
| ४ | दि.१८/११/२००७, निर्णय क्र.७८२ | ५०,०००-०० | ४९,०२०-०० |
| ५ | दि.३/१/२००८, निर्णय क्र.०४(१९) | ७५,०००-०० | ६४,०८०-०० |
| ६ | दि.७/११/२००९, निर्णय क्र.८६७ | ७५,०००-०० | ६९,५७०-०० |
| ७ | दि.२१/१०/२०१०,निर्णय क्र.९२३ | ७५,०००-०० | ७२,०८०-०० |
| ८ | दि.१४/१/२०१२, निर्णय क्र.१३१ | ७५,०००-०० | ७०,२७०-०० |
| ९ | दि.३०/११/२०१२,निर्णय क्र.९४८ | ७५,०००-०० | ७०,२७०.०० |
| १० | दि.२७/१०/२०१३,निर्णय क्र.८७२ | ७५,०००-०० | ७०,२७०-०० |

दिनांक २७/१०/२०१३ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८७२ नुसार मागील वर्षी सदर कामी रु.७५,०००/- मात्रची आर्थिक मदत संस्थानमार्फत देण्यात आली होती. त्यापैकी रु.७०,२७०/- इतकी रक्कम बिदागी म्हणून वाटली असून उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा-नांवे करण्यात आलेली होती.

विरभद्र दल, बिरोबा यात्रेनिमित्ताने कुस्ती हगामासाठी रु.१,००,०००/- मागणी केलेली आहे. परंतू त्यांना मागील वर्षी प्रमाणे रुपये ७५,००००/- मात्र मंजूर करुन श्री.रामनवमी उत्सव प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पहिलवानांना बिदागी म्हणून रक्कम अदा करुन उर्वरीत रक्कम लेखाशाखेकडे जमा नावे करता येईल.

तरी विरभद्र दल, बिरोबा यात्रेनिमित्ताने कुस्ती हगामासाठी मागील वर्षीप्रमाणे रु.७५०००/- मात्र देणेस मंजुरी असावी हि विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विरभद्र दल, बिरोबा यात्रेनिमित्ताने कुस्ती हगामासाठी मागील वर्षीप्रमाणे रु.७५०००/- मात्र देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू रक्कम संस्थानचा प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पहिलवानांना बिदागी म्हणून अदा करणेत यावी व**

**उर्वरीत रक्कम लेखाशाखेकडे जमा नावे करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१५ शिर्डी महोत्सव- २०१४ साजरा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** चालू वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावी सदरचा दिवस श्रींच्या सानिध्यात जावा या उद्देशाने दरवर्षी ३१ डिसेंबरला भारतातून तसेच परदेशातून मोठया संख्येने साईभक्त शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी येत असतात. श्रींच्या दर्शनापासून कोणीही वंचीत राहू नये म्हणून मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार समाधी मंदीर भक्तांना साईबाबांचे दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवण्यात येत असते. तसेच शिर्डी महोत्सव हा उत्सव सन २००४ पासून सुरु करण्यात आलेला आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री संस्थान परिसरात साईभजन,नृत्य,गायन इ.कार्यक्रमांचे आयोजीत केले जाते या कार्यक्रमासाठी विविध भागातून कलाकार कार्यक्रम सादर करणेसाठी संस्थानकडे अर्ज करतात.

शिर्डी महोत्सव साजरा करणेसाठी संस्थान मार्फत साई भक्तांसाठी धार्मिक, सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

**अ) अंदाजपत्रक –** सन २०१३ चे शिर्डी महोत्सवा करीता झालेल्या व सन २०१४ चे शिर्डी महोत्सवासाठी अपेक्षित खर्चाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **श्री शिर्डी महोत्सव २०१३** | | **श्री शिर्डी महोत्सव अंदाजे खर्च २०१४** |
|---|---|---|---|---|
| | | **अंदाजे खर्च** | **प्रत्यक्ष खर्च** | |
| १ | मंडप, कमानी व स्टेज | ४०,०००-०० | २३,७५०-०० | ६०,०००-०० |
| २ | जाहिरात व बोर्ड | १५,०००-०० | १६२५५-०० | २५,०००-०० |
| ३ | कलाकार मानधन व प्रवास खर्च | २५,०००-०० | ४६१-०० | ५०,०००-०० |
| ४ | इतर किरकोळ खर्च ( मंदीर सजावट, जादा कर्मचारी व इतर खर्च ) | २,५०,०००-०० | ८६,९०२-०० | ३,२५,०००-०० |
| | एकूण खर्च | **३,३०,०००-००** | **१,२७,३६८-००** | **४,६०,०००-००** |

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १३/१२/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र .९८१ अन्वये शिर्डी महोत्सव-२०१३ साजरा करण्यासाठी एकुण रु.३,३०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

**ब) कलाकार निश्चीती–** याहीवर्षी मागील वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सवासाठी दि.३१/१२/२०१४ रोजी निमंत्रीत गायकांचे व कलाकारांचे दि. ३१/१२/२०१४ रोजी

गायन, नृत्य कार्यक्रम आयोजीत करणे निमंत्रित कलाकार यांचे मानधन निश्चीत करावे लागणार आहेत. कार्यक्रम मिळणेबाबत आलेल्या अर्जाचा तपशिलवार तक्ता अलहिदा सादर करण्यात येईल.

**क) कार्यक्रमाचे स्थळ-** मागील वर्षी साईनगर मैदानावर निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वर्षी ही साईनगर मैदानावर निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करता येईल.

शिर्डी महोत्सव -२०१४ साजरा करणेसाठी अंदाजे रु. ४,६०,०००/- ( चार लाख साठ हजार) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी संस्थान मार्फत शिर्डी महोत्सव -२०१४ साजरा करणेस व याकामी येणा-या अंदाजे ४,६०,०००/- खर्चास मान्यता मिळावी

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३८** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मागील उत्सवाप्रमाणे संस्थान मार्फत शिर्डी महोत्सव -२०१४ साजरा करणेस व याकामी येणा-या अंदाजे ४,६०,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, शिर्डी महोत्सव -२०१४ साठी कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विनामुल्य सेवा देणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.१६ सन २०१५ मधील संस्थानमार्फत साज-या होणा-या उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,अधिनियम २०१४ चे कलम नं.१९ मध्ये भक्तमंडळाची तरतुद आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीच्या व्यवस्थापन समितीचे वतीने दरवर्षीश्री रामनवमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव साजरा करण्यात येतात. दरवर्षी श्री रामनवमी, गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवा निमित्ताने भक्तमंडळाचे सभासद, देणगीदार , मा.मंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मान्यवर अधिकारी व शिर्डी ग्रामस्थ यांना निमंत्रण पाठविण्यात येते. माहे सप्टेंबर-२०१४ अखेर १७७३२३ इतके संस्थान भक्तमंडळाचे सभासद आहे. ही संख्या दिवसें दिवस वाढत आहे.

प्रत्येक उत्सवापूर्वी निमंत्रण पत्रिका छपाईकामी दरपत्रके मागविणेस मान्यता घेऊन टिपणी सादर करणे, निमंत्रणपत्रिकेचा मसुदा मान्य करुन घेणे, छपाई (प्रेस) धारक यांचे कडून दरपत्रक मागविणे तुलनात्मक तक्ता तयार करणे, निम्नतम दरधारकास छपाई कामी कार्यादेश देणे, सर्व निमंत्रण पत्रिकांना घडया घालणे, पाकीटावर पत्ते प्रिंट करणे, पाकिटे चिटकविणे, फ्रँकिग करणे, पत्रिकांची राज्याच्या नावानुसार विभागणी करुन पोष्टात टाकणे इ.कामे करावे लागतात.

मागील वर्षी सन -२०१४ मध्ये साजरा करण्यात आलेल्या उत्सवाच्या पत्रिका एकत्रित छपाई करण्यात आलेल्या आहेत. तीन उत्सवाचे निमंत्रण पत्रिका छपाई कामी रु.८,८०,१३२/- मात्र खर्च आलेला आहे.

संस्थान भक्तमंडळाच्या सभासंदांना व मान्यवरांना प्रत्येक उत्सवाचे निमंत्रण पाठविले जाते. संस्थान भक्तमंडळ सभासद हे संपुर्ण जगभर आहेत. या मध्ये कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यात हजारो सभासद संख्या आहेत.

संस्थानमार्फत छपाई करण्यात येणा-या पत्रिका हया आर्ट पेपरवर ( 90 GSM ) या कागदाच्या प्रकारावर छपाई करता येईल.

पत्रिका छपाई कामामध्ये पत्रिकेचा मसुदा अंतिम करणे, छपाईधारकांस कार्यादेश, देणे,छपाई झालेनंतर पत्रिका शिर्डी पोहच आले नंतर पत्रिके मध्ये उदी-प्रसाद भरणे, स्टिकर वर प्रिन्ट केलेले पत्ते पाकीटावर चिकटवणे, राज्यांच्या नावाप्रमाणे विगतवारी करणे. पोस्टात टाकणे ही प्रकिया वेळ लागणारी आहे. निमंत्रण प्रत्रिका निमंत्रकांना वेळेत पोहच होणे आवश्यक आहे.

सन-२०१५ साठी पत्रिका छपाई करणेसाठी काढण्यात येणा-या निविदा दरपत्रकांमध्ये पुढील बाबी विचारात घेता येतील. या मध्ये पत्रिका, पाकीट छपाई करणे,पाकीटावर साईभक्तांचे, निमत्रकांचे पत्ते प्रिन्ट करणे, पत्रिकेची घडी घालून पत्रिका पाकीटात भरुन देणे. पाकीटांना गमटेप वापरणे. या मुद्दयांचा समावेश करता येईल. यामुळे निमंत्रकांना वेळेत पत्रिका पोहच होण्यास मदत होईल व वेळ वाचेल असे नम्र मत आहे.

वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणे, उत्सवाच्या पत्रिका, पाकीटे छपाई करणे, याकामी अंदाजे रु.१५,००,०००/- (रु.पंधरा लाख ) मात्र खर्च अपेक्षित आहे.

सन-२०१५ मधील संस्थान मार्फत साज-या करण्यात येणा-या उत्सवासाठी पत्रिका , पाकीटे छपाई करणे, वर्तमानपत्रात जाहिरात/ निविदा प्रसिध्द करणे या कामासाठी येणा-या अंदाजे रु.१५,००,०००/- (रु.पंधरा लाख ) मात्र खर्चास मंजूरी मिळावी ही विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.९३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींच्या तीनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका आवश्यकतेनुसार त्या-त्या उत्सवाच्या वेळेस उपसमिती सभेच्या मान्यतेने छपाई करुन घेण्यात याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१७ श्री.रामराव रंभाजी शेळके, अधिक्षक, मंदिर विभाग यांचा दि.१६.१०.२०१४ रोजीचा निलंबन रद्द होणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री.रामराव रंभाजी शेळके, अधिक्षक, मंदिर विभाग हे डयुटीवर असतांना त्यांचेकडून खालीलप्रमाणे गैरशिस्तवर्तन घडलेले आहे.

श्री.रामराव रंभाजी शेळके, अधिक्षक, मंदिर विभाग यांचे खालील गैरशिस्त वर्तनाबाबत दि.२१-१०-२०१४ रोजीची टिपणी सादर केलेली होती.

1) दि.२१-०८-२०१४ रोजीचे प्रभात या दैनिकात शिर्डी साईमंदिरात फोटोसेशन, ठरवाला हरताळः अधिका-यांचा आशिर्वाद, प्रशासन सुस्त या मथळयाखाली बातमी/निवेदन प्रसिध्द झालेले होते.

2) श्री.मनोहर दासगुरु पाठक, पुजारी, मंदिर विभाग यांनी दि.२५-०८-२०१४ रोजीचा तक्रार अर्ज दिलेला असून त्यात त्यांनी 'मानसिक त्रासाबद्दल मंदिर प्रमुखाची चौकशी करण्याबाबत.' असे म्हटलेले आहे.

3) दक्षिण दरवाज्यावरील अनागोंदी व श्री.रामराव शेळके यांचे कार्यपध्दतीबाबत. जा.क्रं.बीडीडीस/मंदिर सुरक्षा/१५/२०१४ दि.३०-०८-२०१४ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

4) आरतीचे वेळी श्री साईबाबांना नैवेद्य दाखविणेकामी नैवेदय ताट ठेवणेची प्रचलित पध्दत आहे. परंतू त्यांनी अनाधिकारे आरतीचे वेळी नैवेद्य ताटास पार्टीशन लावणेची पध्दत नसतांना त्यांना नैवैदय ताटास दि.१२-०६-२०१४ रोजी दुपारी १२.०० वा.माध्यान्ह आरतीचे वेळी पार्टीशन लावलेले असल्याचे निदर्शनास आले आहे.याबाबत त्यांना जा.क्रं.एसएसएस/वशी-७ए/२५०६/२०१४ दि.०६-०९-२०१४ अन्वये श्री.शेळके यांना 'सक्तताकिद' आदेश दिलेला आहे.

परंतू सदरचा 'सक्तताकिद' आदेश श्री.शेळके यांनी स्विकारणेस नकार दिेलेला आहे याबाबत प्र.अधिक्षक यांनी दि.१०-०९-२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.यावरुन त्यांनी वरिष्ठांचे आदेशाचा अवमान केलेला आहे असे दिसून येते.

अशाप्रकारे श्री.रामराव रंभाजी शेळके,अधिक्षक,मंदिर विभाग यांची उपरोक्तप्रमाणे वरिष्ठांच्या कोणत्याही कायदेशिर वाजवी हुकूमाच्या बाबतीत,दुस-याच्या जोडीने असो कि नसो,जाणूनबूजून उद्दामपणा करणे किंवा त्यांचे पालन न करणे.,आस्थापनेच्या जागेत शिस्तीलाव सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्य करणे किंवा त्यांचे ऑर्डर्स अनुसारचे आरोपपत्र,आदेश किंवा इतर पत्र घ्यावयास नकार देणे इ.कृत्ये दि इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (सॅन्डींग ऑर्डर्स) अॅक्ट १९४६ चे कलम नंबर २२ (ए),२२ (एल) व २२ (एक्स) अन्वये गंभीर गैरशिस्तवर्तनात मोडतात. सदर गैरशिस्तवर्तन श्री.शेळके यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवणेत आलेले असून त्यांना खातेचौकशी करणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२८७३/२०१४ दि.२५-०९-२०१४ अन्वये आरोपपत्र बजाविणेत आलेले आहे.

श्री.शेळके यांचे विचाराचे गांर्भीय विचारात घेता त्यांना खातेचौकशी पुर्ण होवून निर्णय होईपर्यंत जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/३१८७/२०१४ दि.०६-१०-२०१४ अन्वये संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा सेवा निलंबीत करणेत आलेले आहे.

त्यानंतर श्री.शेळके यांनी दि.१६-१०-२०१४ रोजीचा विनंती अर्ज मा.जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर, सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेकडेस सादर केलेला असून त्यात त्यांनी,' विनंती पुर्वक अर्ज करतो कि, मी मंदिर विभागामध्ये अधिक्षक या पदावर काम करीत आहे.मला पत्रान्वये खाते चौकशीकरीता तीन महिन्याचा कालावधी देण्यात आलेला होता. परंतू त्यानंतर लगेच संस्थान सेवेतून तात्पुरते सेवानिलंबीत करण्याचा आदेश करण्यात आलेला आहे.तरी माझा सेवा निलंबनाचा आदेश रद्द करुन मला कामावर पुर्ववत कामावर घेणेस विनंती आहे.' असे म्हटलेले आहे.

सदरचे विनंती अर्ज मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी संस्थानचे बैठकित ठेवणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी त्वरीत सादर करणेचे निर्देश दिेलेले आहेत.

सबब, श्री.रामराव रंभाजी शेळके, तात्पुरते सेवा निलंबीत अधिक्षक, मंदिर विभाग हे चौकशी कामात पुर्ण सहकार्य करतील. तसेच चौकशी कामात हस्तक्षेप अथवा दबावाचा अवलंब करणार नाहीत या अटिच्या अधिन राहून त्यांना स्वंतत्र्य विभागात पुर्नस्थापना देता येईल. तरी श्री.शेळके यांचे निलंबन रद्द करुन घ्यावयाचे किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९४०** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रामराव रंभाजी शेळके, अधिक्षक, मंदिर विभाग यांनी दि.१६.१०.२०१४ रोजीचे अर्जाद्वारे निलंबन रद्द होणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१८** **श्रींचे शताब्दी महोत्सव २०१७-१८ कालावधीतील नियोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे समाधीस सन-२०१७-१८ मध्ये १०० वर्ष होत असल्याने श्रीपुण्यतिथी उत्सव-२०१८ चे कालावधीत संस्थानमार्फत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांचे नियोजन करणेपुर्वी या महाउत्सवाचे कालावधीत साज-या करण्यात येणा-या कार्यक्रमाचे स्वरुप काय असावे याबाबत मंदिर विभागाचे संदर्भीय मंजुर टिपणीअन्वये वेगवेगळ्या कल्पना/ सूचना मांडण्यात आल्या होत्या. तसेच या टिपणीवरील अभिप्रायानुसार याबाबत प्रेसनोट देऊन व वेबसाईटवर खालीलप्रमाणे माहिती देऊत्सव कशाप्रकारे साजरा केला जावा याबाबत भक्तांच्या कल्पना/ अभिप्राय मागवावे असे वाटते.

**श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

पोष्ट: शिर्डी ४२३ १०९, ता.राहाता, जि.अहमदनगर, महाराष्ट्र(भारत)
दुरध्वनी-०२४२३- २५८५०० फॅक्स- ०२४२३-२५८७७०> टेलिग्राम-
साईनाथ, शिर्डी
Website-www.shrisaibabasansthan.org.in, Email ID-
saibabasansthan@sai.org.in

---------------------------------------------------------------------------------------------------

**सर्व साईभक्तांना विनम्र आवाहन**

श्रीसाईबाबांनी श्रीक्षेत्र शिर्डी येथे विजयादशमी (दसरा)चे दिवशी मंगळवार, दि.१५ ऑक्टोबर, १९१८ रोजी महासमाधी घेतली असून या घटनेस सन-२०१८चे विजयादशमीस १०० वर्षे पुर्णा होत आहे. दरवर्षी संस्थानमार्फत विजयादशमीचे कालावधीत श्रीपुण्यतिथी उत्सव साजरा केला जातो. त्यामुळे श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत श्रीपुण्यतिथी उत्सव-२०१८ चे कालावधीमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन आहे. तरी सर्व साईभक्तांना विनम्र सुचना करण्यात येते की, त्यांना या कालावधीत साज-या करावयाचे कार्यक्रमाबाबत/ कार्यक्रमाचे स्वरुप काय असावे? याबाबत सुचना करावयाची असल्यास संस्थानचे वेबसाईटवर मार्गदर्शक पर काही सुचना नमूद केल्या आहेत. या प्रकारे किंवा याशिवाय सुचना कराव्यात व आपल्या सुचना पंधरा दिवसाचेआत श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे इ-मेलद्वारे पाठविण्याचे करावे. इ-मेल आय.डी सोबत दिला आहे.

**कार्यकारी अधिकारी,**
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,
शिर्डी

तरी वरीलप्रमाणे जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत स्थानिक तसेच देशाचे तसेच सर्व राज्यांचे राजधानीचे तसेच मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपुर याठिकाणाहुन प्रसिद्ध होणारे वर्तमानपत्रामध्ये मराठी/ इंग्रजी भाषेमध्ये देणेस, तसेच संस्थानचे वेबसाईटवर प्रसिद्ध करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळावी. तरी त्याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.९४१ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली व झालेल्या चर्चेनुसार फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१९ तीन प्रवासी बसेसचे स्कुल बसेसमध्ये रुपांतर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील खालील तपशिलातील 09 बसेसचा वापर श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे विद्यार्थी शाळेत ने-आण करणे कामी होत आहे.

| अ.नं. | बस क्र. |
|---|---|
| 01 | MH-17-C-8851 |
| 02 | MH-17-K-9370 |
| 03 | MH-17-T-8501 |
| 04 | MH-17-T-8502 |
| 05 | MH-17-T-8503 |

| अ.नं. | बस क्र. |
|---|---|
| 06 | MH-17-T-3101 |
| 07 | MH-17-T-3102 |
| 08 | MH-17-T-3103 |
| 09 | MH-17-T-3104 |

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांचेकडील दि.04/10/2014 रोजीची मंजुर टिपणीनुसार, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे विद्यार्थी संख्या तसेच शालेय विद्यार्थी सुरक्षितता व वाहतूकीचे नियम विचारात घेता शाळेकरीता सध्या वाहन विभागाकडील अतिरीक्त 03 बसेस Change of Use ला RTO कडून मान्यता घेऊन स्कुलबस म्हणुन वापरात आणने कामी त्यानुसार अनुशंगिक कार्यवाही वाहन विभागाने करावी, असे मा. कार्यकारी अधिकारी महोदय यांनी निर्देश दिलेले होते.

वाहन विभागाकडे सध्या खालील प्रमाणे 03 अतिरीक्त प्रवासी बसेस असुन सदर बसेस स्कुलबस मध्ये रुपांतरीत करावयाचे झाल्यास आर.टी.ओ. कार्यालयाचे नियमानुसार, (स्कुलबस नियम-2011) स्कुलबस करीता बाहेरील बाजुने पिवळा रंग व वाहनाच्या खिडकीखाली सर्व बाजुनी 150 मिलीमिटर रुंदीचा विटकरी पट्टा रंगविलेला असणे बंधनकारक आहे. तसेच वाहनास परवाना (परमिट) देते वेळी स्कुलबसला स्पीड गव्हर्नर बसविणे, खिडक्यांना जाळी बसविणे व विद्यार्थांच्या स्कुलबॅग ठेवणे करीता लगेज रॅक बसविणे व इतर अनुशंगिक बदल करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | बस क्रमांक | कंपनी | खरेदी दिनांक |
|---|---|---|---|
| 01 | MH-17-K-9371 | टाटा-1510 बस | 11/11/2004 |
| 02 | MH-17-T-9501 | अशोक लेलँड बस | 13/07/2007 |
| 03 | MH-17-T-9502 | अशोक लेलँड बस | 13/07/2007 |

वरील प्रमाणे अ.नं.01 ची बस दि.11/11/2004 रोजी खरेदी करण्यात आलेली असुन बस खरेदीचे वेळी हिरवा कलर देण्यात आलेला आहे. तसेच अ.नं.02 व 03 या दोन बसेस दि.13/07/2007 रोजी खरेदी करण्यात आलेली असुन बस खरेदीचे वेळी सफेद कलर देण्यात आलेला होता.

उपरोक्त प्रमाणे 03 प्रवासी बसेसचे स्कुलबसमध्ये रुपांतर करणे कामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे खर्च (रु.) |
|---|---|---|
| 01 | नवीन कलर करणे कामी खर्च | 49,000.00 |
| 02 | खिडक्यांना जाळी बसविणे व लगेज | 10,000.00 |

| | | |
|---|---|---|
| | रॅक बसविणे खर्च | |
| 03 | दोन बसेसला स्पीड गव्हर्नर बसविणे कामी खर्च | 23,000.00 |
| 04 | आर.टी.ओ. टॅक्स व परमिट खर्च | 15,000.00 |
| 05 | इतर किरकोळ खर्च | 3,000.00 |
| | **अंदाजे अपेक्षीत एकुण खर्च** | **1,00,000.00** |

**मागणी-** आर.टी.ओ. कार्यालयाचे नियमानुसार, 03 बसेसला नवीन कलर करुन घेणे, खिडक्यांना जाळी बसविणे व विद्यार्थ्यांच्या स्कुलबॅग ठेवणे करीता लगेज रॅक बसविणे तसेच 02 बसेस करीता स्पीड गव्हर्नर बसविणे व इतर अनुशंगिक बदल करणे कामी अंदाजे रु.1,00,000/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख मात्र) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** वाहन विभागाकडील बस क्रमांक MH-17-K-9371, MH-17-T-9501 व MH-17-T-9502 या तिन प्रवासी बसेस स्कुलबसमध्ये रुपांतरीत करणे कामी आर.टी.ओ. कार्यालयाचे नियमानुसार आवश्यक ते बदल करुन घेणेस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु.1,00,000/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख मात्र) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील बस क्रमांक MH-17-K-9371, MH-17-T-9501 व MH-17-T-9502 या तिन प्रवासी बसेस स्कुलबसमध्ये रुपांतरीत करणेत याव्यात. तसेच त्यासाठी आर.टी.ओ. कार्यालयाचे नियमानुसार बसेसमध्ये आवश्यक ते बदल करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.1,00,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२० नवीन एक अॅपे रिक्षा देणगी स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.05/06/2014 रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.405 नुसार, श्री साई प्रसादालय करीता आवश्यक असलेली अॅपे रिक्षा देणगीदार साईभक्तांकडून देणगी दाखल मिळणेसाठी प्रयत्न करावेत. देणगीदाखल मिळत नसल्यान संस्थानमार्फत खरेदी करणेकामी पियाजिओ कंपनीचे अधिकृत डिलर्स यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या रु.2,10,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती.

दि.20/10/2014 रोजी राजराजेश्वरी एजन्सीज, मंचरीयाल (आंध्रप्रदेश) चे मालक साईभक्त, श्री पुल्ला राव यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता एक अॅपे रिक्षा देणगी दिलेली आहे. सदर वाहनाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| वाहनाचा तपशिल | किंमत | टॅक्स व | एकुण रक्कम |
|---|---|---|---|

| | | विमा खर्च | (रु.) |
|---|---|---|---|
| PIAGGIO-APE CARGO D600 PICK UP GOLDRN YEL | 1,56,300.00 | 23,700.00 | 1,80,000.00 |

उपरोक्त प्रमाणे राजराजेश्वरी एजन्सीज, मंचरीयाल (आंध्रप्रदेश) चे मालक साईभक्त, श्री पुल्ला राव यांचेकडून दि.20/10/2014 रोजी एक पे रिक्षा वाहन ताब्यात मिळालेले आहे. सदर वाहनाची एकुण किंमत रु.1,80,000/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख ऐंशी हजार) मात्र असुन या वाहनाचा वापर श्री साई प्रसादालय विभागाचे मागणीनुसार मालवाहतुकी करीता करता येईल.

तरी राजराजेश्वरी एजन्सीज, मंचरीयाल (आंध्रप्रदेश) चे मालक साईभक्त, श्री पुल्ला राव यांचेकडून एक पे रिक्षा देणगी स्विकारले बाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे माहिती करीता सादर.

**निर्णय क्र.९४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, राजराजेश्वरी एजन्सीज, मंचरीयाल (आंध्रप्रदेश) चे मालक साईभक्त, श्री पुल्ला राव यांचेकडून एक पे रिक्षा देणगी स्विकारले बाबतची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२१** **बसेसचा टॅक्स भरणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम- 2004 मधील तरतुद:-17 (01), 21 (01-ग, ज).**

**प्रस्तावीक:-** वाहन विभागाकडील बस क्र.MH-17-T -7109 **व** MH-17-T -7110 या दोन बसेसचा वापर साईभक्तांना शिर्डी ते नगरसुल रेल्वेस्टेशन येथे घेऊन जाणे व येणे कामी होत आहे. सदर दोन्ही बसेसच्या वार्षीक टॅक्सची मुदत दि.31/08/2014 रोजी संपुष्टात येत असलेने दर वर्षाप्रमाणे आर.टी.ओ. कार्यालय नियमानुसार तसेच दिलेले परमिट नुसार, वाहनांचा दि.01/09/2014 ते दि.31/08/2015 पर्यंतचा वार्षीक टॅक्स भरणे आवश्यक होते.

वाहन विभागाकडील दि.13/08/2014 रोजीची मंजुर टिपणी नुसार, बस क्र.MH-17-T -7109 **व** MH-17-T -7110 या दोन बसेसचा वार्षिक टॅक्स आर.टी.ओ. कार्यालयात भरणे कामी डेप्युटी आर.टी.ओ., श्रीरामपुर यांचे नांवे लेखाशाखे 'मार्फत रु.5,94,000/-(अक्षरी रक्कम रु. पाच लाख चौऱ्यान्नव हजार) मात्रचा डी.डी डव्हान्स देणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार डेप्युटी आर.टी.ओ., श्रीरामपुर यांचे नांवे लेखाशाखे मार्फत खालील तपशिला प्रमाणे डी.डी घेण्यात येवुन आर.टी.ओ. कार्यालय, श्रीरामपुर येथे जमा करण्यात आला होता.

| अ.नं | बँकेचे नांव | चेक नं./ दिनांक | रक्कम ( रु.) |
|---|---|---|---|
| 01 | भारतीय स्टेट बँक शाखा- | 961005-08/09/2014 | 5,94,000.00 |

| | |
|---|---|
| | शिर्डी | | |

सदर खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.न | वाहन क्रं. | पावती नं./ दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| 01 | एमएच-17/टी-7109 (नगरसुल बस ) | 410024-19/09/2014 | 2,97,000.00 |
| 02 | एमएच-17/टी-7110 (नगरसुल बस ) | 410025-19/09/2014 | 2,97,000.00 |
| **एकुण रक्कम (रु.)** | | | **5,94,000.00** |

उपरोक्त प्रमाणे दोन्ही बसेसचा वार्षीक टॅक्स भरणे करीता रु.5,94,000/- (अक्षरी रक्कम रु. पाच लाख चौऱ्यान्नव हजार) मात्र रक्कम खर्च झालेली आहे.

**मागणी :-** बस क्र.एमएच-17-टी-7109 व टी-7110 या दोन बसेसचा वार्षीक टॅक्स आर.टी.ओ. कार्यालयात भरणे कामी झालेल्या रु.5,94,000/-(अक्षरी रक्कम रु. पाच लाख चौऱ्यान्नव हजार) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आर.टी.ओ. कार्यालयामध्ये एमएच-17, टी-7109 व एमएच-17, टी-7110 या दोन बसेसच्या भरलेल्या रु.5,94,000/- मात्र वार्षीक टॅक्सची नोंद घेण्यात येऊन, झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२२ संस्थानचे नियोजित साईगार्डन प्रकल्पांतर्गत सिव्हील वर्कचे ठेकेदार के.आर.आर.इन्फ्रा प्रा.लि., हैद्राबाद यांचेकडून उर्वरीत दंडाची रक्कम वसुल करणेकामी कायदेशीर कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील संस्थान मालकीच्या गट नं. 198, 199, 200 व 201 मधील एकुण 20 एकर जमीनींमध्ये साई गार्डन प्रकल्पामधील सिव्हील कामांपैकी पहिल्या टप्प्यातील लेजर शो करीता आवश्यक असणारे वॉटरबॉडी, प्रेक्षागृह व इतर अनुषंगीक सोयी-सुविधा ( कार्यालय नियंत्रण कक्ष, प्रसाधनगृहे , संरक्षक भिंत आदि ) चे बांधकाम करणेचे काम ठेकेदार मे. के.आर.आर.इन्फ्रा. प्रोजेक्ट प्रा.लि. हैद्राबाद यांना देण्यात आले होते. सदरचे काम करणेस ठेकेदार असमर्थ ठरल्याने, त्यांना टर्मिनेट करणेत आले आहे. ठेकेदार मे. के.आर.आर.इन्फ्रा. प्रोजेक्ट प्रा.लि. हैद्राबाद यांचेकडून उर्वरीत दंडाची रक्कम रु. 2,11,05,748/- मात्र वसुल करणेकामी तसेच निविदा शर्तीनुसार व आर्किटेक्ट यांचे पत्राने ठेकेदार यांना कळविले प्रमाणे इतर अनुषंगीक दंडात्मक कार्यवाही करणेसाठी बांधकाम

विभागा मार्फत कळविणेत आले आहे. त्यानुसार विधी विभागामार्फत ॲड. एस.डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचे सल्ल्याने दि. 03/12/2013 व दि. 28/03/2014 रोजी ठेकेदार यांना नोटीस पाठविणेत आलेली आहे. सदर नोटीस संबंधीत व्यक्ती परदेशात गेल्याने दि. 11/12/2013 परत आलेली आहे.

त्यानंतर मे.के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद या कंपणीचे अकरा संचालक यांना नोटिस पाठविणेत आल्या त्यापैकी 1) श्री के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद,2) श्री सुधाकर रेड्डी, 3) श्री के. व्हि. सुभा रेड्डी, 4) ऑन सी.एस.टी. रजिस्ट्रेशन सर्टिफिकीट,व 5) के.राघव रेड्डी 6) As per Address on:VAT registration certificate :- No.65,Banagair 4th Main Opp Park Maruti Lay out,Vasanthapura Main Road,Uttarahalli, Subramanayapu, Banglore, 7) As per Address on;CST registration certificate; 6-3-596/89/1, Sarvepalli House, Near IIPM, Naveen Nagar, Khairatabad, Hyderabad 04 यांना पाठविलेल्या नोटीसा देखील परत आलेल्या आहेत.

मात्र प्रस्तुतची नोटीस 1) आर.चंद्रा शेखर रेडड्ी , 2) कुनम रजनी रेडड्ी, 3) कुनम अनिल रेडड्ी 4) इडुकोंडल रेडड्ी अहुला 5) कुनम राघव रेडड्ी यांना पोहोचलेली आहे त्याबाबत कोणतेही नोटीस उत्तर प्राप्त नाही. मे.के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद यांनी व त्यांचे संचालक मंडळाने कुठलाही प्रतिसाद दिलेला नसल्याने, त्यांचे विरुध्द दावा दाखल करणेकामी येणारे स्टॅम्प फी व प्रोसेस फी, वकील फी व इतर अनुशंगीक खर्चास मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे दि. 28/08/2014 रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेत झालेले चर्चेवेळी मा. अध्यक्ष सो. यांनी सदरहू कामाचे निविदेमध्ये Arbitration संबंधी तरतुद असल्याने ती तरतुद व इत्यादीबाबी विचारांत घ्यावी लागेल अशा आशयाची चर्चा झाली आहे. सदर विषयात खालील प्रमाणे ठराव झाला आहे.

निर्णय क्र.709 :- उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार मे.के.आर.आर.प्रा.लि., हैद्राबाद यांचेबरोबर झालेल्या करारातील Arbitration Clause वगैरे सर्व संबंधीत माहितीसह सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा असे, ठरले.

दरम्यानचे काळात दि. 10/09/2014 रोजी प्रशासकीय अधिकारी श्री.एस.एन.गर्कळ, उप अभियंता, श्री डी.एम.देसाई यांनी ॲड. एस.डी. कुलकर्णी यांची कोपरगांव येथील कार्यालयात भेट घेऊन Arbitration Clause बद्दल चर्चा केली. त्यावेळी ॲडव्होकेट यांनी निविदेतील Arbitration Clause नुसार प्रथमत: आर्किटेक्ट यांचेमार्फत ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद यांना नोटीस पाठविणेत यावी असे सांगीतले त्यावेळी ॲडव्होकेट यांनी आर्किटेक्ट श्री उदय काप्रे यांचेशी दुरध्वनीवर चर्चा करुन त्यांना ठेकेदार यांना नोटीस देणेबाबत निर्देशीत केले आहे. त्यानुसार आर्किटेक्ट माथूर ॲण्ड क्राप्रे

असोशिएट्स नवी दिल्ली यांनी दि. 11/09/2014 रोजीचे ई-मेलव्दारे ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद यांना द्यावयाचे नोटीस पत्राचा मसुदा संस्थानकडे पाठविला आहे, सदर नोटीस मध्ये पुर्वीचे दि. 04/06/2013 चे पत्राचा उल्लेख करणेत आलेला आहे. व खालील बाबत कळविणेत आलेले आहे.

With respect to the above subject and the references stated above we would to state that vide above referenced letter you were informed regarding the damages/ compenstation amount payable by you. You have neither responded to the above mentioned notice, nor have you deposited the damages.

As per Clause 12.4 you had 28 days to reply to the notice above or refer the matter for arbitration by naming an arbitrator through us.

Since you have neither replied to the notice nor named an Arbitrator, the Sansthan will take appropriate action against you according to the provisions of the agreement.

सदरचे नोटीसचा मसुदा ॲड. श्री एस.डी.कुलकर्णी यांना दि. 12/09/2014 रोजी दाखवून नोटीस दि. 24/09/2014 रोजी ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रा.प्रा.लि.हैद्राबाद यांना पाठविली आहे.

टेंडर निविदेत Arbitration Clause असून आर्किटेक्ट मार्फत नोटीस पाठविणेची तरतुद आहे. त्याप्रमाणे सदर नोटीस दिलेली आहे. Arbitration Clause तसेच पार्टी समवेत झालेले करारामध्ये अ.नं. 17 खालील प्रमाणे आहे.

All disputes arising out of or in any way connected with this Agreement shall be deemed to have arisen at Shirdi and only courts in Rahata Dist. Ahmendnagar shall have jurisdiction to determine the same.

निविदेमध्ये Arbitration Clause अ.क्र. नं. 12.4 हा आहे. सोबतचे त्याची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडली आहे. (परिशिष्ट अ)

तरी Arbitration Clause व करारनाम्यातील तरतुदीबाबत प्रकरणी पुढील कार्यात्तर कार्यवाही संस्थान ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांचे मार्फत करणेस व येणारे खर्चास मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे दि. 28/08/2014 चे निर्णया नुसार चर्चा / निर्णय होणेकामी सादर.

**निर्णय क्र.९४५** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे नियोजित साईगार्डन प्रकल्पांतर्गत सिव्हील वर्क कामाचे ठेकेदार के.आर.आर.इन्फ्रा प्रा.लि., हैद्राबाद यांचेकडून उर्वरीत दंडाची रक्कम वसुल करणेकामी लवाद प्रकरण दाखल करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.२३ श्री साईबाबा संस्थानचे विविध इमारतीमधील फॅन, ट्युब साफसफाई व मेन्टेनन्स करण्याचे काम वार्षीक पध्दतीने देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री समाधी मंदिर, दर्शनरांगेचे हॉल, मंदिर परिसरातील इमारती, शांतीनिवास इमारतींमधील कार्यालये, साईप्रसाद नं.०१ व ०२ इमारत,□□□□□□ इमारत, सेवाधाम इमारत, शांतीनिकेतन इमारत, भक्तनिवासस्थान इमारत, शैक्षणिक संकुले इमारत, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय, व्दारावती इमारत व श्री साई प्रसादालय परीसरातील इमारती या सर्व इमारतींमध्ये भक्तांना सोयी सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने भक्तांना उष्णता जाणवु नये म्हणून रुम, हॉल व पॅसेजचे ठिकाणी □□□□ साईजचे साधारणत: सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन व स्टॅण्ड फॅन मिळून ७८०४ नग लावण्यात आलेले आहेत. तसेच सर्व इमारतींमधील रुम, हॉल व पॅसेज याठिकाणी रात्रीचे प्रकाश योजनेकरीता साधारणत: १४५६० नग टयुबलाईट फिटींग बसविण्यात आलेल्या आहेत. यासर्व टयुबलाईट व फॅनचा सर्वकाळ वापर केला जात असल्यामुळे वातावरणातील धुलीकणांमुळे ही सर्व इलेक्ट्रीकल उपकरणे खराब होतात. फॅन, टयुब खराब झाल्यामुळे सर्व विभाग सदरील फॅन, टयुब साफ करुन मिळणेबाबत मागणी करतात. विद्युत विभागामार्फत संस्थानचे सर्व परीसर व इमारती याठिकाणांचे दैनंदिन मेन्टेनन्स करणे, वायरींग कामे करणे, दैनंदिन इलेक्ट्रीकल तक्रारींचे निवारण करणे, वर्षभरातील उत्सवामधील मंडपामध्ये विद्युत लाईटव्यवस्था विद्युत रोषणाई कामे करणे इ.प्रकारची कामे विद्युत विभागामार्फत केली जातात. त्यामुळे संस्थानचे सर्व इमारतींमधील फॅन, टयुब साफसफाई व सर्व्हीसिंग कामे पुर्ण करता येत नाहीत.

संस्थानचे उपरोक्त इमारतींमधील फॅन, टयुब साफसफाई व सर्व्हीसिंग करणेचे काम मे.अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांना दिनांक ०१-०१-२०१४ ते दिनांक ३१-१२-२०१४ या कालावधीकरीता देण्यात आलेले होते. तरी आता पुढील वर्षाचे फॅन, टयुब साफसफाई व सर्व्हीसींग करुन घेणेचे काम वार्षिक पध्दतीने दयावे लागणार असून वर्षभरात कराव्या लागणा-या कामाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचा तपशील | ठिकाण | संख्या | १ वर्षात साफसफाई व मेन्टेन्स करण्याची वेळ | दर (अंदाजे) | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | टयुब लाईट साफ करणे,सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्टॅण्ड फॅनची साफसफाई करणे. | समाधी मंदिर, चावडी, व्दारकामाई, म्युझिअम हॉल, सभामंडप | टयुबलाईट ६०० नग | २४ वेळा (१५ दिवसात ०१ वेळा) | रु. ७/- | रु. १,००,८००/- |
| | | | सर्व प्रकारचे फॅन ४०० नग | २४ वेळा (१५ दिवसात ०१ वेळा) | रु. ७/- | रु. ०,६७,२००/- |
| | | शांतिनिवास भक्तनिवास दर्शनरांग हॉल, कार्यालये, मदिर परिसरातील इतर इमारती,[illegible] इमारत | टयुबलाईट फिटींग ५०० नग | २४ वेळा (१५ दिवसात ०१ वेळा) | रु. ७/- | रु. ०,८४,०००/- |
| | | | सर्व प्रकारचे फॅन ५०० नग | २४ वेळा (१५ दिवसात ०१ वेळा) | रु. ७/- | रु. ०,८४,०००/- |
| | | साईउदयान इमारत, मंगल कार्यालय, साईप्रसाद नं.०१ व ०२ इमारती, मुख्य भांडार, जनरेटर कक्ष, साईनाथ छाया इमारत, सेवाधाम इमारत, भक्निवासस्थान (५०० रुम) व शैक्षणिक संकुले इमारती | टयुबलाईट फिटींग ३००० नग | ६ वेळा (२ महिन्यात ०१ वेळा) | रु. ७/- | रु. १,२६,०००/- |
| | | | सर्व प्रकारचे फॅन ३५०० नग | ६ वेळा (२ महिन्यात ०१ वेळा) | रु. ७/- | रु. १,४७,०००/- |
| ०२ | फॅन सर्व्हीसिंग करणे | वरील सर्व फॅन पैकी गरज भासल्यास सर्व्हीसिंग करणे. | १००० नग | आवश्यकतेनुसार | रु. ६०/- | रु. ०,६०,०००/- |
| ०३ | सिलींग फॅन वाईंडींग करुन देणे. | वरील सर्व फॅन पैकी गरज भासल्यास सर्व्हीसिंग करणे. | ५०० नग | आवश्यकतेनुसार | रु. ३००/- | रु. १,५०,०००/- |
| ०४ | नविन फॅन बेअरींग बसविणे. | वरील सर्व फॅन पैकी गरज भासल्यास सर्व्हीसिंग करणे. | ५०० नग | आवश्यकतेनुसार | रु. ६०/- | रु. ०,३०,०००/- |
| ०५ | नविन फॅन कन्डेन्सर | वरील सर्व फॅन पैकी गरज | २००० नग | आवश्यकतेनुसार | रु. ३०/- | रु. ०,६०,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | बसविणे. | भासल्यास सर्व्हीसिंग करणे. | | | | |
| | | | | एकूण रक्कम- | | रु. ९,०९,०००/- |

सदर खर्च हा प्रती नग दाखविलेला असल्याने कंत्राटदार हा कितीही मनुष्यबळ वापरु शकतो, त्याचे खर्चाचे बंधन संस्थानवर राहणार नाही. फक्त कंत्राटदाराने आपण दिलेल्या संख्येइतके काम त्या मर्यादित कालावधीत पूर्ण करणे गरजेचे राहील. वरील साहित्य साफसफाई करतांना रिपेअरींग व मेन्टेनन्ससाठी लागणारे साहित्य (जसे फॅन, नटबोल्ट, फॅन रबरी गट्टे इ.) संस्थानमार्फत पुरविण्यात येईल. उपरोक्तप्रमाणे सर्व कामे एका वर्षासाठी कंत्राटी पध्दतीने करण्यासाठी अंदाजे रक्कम रुपये ९,०९,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. या कामास व खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९४६** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा केली असता, श्री साईबाबा संस्थानचे विविध इमारतीमधील फॅन, ट्युब साफसफाई व मेन्टेनन्सचे काम वार्षीक पध्दतीने बाहेरील कंत्राटदारास देण्याची आवश्यकता आहे का, हे मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडून तपासून घेण्यात यावे व त्यानंतर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२४ श्री साईधर्मशाळा विभागातील स्टोअरच्या खिडकीस ग्रील बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई धर्मशाळा विभागाने दिनांक 16/09/2014 चे पत्रात कळविल्याप्रमाणे विभागात एकूण 6 इमारती असून प्रत्येक माळ्यावर दोन स्टोअर आहेत. प्रत्येक स्टोअरमध्ये हॉलसाठी लागणारे बेडशिट, उशी, सोलापुरी चादर, उशी कव्हृ फोल्डीग गाद्या इ. ठेवण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक स्टोअरचे दरवाजाचे बाजूस एक खिडकी आहे. या खिडकीला □ल्युमिनियमची फ्रेम बसविलेली आहे. परंतु ग्रील बसविलेले नाहीत. □ल्युमिनियम फ्रेमला दोन झडपा आहेत, त्या झडपांचे लॉक लावले तरी, प्रेस केलेस ते उघडते. साई धर्मशाळा येथे एका इमारतीस एकच मदतनीस असतो त्या तळमजल्यावर आलेल्या भक्तांना पावतीनुसार हॉल देण्याची व्यवस्था करत असल्यामुळे त्याला प्रत्येक माळ्यावर लक्ष देणे शक्य् नसते. त्यामुळे स्टोअरमधील सामानाची चोरी होण्याची शक्यता नाकाराता येत नाही. यासाठी प्रत्येक खिडकीला ग्रील बसविणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. सदर मागणीबाबत प्रत्यक्ष पहाणी केली असून, सदरचे काम बाहेरील फेब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे मटेरिअल खर्च अपेक्षित आहे:

| अ.नं. | तपशील / साईज | मागणी | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | एम.एस. स्केअर बार – 10 एम.एम. | 880 किलो | 75.00 | 66,000.00 |
| 2 | एम.एस. फ्लॅट पट्टी – 25 x 5 एम.एम. | 240 किलो | 75.00 | 18000.00 |
| 3 | प्लंबिग खिळे – 50 एम.एम. | 5 किलो | 120.00 | 600.00 |
| 4 | एशियन मेक काळा कलर | 12 लिटर्स | 350.00 | 4,200.00 |
| | | | **एकूण रुपये :** | **88,800.00** |

उपरोक्तप्रमाणे साई धर्मशाळा विभागाकडील 6 इमारतीतील प्रत्येक स्टोअरमधील खिडकीला ग्रील बसविणेकामी अंदाजे रुपये 88,800.00 खर्च अपेक्षित आहे. याकामी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द् करुन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलाविण्यास व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे साई धर्मशाळा विभागाकडील 6 इमारतीतील प्रत्येक स्टोअररुमच्या खिडकीला ग्रील बसविणेकामी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.८८,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२५ दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी कक्षाजवळील दर्शन रांगेतील गेटला स्टेनलेस स्टील जाळी बसवुन मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा यांनी त्यांचे दिनांक 09/10/2014 चे पत्रात कळविल्याप्रमाणे मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी कक्षास दिनांक 30/09/2014 रोजी प्रत्यक्ष भेट दिली असता, मोजणी कक्षाजवळील उत्तर बाजूस असलेल्या दर्शन रांगेतील गेटला स्टेनलेस स्टीलची जाळी बसविणेबाबत सूचना दिलेल्या आहे. सदर पत्रातील मागणीबाबत प्रत्यक्ष पहाणी केली असून, सदरचे काम बाहेरील फेब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे मटेरिअल खर्च अपेक्षित आहे:

| अ.नं. | तपशील / साईज | मागणी | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | स्टेनलेस स्टील स्केअर पाईप – 40 x 2 एम.एम. | 40 फुट | 325.00 | 13,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | स्टेनलेस स्टील स्केअर पाईप – 25 x 2 एम.एम. | 60 फुट | 225.00 | 13,500.00 |
| 3 | स्टेनलेस स्टील बिजागरी – हेवी 5” | 08 नग | 120.00 | 960.00 |
| 4 | स्टेनलेस स्टील परफोरेटेड – शीट 16 गेज | 60 स्वेअर फुट | 300.00 | 18,000.00 |
| | | | **एकूण रुपये :** | **45,460.00** |

उपरोक्तप्रमाणे दक्षिणा पेटी कक्षातील रक्क्म मोजणी कक्षाजवळील उत्तर बाजूस असलेल्या दर्शन रांगेतील गेटला स्टेनलेस स्टीलची जाळी बसविणेकामी अंदाजे रुपये 45,460.00 खर्च अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलाविण्यास व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे दक्षिणा पेटी मोजणी कक्षाजवळील उत्तर बाजूस असलेल्या दर्शन रांगेतील गेटला स्टेनलेस स्टीलची जाळी बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४५,४६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२६ ओल्या घनकच-यापासून खते बनविणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्ताव-** संस्थान व संस्थान परिसरातील कचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी च्हरित क्रांती द ऑरग्नाईस रिव्होल्युशनछ प्रस्ताव आलेला आहे. कचऱ्यापासुन निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेता सदर संस्थेने शेतीसाठी उपयुक्त अशी हरित क्रांती योजना ही सातारा जिल्ह्यातील कोयना येथे सर्वप्रथम सुरु करण्यात आली आहे.

संस्थानमध्ये प्रसादलय विभागातुन दररोज 100 ते 200 किलोचे निर्माल्य तयार होते. तसेच बगीचा विभागाद्वारे मंदिरातुन हार व फुले काढली जातात या हार व फुलांचे दररोजचे एकुण 500 ते 800 किलोचे निर्माल्य लक्षात घेता सदर मशिन संस्थान साठी फायदेशीर ठरु शकते. अशा प्रकारचे निर्माल्य मशिनमध्ये टाकले जाऊन त्यापासुन शेतीसाठी उपयुक्त खते तयार केली जाऊ शकतात.

सदरच्या आलेल्या प्रस्तावाद्वारे मशिनची एकुण किंमत रु. 8,91,750/- ( रु.आठ लाख एक्यान्नव हजार सातशे पन्नास ) मात्र कळविणेत आली आहे. सदर मशिनसाठी साधारणत: 1000 किलोच्या निर्मल्यासाठी दररोज 23 units विजेची आवश्यकता आहे. 1000 किलो निर्मल्या सोबत साधारणत: 250 किलो

पर्यंत सुका भुसा मिसळुन विशिष्ठ पावडरच्या साहाय्याने 7-8 दिवसाची कुजण्याची प्रक्रीया पार पाडल्यानंतर दररोज 625 किलो इतके खत उपलब्ध होऊ शकते. तसेच मशिनद्वारे तयार होणाऱ्या खतांचा कसल्याही प्रकारचा वास हा येणार नाही असे सुचविलेले आहे. सदरचे खत लगेच शेतीच्या वापरासाठी देखील योग्य कसदार आहे. सदर मशिनमध्ये संस्थानच्या गार्डन मधुन निघणारा सुका तसेच ओला कचरा टाकुन तसेच मंदिरातुन निघणारे हार व फुलांपासुन खते बनवली जाऊ शकतात. काचेच्या व प्लास्टीकच्या कचरा व्यतरीक्त सर्व प्रकारचा ओला व सुका कचरा मशिनमध्ये टाकला जाऊ शकतो. सदर मशिन खरेदी करुन फुलांच्या निर्मल्याची तसेच अन्य कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावता येईल. उपलब्ध खताची विक्री द्वारे या वरील झालेल्या खर्चाची काही प्रमाणात भरपाई देखील करणे शक्य आहे.

संस्थान परिसरातील पालापाचोळा तसेच मंदिरातुन दररोज निघणारे हार व फुलांचे निर्माल्य लक्षात घेता बगीचा विभागासाठी एक नविन मशिनरीची खरेदी करता येईल. सदर मशिनची पाहणी करुनच निवीदा मागविता येतील. तसेच सर्वात कमी दर असणाऱ्या निवीदा धारकाकडुनच मशिनची खरेदी करता येईल.

सदर मशिनरी उपलब्ध असलेल्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करुन निवीदा मागविता येतील. तसेच सर्वात कमी दर असणाऱ्या निवीदाधारका कडुन मशिनरी खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान व संस्थान परिसरातील कचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी ओल्या घनकच-यापासून खते बनविणेकामी प्रायोगिक तत्वावर एक मशिन विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.८,९१,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२७ प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१४-१५ चे माहे डिसेंबर- २०१४ ते मार्च-२०१५ अखेर किराणा माल खरेदीकामी फेर निविदा काढणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१४-१५ चे माहे एप्रिल-१४ ते मार्च-१५ अखेर प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मा.त्रिसदस्य समितीचे दि.१३.१२.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.९६७ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. तसेच सदर खरेदीस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे दाखल केला असता, मा.न्यायालयाने दि.१३.०३.२०१४ रोजीचे निर्णयानुसार सन २०१४-१५ चे प्रथम सहामाही करिता (माहे एप्रिल-१४ ते

सप्टेंबर-२०१४) किराणा माल खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.३५,००,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार कार्यवाही करुन एप्रिल-१४ ते सप्टेंबर-१४ अखेर किराणा माल खरेदी करण्यात आलेली आहे.

तसेच माहे ऑक्टोबर २०१४ ते मार्च-२०१५ करिता आवश्यक किराणा माल खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र.२२४ दि.२४.०६.२०१४ रोजी विधी विभागाकडे सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास माहे ऑगस्ट-२०१४ अखेर मान्यता न मिळाल्याने व पहिल्या सहामाही खरेदीची मुदत माहे.सप्टेंबर २०१४ अखेर संपत असल्याने, मा.व्य.समितीचे दि.२८.०८.२०१४ चे सभेतील निर्णयानुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.१३.०३.२०१४ रोजीचे निर्णयास अधीन राहुन, माहे ऑक्टो-१४ ते मार्च-१५ अखेर किराणा माल खरेदीची पुर्वतयारी करणेकामी दि.०६.०९.२०१४ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०६.०९.२०१४ ते दि.२०.०९.२०१४ अखेर ई-निविदा मागणी करण्यात आलेली होती. तसेच सदर खरेदीस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२६.०९.२०१४ रोजी मान्यता दिलेली आहे.

मा.व्य.समितीचे दि.२८.०८.२०१४ चे सभेतील निर्णयानुसार माहे ऑक्टो-२०१४ ते मार्च-२०१५ करिता किराणा माल खरेदीकामी ई-निविदा प्रक्रिया राबवून कार्यवाही करण्यात आलेली असून, प्राप्त ३७ निविदांपैकी पात्र ३५ निविदाधारकांच्या मूळ निविदा (Financial Bid) व गावरान तुप, खाद्यतेलाचा प्राप्त तपासणी अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१४ रोजीचे सभेत उघडण्यात येऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. सन २०१४-१५ चे माहे ऑक्टोबर २०१४ ते मार्च २०१५ अखेर किराणा माल खरेदीकामी सर्व किराणा माला करिता न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेत यावेत.

२. ज्या साहित्यासाठी एक किंवा दोन निविदाधारकांचे नमुने निवडण्यात आलेले होते, व एक किंवा दोन निविदाधारकांचे दर आलेले आहेत, अशा परिस्थितीमध्ये त्यांचे दर ग्राह्य धरुन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेत यावा.

३. ज्या साहित्यासाठी दोन निविदाधारकांचे दर समान आलेले आहेत, त्यांना पुरवठा आदेश विभागून देण्यात यावा.

४. गणेश ड्राय फ्रुटस, पुणे यांनी ई-निविदेमध्ये नजरचुकीने प्रति क्विंटल ऐवजी प्रति किलोचे दर भरलेले होते. सदरची बाब मा.व्य.समितीचे सभेच्या निर्देशनास आणुन दिले असता, सदरचे दर प्रति क्विंटलमध्ये वर्ग करुन ते अंतिम समजण्यात यावे, असे ठरले. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

५. तसेच ज्या निविदाधारकांच्या निविदा नामंजुर झालेल्या आहेत किंवा त्यांना कुठल्याही साहित्यासाठी पुरवठा आदेश नसेल अशा निविदाधारकांच्या बयाणा रक्कम त्यांना परत करण्यात याव्यात.

मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०९.१०.२०१४ मधील निर्णय व दिनांक १८.१०.२०१४ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी समक्ष दिलेल्या सुचनेनुसार न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत दिनांक २०.१०.२०१४ रोजी प्रस्ताव फेर सादर केला असता त्यावर मा.कार्यकारी अधिकारी यांनी "लेखा विभागाने काळजीपुर्वक तपासून त्वरीत अभिप्राय द्यावेत असे निर्देश दिलेले होते." त्यानुसार मुख्यलेखाधिकारी यांनी राबविण्यात आलेली ई-निविदा पध्दत चुकीच्या रितीने पार पाडलेली आहे. याबाबत त्यांनी विविध मुद्दे उपस्थित केलेले आहेत. तसेच त्यांनी सदरची निविदा प्रक्रिया रद्द करुन आवश्यक त्या दुरुस्त्या करुन फेर निविदा काढावी, दरम्यानचे काळात मालाअभावी कामकाज ठप्प राहु नये यासाठी नवी निविदा प्रसिद्ध करुन अंतिम होईपर्यंत पुर्वीचे पुरवठादारांकडून किमान ०१ महिना माल घेण्यास हरकत नाही. कारण पुर्वीच्या व आताच्या दरात व पुरवठादारामध्ये फारसा फरक दिसत नाही. त्यामुळे माल पुरवठा करण्यास अडचण येऊ शकत नाही, असे सुचविलेले होते. याबाबत **मा.मुख्यलेखाधिकारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे व त्याबाबतचे स्पष्टीकरणाचा तक्ता सोबतच्या परिशिष्ठात अवलोकनार्थ सादर केला आहे.**

तसेच मा.उप कार्यकारी अधिकारी यांनी लेखाधिकारी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचा समावेश निविदेमध्ये करुन फेरनिविदा काढावी असे मत आहे, तसेच तूर्त गैरसोय होऊ नये म्हणून सध्या पुरवठा करणारे पुरवठाधारकांशी चर्चा करुन, पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील दराने माल खरेदी करता येईल असे मत आहे, असे सुचविलेले आहे.

त्यावर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दि.२३.१०.२०१४ रोजी "आवश्यक त्या विहित कार्यपद्धतीच्या पुर्ततेच्या अधीन राहुन प्रस्ताव मान्य. भविष्यात अशा प्रकारच्या चुका होणार नाहीत, याची संबंधीतांनी काळजी घ्यावी." असे निर्देश दिलेले आहेत.

मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे निर्देशानुसार मागील मंजुर पुरवठाधारकाकडून मंजुर दरात माल पुरविणेबाबत दुरध्वनीद्वारे व ई-मेलद्वारे विचारणा करण्यात आलेली आहे. तसेच ते माल देण्यास तयार आहेत किंवा कसे? याबाबत त्यांची लेखी पत्र घेण्यात आलेली आहेत. त्यामध्ये काही पुरवठाधारकांनी ठराविक किराणा माल मागील मंजुर दरामध्ये पुरविण्यास असमर्थता दशर्विलेली आहे.

त्यामुळे दि.२८.१०.२०१४ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी ज्या किराणा मालासाठी पुरवठाधारक मागील मंजुर दरामध्ये माल देण्यास तयार नाहीत, अशा पुरवठाधारकांना फेर निविदा प्रक्रिया पुर्ण झालेनंतर निविदेमध्ये

त्या मालाचे जे दर अंतिम होतील/निश्चित होतील, त्या दराने बिले आदा करण्यात येतील, तरी निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत उपरोक्त किराणा माल देण्यास तयार आहेत अगर कसे? याबाबत विचारणा करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार त्याच दिवशी पुरवठाधारकांना ई-मेल द्वारे व दुरध्वनीद्वारे याबाबत विचारणा केलेली आहे. त्यापैकी पुरवठाधारकांनी अशा पद्धतीने माल पुरवठा करण्यास दुरध्वनीद्वारे असमर्थता दर्शविलेली आहे.

| **अ.नं.** | **पुरवठाधारकाचे नांव** | **किराणा माल** |
|---|---|---|
| ०१. | मे.गंगवाल ए.एस., शिर्डी | खिसमिस |
| ०२. | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | शेंगदाणा |
| | | साबुदाणा |
| | | खोबरेवाटी |
| | | काजू पाकळी |
| | | मेथी |
| ०३. | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे | खोबरेवाटी |
| | | धने |

उपरोक्त नमुद केलेल्या किराणा मालाव्यतिरिक्त इतर सर्व किराणा माल मागील मंजुर दरामध्ये पुरविणेबाबत पुरवठाधारकांनी संमती दिलेली आहे.

तसेच भांडार विभागाकडून माहे नोव्हेंबर-२०१४ करिता प्रसादालय विभागास आवश्यक किराणा मालाचे मागणीपत्रक इकडील कार्यालयास दि.२२.१०.२०१४ रोजी प्राप्त झालेले आहे. त्यातील मागणीनुसार उपरोक्त नमुद किराणा माल वगळता इतर किराणा माल मागील मंजुर दरामध्ये खरेदी केल्यास सदर खरेदीस एक महिन्याकरिता अंदाजे रु.१,३१,३४,२७८/- (अक्षरी रुपये एक कोटी, एकतीस लाख चौतीस हजार दोनशे अठ्याहत्तर) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तसेच दि.२९.१०.२०१४ रोजी मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी समक्ष दिलेल्या सुचनेनुसार जे पुरवठाधारक मागील मंजुर दरामध्ये माल पुरवठा करण्यास तयार आहेत, अशा पुरवठाधारकांना एक महिन्यासाठी माल मागणी चलन देण्यात आलेले आहेत.

**मागणी -**

१. सन २०१४-१५ चे माहे ऑक्टो.-१४ ते मार्च-१५ करिता आवश्यक किराणा माल खरेदीकामी मा.व्य.समितीचे दि.०९.१०.२०१४ चे सभेत न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत निर्णय झालेला असल्याने, तो निर्णय बदलुन सदर खरेदीकामी फेर ई-निविदा काढणेस मान्यता मिळणेस विनंती.

२. तसेच फेर निविदा प्रक्रिया राबवून पुरवठा आदेश देणेचे पुर्ण कार्यवाहीस कमीत कमी ६० दिवसांचा (दोन महिने) कालावधी अपेक्षित आहे, म्हणून मागील मंजुर दराने अंदाजे ०२ महिन्यांकरिता माल खरेदी करावा लागेल. त्यामुळे फेर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील पुरवठाधारकांकडून अंदाजे ०२ महिन्यांकरिता (दिवाळी व नाताळ सुट्टीची गर्दी लक्षात घेता) उपरोक्त नमुद साबुदाणा, शेंगदाणे, खोबरेवाटी, काजू पाकळी, धने वगैरे किराणा माल वगळता इतर किराणा माल मागील मंजुर दराने खरेदी करावा लागेल. त्यानुसार पुढील एक महिन्यासाठी आवश्यक किराणा माल मागणी करणेत आलेला आहे. तरी त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती. याकामी येणारे प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता घेण्यात येईल.

३. तसेच मागील निविदा प्रक्रियेचे वेळी मा.उच्च न्यायालयाचे निर्णयानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यास रु.६,६०,४२०/- मात्र तसेच गावरान तुप व खाद्यतेलाचे नमुने अश्वमेध लॅब, नाशिक येथे तपासणी करणेस रु.४६,४३३/- मात्र असा एकुण रु.७,०६,८५३/- मात्र इतका खर्च आलेला होता. फेर ई-निविदा काढावयाचे झाल्यास पुन्हा तीच प्रक्रिया राबवावी लागेल व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

४. तसेच जो माल पुरवठाधारक मागील मंजुर दरामध्ये पुरविण्यास तयार नाहीत, अशा किराणा मालाअभावी प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागांचे दैनंदिन कामकाजाची गैरसोय होऊ नये म्हणून सदरचा किराणा माल हा बाजारभावाने खरेदी करत आहोत, तरी त्याप्रमाणे माल खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती याकामी येणारे प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता घेण्यात येईल.

५. तसेच फेर ई-निविदा मागणी करावयाची असल्यास पहिल्या निविदेत आलेल्या निविदाधारकांच्या बयाणा रक्कम त्यांना प्रत्यक्ष/पोस्टाने परत करणेस मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त अ.क्र.०१ ते ०५ ला मान्यता मिळणेकामी सदरील विषय व्यवस्थापन मंडाळाचे त्रिसदस्य समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९५०** **उपरोक्त प्रस्तावावर दि.०९.१०.२०१४ रोजीच्या सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय झालेला आहे व ई-निविदा नियमावलीप्रमाणे संपूर्ण कार्यवाही झालेली असल्यामुळे या विषयावर वेगळा निर्णय घेण्याची आवश्यकता नाही, असे समितीचे मत आहे.**

**परंतु पुढील पुरवठा आदेश होईपर्यंत प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरिता आवश्यक असलेला किराणा माल मागील मंजुर दराने खरेदी करणेत यावा, ज्या किराणामालासाठीचे पुरवठाधारक मागील मंजुर दराने किराणामाल देणेस तयार नाहीत, असा किराणामाल नवीन निविदेतील दराने अथवा बाजारभावाने खरेदी करणेत यावा.**

**तसेच यापुढे प्रत्येक विषयाचे प्रस्ताव तसेच निविदा/ ई-निविदा त्रिसदस्य समितीसमोर आणण्या अगोदर ते बरोबर असलेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी तपासणी करावी व त्यावर आपला दाखला देऊन सभेसमोर सादर करावेत, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२८ सन २०१३-१४ या अर्थिक वर्षाच्या वैधनिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेवून लेखापरिक्षीत लेख्यांसह शासनास सादर करणेस मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम-२००४ संस्थानसाठी लागु केलेला असुन, त्या अनुषंगाने संस्थानचे कामकाज सुरु आहे.

अधिनियम-२००४ मधील कलम १७(२)(ग) मधील तरतुदीनुसार विश्वस्तव्यवस्थेच्या हिशोबाची राज्य शासन निर्देश देईल अशा व्यक्तिकडुन लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षण करण्याची व्यवस्था करील. तसेच कलम २९(१) मधील तरतुदीनुसार समिति त्या विश्वस्त व्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमाखर्चाचा तपशिल दर्शविणारा दि.३१ मार्च रोजी संपणा-या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणाचा अहवाल, तसेच ज्यांना विश्वस्त व्यवस्थेकडुन आर्थिक साहाय्य देण्यात आले अशा देणगी स्विकारणा-या संस्थांची (संपुर्ण पत्त्यासह) तपशिलवार यादी व आर्थिक साहाय्य मागण्यामागील उद्देश व साहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांच्यासह वार्षिक अहवाल तयार करवुन घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला त्या वर्षाच्या ३० जून च्या आंत सादर करील, अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र राज्य विधी व न्याय विभाग यांनी जा.क्र.लेखप-२०१४/३२०/प्र.क्र.५०/का.१६ दि.०१ सप्टेंबर २०१४ अन्वये मे. कोचर अॅण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक केलेली असुन, त्यांचेकडुन वैधानिक लेखापरिक्षण करुन घेणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. वैधानिक लेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षणाचे कामकाज पुर्ण केलेले असुन, त्यांचा अहवाल दि.२६/०९/२०१४ रोजी संस्थानला प्राप्त झाला आहे.

लेखापरिक्षण अहवाल अंतिम होऊन शासनास सादर केल्यानंतर त्यामधील दोष दुरुस्तीबाबतचा अहवाल तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येईल.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थेला अधिनियम-२००४ मधील कलम २९ (१) व (२) अन्वये दरवर्षी संस्थानचा वार्षिक अहवाल (प्रशासकिय व लेखापरिक्षण अहवाल) राज्याच्या विधी मंडळाच्या सभागृहाच्या

पटलावर ठेवणे बंधनकारक आहे. तरी कृपया सदर अहवालाची नोंद घेऊन, लेखापरिक्षीत लेख्यांसह राज्य शासनाकडे सादर करणेकामी अहवालाच्या १२०० प्रती छपाई करण्यास व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.९०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये नव्वद हजार मात्र) इतक्या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९५१ यावर सविस्तर चर्चा होऊन, लेखा परिक्षण अहवाल हा दिशादर्शक असतो व त्यामध्ये काही आक्षेप असतील तर ते सभेसमोर आले पाहिजेत म्हणजे त्या आक्षेपांच्या पूर्तता करणे शक्य आहे का, हे पहाता येईल, त्याकरिता सन २०१३-१४ या अर्थिक वर्षाचा वैधनिक लेखापरिक्षण अहवाल लेखा आक्षेपांसह सविस्तर समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२९ माहे– नोव्हेंबर, २०१४ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे **नोव्हेंबर २०१४** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विजया बँक, शिर्डी | ८/११/२०१४ | ४,३७,६६,११०/- |
| २ | विजया बँक, शिर्डी | ८/११/२०१४ | ४,३७,६६,११०/- |
| ३ | विजया बँक, शिर्डी | ८/११/२०१४ | ४,३७,६६,११०/- |
| ४ | बँक ऑफ बरोडा, नाशिक | ८/११/२०१४ | १३,१२,९८,३२८/- |
| ५ | विजया बँक, शिर्डी | १२/११/२०१४ | २,७३,५३,८१९/- |
| ६ | विजया बँक, शिर्डी | १२/११/२०१४ | ३,२८,२४,५८२/- |
| ७ | युको बँक, शिर्डी | १२/११/२०१४ | ६,०१,७८,४०१/- |
| ८ | कॅनरा बँक, शिर्डी | १२/११/२०१४ | ६,०१,७८,४००/- |
| ९ | बँक ऑफ बरोडा, नाशिक | १२/११/२०१४ | ६,०१,७८,४०१/- |
| १० | आंध्रा बँक, शिर्डी ( NPAY ) | १४/११/२०१४ | ३७,४३,८१०/- |
| ११ | युको बँक, शिर्डी | १९/११/२०१४ | १३,१४,९१,००१/- |
| १२ | आंध्रा बँक, शिर्डी ( NPAY ) | २६/११/२०१४ | ३१,३०,३३९/- |
| १३ | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | २६/११/२०१४ | ५३,६९,७४,०७०/- |
| १४ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे **नोव्हेंबर** २०१४ अखेर गुंतवणूकीसाठी उपल्ब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम- | | १०,००,००,०००/- |
| | | **एकूण रक्कम-** | **१२७,८६,४९,४८१/-** |

वरील तपशिलानुसार साधारणतः रक्कम रु.१२७.८६ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणार आहेत.

प्रचलित कार्यपध्दतीनुसार उपलब्ध होणारी रक्कम उच्चतम व्याजदर देणा-या राष्ट्रीयीकृत बँकांकडे गुंतविण्यात येते. त्यास अनुसरून सदर बँका संस्थानला चांगल्या बँकिेंग सेवा देतात. वैधानिक लेखापरिक्षणात लेखापरिक्षकांनी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत /सेवा देणा-या बँकेकडेच उच्चतम व्याजदराने गुंतविण्यात यावी असे सुचविले आहे. त्यास अनुसरुन बँकिंग सेवा व आर्थिक फायद्याच्या दृष्टीने गुंतवणूकीसाठी वेळोवेळी उपलब्ध होणा-या रकमेची, खाली नमूद केलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवून जास्तीत जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे गुंतवणूक करता येईल.

१) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नाशिक
३) बँक ऑफ इंडिया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) देना बँक, शिर्डी
८) स्टेट बँक ऑफ इंडिया, शिर्डी
९) युको बँक, शिर्डी
१०) युनियन बँक ऑफ इंडिया, शिर्डी
११) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
१२) विजया बँक, शिर्डी
१३) इंडियन बँक, शिर्डी
१४) ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१५) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी वरील अ.क्र. १ ते १५ या बँकांकडून जसजशी गुंतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तपणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१२७.८६ कोटींची टप्प्याने-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या अ.नं.०१ ते १५ स्थानिक, राष्ट्रीयकृत व संस्थानला सेवा देणा-या बँकांचे ताळेबंद, वार्षिक आर्थिक उलाढाल पाहून, Actual Counter Guarantee of banking business (Government of India) या बाबी विचारात घेऊन, त्यांचेकडून व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे**

**उपलब्ध होणा-या रु.१२७.८६ कोटी मात्र रकमेची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, यापुढे प्रत्येक महिन्याची गुंतवणूक वरील पध्दतीने करण्यासाठी मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन गुंतवणूक करावी व त्याचा वार्षिक अहवाल आर्थिक वर्षाच्या शेवटी समिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३० ग्रुप ग्रॅच्युईटी योजना ट्रस्ट डीडबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवव्स्थापन मंडळ निर्णय क्र.४१८/२२-२३/०९/२००१ अन्वये संस्थान कर्मचा-यांसाठी एल.आय.सी.कडील ग्रुप ग्रॅच्युटी योजना दि.०१/१०/२००१ पासून लागु करण्यात आलेली आहे.

या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज ग्रुप ग्रॅच्युटी अॅश्युरन्स स्कीम या स्वतंत्र निधीची स्थापना करण्यात येऊन या नावाने सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी येथे स्वतंत्र खाते उघडण्यात आले आहे. या योजनेसाठी अध्यक्ष व सेक्रेटरी म्हणुन अनुक्रमे मा.कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व लेखाधिकारी यांची विश्वस्त म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. नेमणुक करण्यात आलेल्या वरील तीन विश्वस्तांच्या स्वाक्षरीने त्या खात्यावरील व्यवहार चालु आहेत. या निधीच्या व्सवस्थापनासाठी यापुर्वी मा.कार्यकारी अधिकरी श्री.मोरे साहेब, प्रशासकीय अधिकारी श्री बी.डी.साबळे साहेब व लेखाधिकारी श्री.ए.आर.औटी हे विश्वस्त म्हणुन काम पाहत होते.

यापैकी सेक्रेटरी म्हणुन श्री.ए.आर.औटी यांची बदली झाल्याने त्यांचेऐवजी श्री.एस.पी.लंके यांची लेखाधिकरी म्हणून झालेली आहे तसेच श्री.किशारे मोरे यांचे ऐवजी न्यासाचे विश्वस्त व अध्यक्ष म्हणुन श्री. राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. तरी याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणेकामी सादर.

**निर्णय क्र.९५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज ग्रुप ग्रॅच्युटी अॅश्युरन्स स्कीमच्या सेक्रेटरी पदी श्री.एस.पी.लंके, लेखाधिकरी यांची तसेच न्यासाचे विश्वस्त व अध्यक्ष म्हणुन श्री. राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी यांची नेमणुक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३१ दैनंदिन कामकाजासाठी संगणके व संगणकीय साहित्य एकाच Configuration चे विविध नामांकित कंपन्यांकडून खरेदी करणेसाठी निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** 1) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.458. 2) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 25/09/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.836.

**प्रास्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विविध विभागांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक संगणके, प्रिंटर्स्, युपीएस व इतर अनुषंागिक साहित्य वेळोवेळी खरेदी करुन वापरासाठी देण्यात आलेले आहेत. बहुतेक संगणक हे सरासरी 6 ते 10 वर्षापासून वापरात आहेत. सदर संगणकाचे साहित्य दैनंदिन वापरामुळे निकामी / खराब व कालबाह्य झाल्याने तसेच तंत्रज्ञानात वेळोवेळी बदल झाल्याने, काही साहित्यांचे उत्पादन बंद झालेले आहे. त्यामुळे नादुरुस्त झालेले साहित्य दुरुस्त करणेसाठी आवश्यक स्पेअर पार्टस् बाजारात उपलब्ध होत नाही.

सबब, अनेक विभागांमध्ये कार्यालयीन कामकाजासाठी नविन संगणकांची उपलब्धता करुन देणे गरजेचे आहे. संगणक, प्रिंटर, लॅपटॉप, सर्व्हर व इतर आयटी उपकरणांचे आयुष्यमान (Life) ठरविणेबाबत शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती07/प्र.क्र.89/39 मंत्रालय, मुंबई दिनांक 01 ऑगस्ट 2011 नुसार नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्यातील कलम 1 व 2 नुसार संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्व्हर व इतर सर्व आयटी संबंधित उपकरणांचे वयोमान 5 वर्ष निश्चित करण्यात आलेले आहे. सद्यस्थिती 5 वर्षापेक्षा जास्त वयोमान झालेले 126 संगणके असून त्यांचे स्पेअरपार्ट मिळत नाही.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 15/03/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 255 नुसार 200 नग संगणक संच व इतर साहित्य खरेदीसाठी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. 15/03/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.237 अन्वये मंजुर होऊन संस्थानचे विधी विभागामार्फत जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/789/2014 दि.12/05/2014 रोजी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन तयार करणेकामी सादर करण्यात आला आहे. मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता प्राप्त झालेनंतर संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विलंब लागण्याची शक्यता आहे. संस्थानचे विविध विभागातील आवश्यकतेनुसार 20 नग संगणक संच खरेदी करणे आवश्यक आहे. सदरकामी संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु सो., यांचेकडुन खालील System व Operating system चे Specification तपासुन घेण्यात आलेले असुन त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दि.25/09/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 836 नुसार याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,80,000/- + टॅक्स चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदर संगणक संच खरेदीकरणे कामी संस्थानचे विहित पध्दतीने निविदा

मागविणेकामी दिनांक 06/10/2014 ने टिपणी जाहिरात प्रसिध्द करणेकामी टिपणी मान्यतेसाठी सादर केली असता, त्यावर मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी एकाच कंपनीच्या टेंडर मध्ये उल्लेख करणे कायदेशीर दृष्टया योग्य होईल काय? एकाच Configuration चे विविध नांमाकीत कंपन्यांची निविदा याकामी मागविण्यात याव्यात, तसेच प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत विचारार्थ फेर सादर करावा, असे निर्देश दिलेले आहे.

**मागणी:** विविध विभागांचे कार्यालयीन कामकाजासाठी देण्यात आलेले बहुतेक संगणके निकामी व कालबाह्य झाल्यामुळे दैनंदिन कामकाजासाठी साईटेक प्रकल्पातील संगणकांव्यतिरीक्त व मा. व्यवस्थापन समीतीचे दि. 12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 458 अन्वये संगणके खरेदीसाठी संगणकाची एकच कंपनी व मॅाडेल निश्चित करणेत यावे, असे निर्देश दिलेले आहे. परंतु दिनांक 06/10/2014 चे टिपणीवरील मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार एकाच Configuration चे विविध नामांकींत कंपन्यांचे कोटेशन/निविदा मागविणेकामी प्रस्ताव मा व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेर विचारार्थ ठेवण्यात यावा, असे सुचित करण्यात आले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि. 25/09/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 836 नुसार व मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार खालील तक्त्यातील तपशीलानुसार नमुद नामांकींत कंपन्यांचे नविन संगणक संच व Operating system खरेदी करणे आवश्यक आहे.

| Sr. No. | | Detail/ Specification | Qty. |
|---|---|---|---|
| 01 | Computer set | Any Branded / Reputed Companies<br>Intel Core i3- Processor , 3rd generation or above, onboard Integrated Graphics,10/1000 LAN, onboard USB, 4 GB DDR3 RAM, 500 GB Hard Drive, No Optical Drive, 18.5" Monitor with LED Back Light, USB Optical Mouse and Keyboard<br>Windows 8 professional 64 bit<br>3 Yr Next business day onsite service. | 20 Nos. |
| 02 | Windows Operating system | Upgradation of Windows 8.1 SL (64 bit) to Windows 8 professional (64 bit). | 20. Nos |

उपरोक्त नमुद तपशिलातील नामांकींत कंपनीकडुन 20 नग संगणक संच व Operating system खरेदी करणेस विविध पुरवठाधारकांकडुन तसेच महाराष्ट्र शासनाने दर निश्चित केलेल्या अधिकृत पुरवठाधारकांकडुन संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागविणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत विचारार्थ फेरसादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** शासन निर्णय क्रमांक मातंस/नास्ती 07/प्र.क्र.89/39 मंत्रालय मुंबई यांचा दिनांक 01 ऑगस्ट, 2011 रोजीचा निर्णय.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:** मा. व्यवस्थापन समीतीचे दि. 12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 458 अन्वये संगणके खरेदीसाठी संगणकाची एकच कंपनी व मॅाडेल निश्चित करणेत यावे, असे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार Dell कंपनीचे संगणक संच व Operating system खरेदी करणेकामी प्रस्ताव सादर केला असता, त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 25/09/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 836 नुसार याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,80,000/- + टॅक्स चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

परंतु, मा. कार्यकारी अधिकारी सो़ा., यांचे निर्देशानुसार एकाच Configuration चे विविध नामांकींत कंपन्यांचे कोटेशन/निविदा तसेच महाराष्ट्र शासनाने दर निश्चित केलेल्या अधिकृत पुरवठाधारकांकडुन संस्थानचे विहित पध्दतीने सदरकामी निविदा मागविणेबाबत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेर विचारार्थ तथा मार्गदर्शनास्तव सादर.

**निर्णय क्र.९५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दैनंदिन कामकाजासाठी संगणके व संगणकीय साहित्य एकाच Configuration चे विविध नामांकित कंपन्यांकडून खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३२ बांधकाम विभागाकरीता Auto desk Auto CAD Design suite Standard- 2015 Commercial New SLM ACE Promo ची Licensed Copy खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानकरीता विविध बांधकाम प्रकल्प उभारणे व दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे तसेच इतर आर्किटेक्ट यांचेकडुन प्राप्त झालेले ड्राईंग संगणकावर बघता यावे व त्यात आवश्यकतेनुसार बदल करणेसाठी Auto CAD - 2015 Software हे बांधकाम विभागाने उपरोक्त संदर्भान्वये मागणी केली आहे. सदर Software माहिती तंत्रज्ञान विभागाकडे उपलब्ध नाही, त्यामुळे ते खरेदी करावे लागणार आहे.

त्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने सुजाता कॉम्प्युटर्स, पुणे यंाचेकडे सदर Software च्या किमतीची चौकशी केली असता त्यांनी दि.10/10/2014 ने ई-मेलव्दारे अंदाजे रक्कम कळविलेली आहे. त्यानुसार 01 नग Auto CAD -

2015 Software खरेदी करण्यासाठी अंदाजे रक्कम रुपये 1,50,000/- + टॅक्स इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी :** साईबाबा संस्थानकरीता विविध बांधकाम प्रकल्प उभारणे व दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे तसेच इतर आर्किटेक्ट यांचेकडुन प्राप्त झालेले ड्राईंग संगणकावर बघता यावे व त्यात आवश्यकतेनुसार बदल करणेसाठी Auto CAD -2015 Software संस्थानचे विहित पध्दतीने शासनाशी रेट कॉन्ट्रॅक्ट झालेल्या संस्थेकडुन व मान्यता प्राप्त विक्रेते यांचेकडुन निविदा/कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 1,50,000/- + टॅक्स मात्रचे (अक्षरी एक लाख पन्नास हजार मात्र) खर्चास मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे समोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** साईबाबा संस्थानकरीता विविध बांधकाम प्रकल्प उभारणे व दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे तसेच इतर आर्किटेक्ट यांचेकडुन प्राप्त झालेले ड्राईंग संगणकावर बघता यावे व त्यात आवश्यकतेनुसार बदल करणेसाठी Auto CAD -2015 Software खरेदी करणेसाठी संस्थानचे विहित पध्दतीनुसार शासनाशी रेट कॉन्ट्रॅक्ट झालेल्या संस्थेकडुन व मान्यताप्राप्त विक्रेते यांचेकडुन निविदा/कोटेशन मागवून प्राप्त झालेल्या निविदा/कोटेशन मा. उपसमितीचे सभेपुढे उघडुन त्यातील न्युन्नत्तम निविदाधारक/पुरवठाधारक यांचेकडून Auto CAD -2015 Software खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 1,50,000/- + टॅक्स मात्रचे (अक्षरी एक लाख पन्नास हजार मात्र) खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,५०,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३३ मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांना १५ दिवसाची मुदत देऊनही रक्कम अदा न केल्याने त्यांचेवर करारनाम्यानुसार कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :**1) मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 13/02/2011 रोजीचे सभेतील निर्णय कं्र. 57. 2) मा. व्यवस्थापन समितीचे

दि. 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.399.3) मा. व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.908.

**प्रास्ताविक :** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 13/02/2011 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 57 अन्वये Vistaas Digital Media Limited., Mumbai यांना मोबाईलवर ऑनलाईन दर्शन सुविधा श्री साईभक्तांचे सेवेकामी तीन वर्षाकरीता सुरु करणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार त्यांना दि. 07/03/2011 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. श्रींचे मोबाईलवरील ऑनलाईन दर्शन सुविधा पुरविणेस Vistaas Digital Media Private Limited यांना देण्यात आलेल्या दि. 07/03/2011 चे कार्यादेशाची मुदत दिनांक 21/03/2014 अखेर संपुष्टात आली असल्याने निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदर सुविधा कार्यादेशातील तिसऱ्या वर्षाच्या दरानुसार चालु ठेवणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 05/06/2014 रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर पुढील कालावधीकरीता जी उच्चत्तम रॉयल्टी ठरेल तो दर Vistaas Digital Media Private Limited यांना रॉयल्टी स्वरुपात संस्थानला द्यावा लागेल, या अटीवर श्रींचे मोबाईलवर लाईव्ह दर्शन सुविधा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत Vistaas Digital Media Private Limited यांचेमार्फत चालु ठेवणेत यावी व त्यांना लेखी कळविणेत यावे, असे ठरले. त्यानुसार संबंधीत कंपनीस दि.06/06/2014 रोजीचे ई-मेल व्दारे कळविण्यात आले असुन त्यांनी सदर दर देणेस दि.11/08/2014 चे ई-मेलव्दारे त्यांनी तयारी दर्शविली आहे. सदरकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन दि.08/10/2014 अखेर पुढील तीन वर्षाकरीता दर निश्चित करणेकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कालावधीत प्राप्त झालेल्या ई-निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2014 रोजीचे सभेत उघडण्यात येऊन त्यामध्ये एकही ई-निविदा प्राप्त झाली नाही मात्र संस्थानचे आवक विभागामार्फत दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या, यावर सदर सभेमध्ये निर्णय क्रं. 889 अन्वये सविस्तर चर्चा होऊन प्राप्त झालेल्या दोन्हीही निविदा रद्द करणेत येऊन, प्रस्तावीतकामी फेर ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले. त्यानुसार दि. 22/10/2014 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये फेर ई-निविदांची मागणीकामी संस्थानचे संकेतस्थळावर दि.01/11/2014 ते दि. 29/11/2014 या कालावधीत जाहिरात प्रसिध्द करणेत येत आहे.

दि.23/08/2014 चे ई-मेलव्दारे Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांना रक्कम रुपये 66,55,000/- मात्र (दि. 21/12/2014 अखेर) देणगी स्वरुपात तातडीने दि. 07/03/2011 चे कार्यादेशाचे अधिन राहुन संस्थान खाती RTGS व्दारे तातडीने जमा करणेबाबत कळविले आहे. त्यास त्यांचे प्रतिनिधी श्री राज यांनी दुरध्वनीव्दारे यांनी सहमती दर्शविली असुन, सदर

रक्कम दि. 27/08/2014 चे ई-मेल अन्वये दि. 27/09/2014 अखेर संस्थान खाती RTGS व्दारे जमा करणार असल्याचे कळविले होते.

परंतु Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांनी मोबाईलवरील श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधेकामी येणे बाकी असलेली रक्कम रुपये 66,55,000/- मात्र (दि. 21/12/2014 अखेर दि. 07/03/2011 चे कार्यादेशानुसार) व वेबसाईट वरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी येणे बाकी असलेली रक्कम रुपये 3,00,000/- मात्र (दि.31/11/2014 अखेर दि. 18/07/2011 चे कार्यादेशानुसार) असे एकुण रक्कम रुपये 69,55,000/- मात्र त्यांनी दि. 27/08/2014 चे ई-मेल व पत्राव्दारे दि.27/09/2014 अखेर भरण्याचे नमुद केले होते. परंतु त्यांनी सदर रक्कम दि. 29/09/2014 अखेर न भरल्याने त्यांची मोबाईल व वेबसाईटवरील श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा उत्सव काळात भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणुन दिनांक 06/10/2014 पासुन बंद करण्यात यावी तसेच सदर कंपनीचे नाव Black List मध्ये समाविष्ट करण्यात येऊन संस्थानचे विधी विभागामार्फत कंपनीवर कायदेशीर कार्यवाही करणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2014 रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. सदर सभेमध्ये यावर सविस्तर चर्चा होऊन Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांना त्यांचे दि.07/10/2014 चे ई-मेल विनंतीनुसार सदर रक्कम जमा करणेसाठी 15 दिवसाचा कालावधीची (दि.23/10/2014 अखेर) मुदत देण्यात यावी, सदर कालावधीत त्यांनी रक्कम जमा केली नाही तर कार्यवाही करणेसाठी त्यांचेबरोबरच्या करारनाम्यातील कलम तपासुन सविस्तर प्रस्ताव सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार करारनाम्यातील खालील कलमाच्या आधारे Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांचेवर कार्यवाही संस्थानचे विधी विभागामार्फत करता येईल.

1. As per clause 7(d) of the agreement concerning MOBILE platform and clause 8. A Legal notice should be first send for NON COMPLIANCE of clause 3(a) and 3(b) for recovery of Royalty/ Donation with clear indication if not complied within 15 days, the matter would be referred to arbitration proceedings IN SHIRDI.

2. As per clause 8(a) & 8(b) of the agreement concerning INTERNET platform and clause 9. A Legal notice should be first send for NON COMPLIANCE of clause 3(a) and 3(b) for recovery of Royalty/ Donation with clear indication if not complied within 15 days, the matter would be referred to arbitration proceedings.

PLEASE NOT HERE THE SEAT OF ARBITRATION IS IN MUMBAI AS AGREED

**मागणी :** मा. व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2014 रोजीचे सभेतील निर्णयानुसार Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांना दि. 23/10/2014 अखेर मुदतवाढ देऊन त्यांनी मोबाईलवरील रक्कम रुपये

66,55,000/- मात्र (दि. 21/12/2014 अखेर दि. 07/03/2011 चे कार्यादेशानुसार) व वेबसाईटवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी येणे बाकी असलेली रक्कम रुपये 3,00,000/- मात्र (दि.31/11/2014 अखेर दि. 18/07/2011 चे कार्यादेशानुसार) असे एकुण रक्कम रुपये 69,55,000/- मात्र येणे बाकी असलेली रक्कम अदा न केल्याने त्यांचे सिग्नल दि. 23/10/2014 पासुन बंद करुन कंपनीचे नाव Black List मध्ये समाविष्ट करण्यात येऊन त्यांचेवर मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार करारनाम्यातील प्रस्ताविकेत नमुद केलेल्या कलमानुसार संस्थानचे विधी विभागामार्फत कंपनीवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** आर्थिक, तांत्रिक व कायदेशीर.

**विभागाचा अभिप्राय :** मा. व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2014 रोजीचे सभेतील निर्णयानुसार Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांना दि. 23/10/2014 अखेर मुदतवाढ देऊन त्यांनी मोबाईलवरील तसेच वेबसाईटवरील श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधेकामी येणे बाकी असलेली रक्कम अदा न केल्याने त्यांचे सिग्नल दि. 23/10/2014 पासुन बंद करुन कंपनीचे नाव Black List मध्ये समाविष्ट करण्यात येऊन त्यांचेवर करारनाम्यातील प्रस्ताविकेत नमुद केलेल्या कलमानुसार संस्थानचे विधी विभागामार्फत कंपनीवर कायदेशीर कार्यवाही करणेकामी सदर विषय मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांना १५ दिवसाची मुदत देऊनही त्यांनी मोबाईलवरील तसेच वेबसाईटवरील श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधेकामी येणे बाकी असलेली रक्कम अदा न केल्याने त्यांचेवर करारनाम्यातील तरतूदीनुसार कायदेशीर कार्यवाही करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३४ साईटेक प्रकल्पाबाबत महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रतिनिधींबरोबर झालेल्या बैठकीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव:** मा. व्यवस्थापन समितीचे दि. 25/09/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 837.

**प्रास्ताविक:** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 799 नुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प

उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना प्रकल्प उभारणीसाठी जा.क्र.एसएसएसटी/आयटी/15030/2009 दि. 09/12/2009 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी साईटेक प्रकल्पाअंतर्गत एकुण 6 टप्प्यामध्ये 37 संगणक प्रणाली व इतर अनुषंगिक बाबींची पुर्तता करुन देणे आवश्यक आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संस्थानला त्यांचे पेमेंट बाबत दिलेल्या पत्राबाबत तसेच साईटेक प्रकल्प आढावा बाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि. 25/09/2014 रोजीचे सभेत झालेल्या सविस्तर चर्चेअंती पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले होते :-

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून संगणक कार्यप्रणालीबाबतची कार्यवाही पुर्ण झालेनंतरच त्यांचे उर्वरीत बीले दिली जावीत. तसेच, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सदर कारणांमुळे प्रकल्पाचे Support व Development चे कामकाज बंद केल्यास, कोणत्याही प्रकारे अडचण निर्माण होऊ नये, यासाठी पर्यायी व्यवस्था तयार ठेवणेकामी कार्यवाही सुरु करणेबाबत पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले होते. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व संगणकीय कार्यप्रणाली तसेच इतर अनुषंगिक हार्डवेअर, नेटवर्क यांचे दुरुस्ती व देखभालीचे काम याच क्षेत्रातील नामांकीत कंपनीकडून करुन घेणेसाठी निविदा तयार करण्यात यावी. सदर निविदा अथवा अन्य पर्यायंाबाबत महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागाचे मार्गदर्शन घेण्यात यावे. तसेच, यापुढे स्टँडबाय अरेंजमेंट सर्वकाळ, सर्व कारणांकरिता केली जावी.

त्यानुसार संबंधीतविषयी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान संचलनालय विभागाचे प्रधान सचिव, श्री राजेश अग्रवाल सोा., यंाचेशी चर्चा केली असता, त्यंानी महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान संचलनालय विभागाचे प्रतिनीधी, श्री मुकेश सोमकुंवर यांना मा. कार्यकारी अधिकारी सोा., व उप-कार्यकारी अधिकारी सोा., यांचेशी समक्ष चर्चा करणेकामी दि. 13/10/2014 रोजी शिर्डी येथे पाठविले होते.

श्री.मुकेश सोमकंुवर व त्यांचे सहकारी यांनी संस्थानंचे मागणीनुसार दि. 14/08/2014 ते दि. 16/08/2014 या कालावधीत शिर्डी येथे येऊन साईटेक प्रकल्पाचे Third Party Audit केलेले आहे. दि. 13/10/2014 रोजी श्री मुकेश सोमकुंवर यांनी शिर्डी येथे येऊन मा.कार्यकारी अधिकारी साो. व मा.उप-कार्यकारी अधिकारी साो. यांचेबरोबर साईटेक प्रकल्पाचे सद्यस्थिती व पुढील कार्यवाही होणेकामी चर्चेमध्ये त्यांनी पुढीलप्रमाणे सुचित केलेले आहे.

साईटेक प्रकल्पाचा अवाका हा अत्यंत मोठ्या स्वरुपाचा असुन त्यामध्ये डेटा व्यवस्थापन, डीआर (पर्यायी व्यवस्था), हार्डवेअर, नेटवर्क व अकाऊंट विभागातील ईआरपी या सारख्या एकुण 37 संगणकीय कार्यप्रणाली तसेच

माहिती सुविधा केंद्र आणि ऑनलाईन सुविधेचा समावेश आहे. सदरच्या कार्यप्रणालींची देखभाल अथवा आवश्यक सुधारणा करणेसाठी दुसरी कंपनी नेमावयाची झाल्यास पुर्ण प्रक्रियेस साधारणपणे 6 महिन्यांचा कालावधी लागू शकतो. तसेच, एका कंपनीने विकसीत केलेल्या कार्यप्रणालींची देखभाल अथवा कार्यप्रणालीत आवश्यक सुधारणा करणे दुसऱ्या कंपनीस तांत्रिकदृष्ट्या अडी-अडचणीचे असते. सबब, सद्यस्थितीत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन संगणकीय प्रणालीबाबत राहीलेली अपुर्ण कामे त्वरीत पुर्ण करुन घेणे उचित ठरेल.

दि.14/08/2014 ते 16/08/2014 या कालावधीत साईटेक प्रकल्पाचे Third Party Audit चे दरम्यान कार्यप्रणालींचा वापर परिणामकारकरित्या होत नसल्याचे आढळून आले असल्याने, श्री.मुकेश सोमकुवर यांनी सर्व विभागातील संबधीतांना कार्यप्रणाली वापरण्याबाबत सक्त सुचना तथा प्रोत्साहीत करण्यात यावे, असे सुचित केलेले आहे.

भविष्यात साईटेक प्रकल्पाचे देखभालीसाठी प्रशिक्षीत तंत्रज्ञाची नेमणुक संस्थानमार्फत करणेऐवजी या क्षेत्रातील नामांकीत एजन्सी/कंपनीकडुन केल्यास अधिक उचित होईल. आवश्यक असणाऱ्या तंत्रज्ञांच्या शैक्षणिक पात्रता व आवश्यक अनुभव याबाबतची महिती महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानला देण्यात येईल, असे त्यांनी सुचविले.

त्यानुसार मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी साईटेक प्रकल्पाचे देखभाल तथा आवश्यक बदल यासाठी नविन तंत्रज्ञ नेमण्याची कार्यवाही, संस्थानचे प्रचिलीत पद्धतीनुसार व महाराष्ट्र शासन, आयटी विभागाचे मार्गदर्शनाखाली/ अभिप्रायानुसार सुरु करण्यात यावी, तसेच साईटेक प्रकल्पाची सद्यस्थितीचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार साईटेक प्रकल्पाची सद्यस्थितीचा अहवाल सोबत जोडलेल्या परिशिष्ट- अ प्रमाणे आहे.

उपरोक्तकामी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान संचलनालय यांचेबरोबर वेळोवेळी ई-मेलद्वारे संपर्क करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान संचलनालय यांनी ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे सुचित केलेले आहे.

1. साईटेकप्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या सर्व कार्यप्रणालीबाबतची कार्यवाही अगोदर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून पुर्ण करुन घेण्यात यावी.
2. कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली वापरासंदर्भात सर्व संबधीतांना सक्त सुचना देण्यात याव्यात.
3. सर्व कार्यप्रणालींचा वापर पुर्णपणे व परिणामकारक होत असल्याची खात्री करण्यात यावी.

4. तदनंतर एजंन्सीमार्फत तंत्रज्ञांची नेमणुक करण्यात यावी, सदरच्या तंत्रज्ञांना कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत प्रकल्पाबाबत सर्व आवश्यक ती माहिती देण्यात यावी. सदरचे तंत्रज्ञ सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे असावेत.
5. एजन्सीची नेमणुक करताना जबाबदारी व कर्तव्ये यांचा स्पष्ट उल्लेख करुन करारनामा तयार करण्यात यावा.
6. सुरवातीस एजन्सीची नेमणुक 1 वर्षाकरिता करण्यात यावी व सदर एजन्सीचे कामकाज समाधानकारक वाटल्यास पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येऊन एजन्सीबरोबर करार करण्यात यावा.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्याचे अगोदर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून संगणक प्रणालींची संपुर्ण माहिती व तांत्रिक ज्ञान, अचुक Source Code सह मिळणे आवश्यक आहे. त्या करिता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून तशी लेखी हमी घ्यावी लागणार आहे.

**मागणी:** वरील सर्व बाबीं विचारात घेता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून संगणक प्रणालीबाबतची कार्यवाही पुर्ण करुन घेतलेनंतर, संस्थानचे प्रचलीत पद्धतीनुसार व महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान संचलनालय यांचे मार्गदर्शनानुसार/ अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक, आर्थिक व कायदेशीर.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :** उपरोक्तप्रमाणे साईटेक प्रकल्पाची सद्यस्थिती व पुढील कार्यवाही बाबतची माहिती मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर अवलोकनार्थ तथा मार्गदर्शनासाठी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पाबाबत महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रतिनिधींबरोबर झालेल्या बैठकीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३५ श्री साईलिला व्दैमासिक मराठी व हिंदी- इंग्रजी नोव्हेंबर-डिसेंबर- २०१४ च्या अंकांची मागील दराने छपाई करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ कलम नं.१७ (ठ) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील 

यानुसार श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने श्री साईलिला-मराठी/ हिंदी– इंग्रजी व्दैमासिक प्रकाशित केले जाते. मे.टॅको व्हिजन, मुंबई यांना इकडील जा.नं.३१४६ दि.१५.१०.२०१३ अन्वये माहे नोव्हेंबर – डिसेंबर – २०१३ ते सप्टेंबर – ऑक्टोंबर २०१४ अखेर मासिके छपाईचा कार्यादेश आहे.

माहे नोव्हेंबर– डिसेंबर-२०१४ ते सप्टेंबर– ऑक्टोंबर २०१४ छपाई कामाच्या निविदा काढणे. तसेच छपाईकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२३,००,०००/- चे खर्चास व विहीत पध्दतीने छपाईची कार्यवाही करणेस मान्यता मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे अर्ज दाखल केला असून अद्याप पावेतो मान्यता मिळालेली नाही.मागील कार्यादेशाची मुदत ऑक्टोबर २०१४ अखेर संपत असून,वर्गणीदारांना पुढील व्दैमासिक अंक वेळेत पाठविता यावा म्हणून माहे नोव्हेंबर– डिसेंबर २०१४ या मराठी व हिंदी – इंग्रजी व्दैमासिकाची छपाई मागील वर्षाच्या मंजूर दराने करुन घेणे क्रमप्राप्त आहे. मे.टॅको व्हिजन प्रा.लि. यांना दूरध्वनीवरुन याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मागील दराने छपाई करुन देणेस दि.१७.१०.२०१४ मेलव्दारे संमती दर्शविली आहे.याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अं.नं. | तपशिल | छपाई संख्या | मागिल मंजूर दर रुपये पैसे | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | श्री साईलीला अंक मराठी व्दैमासिक ( माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०१४ ) पाने ३२+४=३६पाने | १०,००० नग | १०.७५ | १०,७,५००/- |
| २ | श्री साईलीला अंक हिंदी / इंग्रजी व्दैमासिक ( माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०१४ ) पाने ३२+४=३६पाने | १४,००० नग | १०.६५ | १,४९,५००/- |
| | | | एकुण रुपये | २,५६,६००.०० |

दरम्यानचे काळात मा.उच्च न्यायलयाची मान्यता मिळाल्यास विहीत पध्दतीने निविदा मागवून कार्यवाही केली जाईल.

सबब प्रस्तावित केलेप्रमाणे श्री साईलीला व्दैमासिक मराठी/ हिंदी- इंग्रजी माहे नोव्हेंबर- डिसेंबर २०१४ मागील मंजूर दराने मे.टॅको व्हिजन्स प्रा.लि.मुंबई यांचेकडून छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.२,५६,६००/- चे

खर्चास मान्यतेसाठी सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलिला व्दैमासिक मराठी व हिंदी- इंग्रजी नोव्हेंबर-डिसेंबर- २०१४ च्या अंकांची मागील मंजूर दराने मे.टॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई यांचेकडून छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या रु.२,५६,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच साईलिला अंकामध्ये ज्या भक्तांचे अनुभव लिहीले जातील, त्या सर्व भक्तांचे ई-मेल आय.डी., संपर्क क्रमांक दप्तरी ठेवणेत यावे व त्यांनी लिहीलेल्या लेखाची संपुर्ण जबाबदारी त्यांचेवर राहील, हे त्यांना कळविण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३६ मंदिर परिसर, दर्शनहॉल, स्ट्रॉंगरूम, देणगी काऊंटर येथे बसविण्यात येणा-या सीसीटीव्ही कॅमे-यांचे साहित्य व वायरींग कामाचे अंतीम बीलाबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परिसर, दर्शनहॉल, स्ट्रॉंगरुम, देणगी काऊंटर येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेकामी मे. व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोईडा यांचेमार्फत कॅमेरे खरेदी करणेस दि.०७/०२/२०१३ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सविस्तर चर्चा होवुन " मे. व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोईडा या कंपनीचे एकुण १६ नग कॅमेरे खरेदी करणेस व त्यासाठी येणारे रक्कम रु. १८,७०,५६२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. " असा निर्णय झाला आहे. त्यानुसार मे. व्हेन्टेज कंपनी यांचेमार्फत सदर ठिकाणी कॅमेरे बसवुन सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच वरील ठिकाणी बसविण्यात येणा-या कॅमे-यांचे लोकेशननुसार वायरींग, डिगींग, कन्डयुट व त्यासंबंधीचे साहित्यांचा येणारा खर्च व्यतिरीक्त असेल असे टिपणीत नमुद आहे. परंतु त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चाची मान्यतेचा उल्लेख, सदर ठरावात आलेला नाही. सदरची बाब, त्यांचे अंतिम बील अदा करताना लक्षात आलेली आहे. मंदिर परिसर, दर्शनहॉल, स्ट्रॉंगरुम, देणगी काऊंटर येथे बसविण्यात येणा-या सीसीटीव्ही कॅमे-यांचे लोकेशननुसार वायरींग, डिगींग, कन्डयुट व त्यासंबंधीचे साहित्याचे कामासाठी प्रत्यक्ष रक्कम रु. २,१३,५०१/- मात्र खर्चास मा.व्यस्थापन समितीची मान्यता घ्यावी असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त विवेंचनानुसार मंदिर परिसर, दर्शनहॉल, स्ट्रॉंगरुम, देणगी काऊंटर येथे बसविण्यात येणा-या सीसीटीव्ही कॅमे-यांचे लोकेशननुसार वायरींग, डिगींग, कन्डयुट व त्यासंबंधीचे साहित्याचे कामासाठी प्रत्यक्ष झालेला खर्च रु. २,१३,५०१/- मात्र इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोईडा यांना अदा करणेच्या मंजुरीसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर

**निर्णय क्र.९५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसर, दर्शनहॉल, स्ट्रॉंगरुम, देणगी काऊंटर येथे बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमे-यांचे लोकेशननुसार वायरींग, डिगींग, कन्डयुट व त्यासंबंधीच्या साहित्यांचे कामासाठी प्रत्यक्ष झालेल्या रु.२,१३,५०१/- मात्र खर्चाची रक्कम इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोईडा यांना अदा करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------

**विषय नं.३७ मंदिर परिसरात मे.व्हेन्टेज यांचेमार्फत बसविण्यात आलेल्या सुरक्षा यंत्रणेचे तीन दिवसांचे video footage backup पंधरा दिवसांवर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान परिसरात मंदिराचे आतील व बाहेरील बाजुस सीसीटीव्ही कंट्रोल रुममार्फत १२ PTZ व ८९ फिक्स कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. यासाठी संस्थानने ४.५ कोटी खर्च करुन अद्यावत सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणा विकसीत केलेली आहे. सदर यंत्रणा मे.व्हेन्टेज यांचेमार्फत ऑक्टोबर २०११ मध्ये विकसीत करण्यात आली आहे. सदर सुरक्षा यंत्रणेचा video footage backup प्रचलित प्रथेनुसार तीन दिवसांचे आहेत. परंतु पोलिस यंत्रणेकडुन झालेल्या मंदिर सुरक्षा यंत्रणेचे ऑडीट मध्ये राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे दि.१३/०८/२०१४ रोजीचे पत्रात सदर video footage backup पंधरा दिवसांचे करणेबाबत सुचित करण्यात आले होते. त्यानुसार सध्याचे मे.व्हेन्टेज यांचे बसविण्यात आलेल्या सुरक्षा यंत्रणेत बदल करावे लागणार आहे.

सन २०१८ हे बाबांचे शताब्दी वर्ष आहे. यासाठी लाखो साईभक्त येणार असल्याने, बांधकाम विभागामार्फत दर्शनरांग व मंदिर शुशोभिकरणचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयसमोर प्रस्तावित आहे. सदर काम सन २०१५ मध्ये चालु होणे अपेक्षित आहे.[illegible] प्रकल्पात नविन दर्शनरांग व मंदिर परिसरात बरचसे बदल होणार आहे. सध्याची सिस्टीम ही जुन्या तंत्रज्ञानावर असल्यामुळे, सदर कॅमेरे वाढविणेबाबत व video footage backup बाबत Limitation आहे. त्यामुळे सदर बांधकामाचा प्रकल्पानुसार, नविन अद्यावत कंट्रोल रुम व नविन कॅमे-यांचे नियोजित आहे. परंतु तुर्त तातडीचे पंधरा दिवसांचे video footage backup आवश्यक असल्याने, याबाबतचा प्रस्ताव श्री ढगे, कंन्सलटंट यांचे मार्फत Technical Specification मागविण्यात आलेले होते. त्यांनी technical specification देताना सदरची यंत्रणा ही मे. व्हेन्टेज यांचेमार्फत बसविण्यात आली असल्याने, सदर पंधरा दिवसांचे video footage backup ची कार्यवाही मे. व्हेन्टेज यांचेमार्फत करण्यात यावी असे त्यांचे दि.१५/०९/२०१४ रोजीचे ई-मेलमध्ये नमुद आहे व त्यास अनुसरुन मे. व्हेन्टेज यांचेमार्फत सहा महिन्यासाठीचा Turnkey Basis प्रकरणावर प्रस्ताव मागविण्यात आलेला होता व थेट खरेदी संदर्भातही प्रस्ताव मागविण्यात आला होता.

त्यानुसार त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Item | Description | Qty | Unit |
|---|---|---|---|
| **NAS** | Network attached storage device for upto 15 days recording for 48 Sony cameras | 1 | Nos |
| **NAS** | Network attached storage device for upto 15 days recording for 37 Sony cameras | 1 | Nos |
| **NAS** | Network attached storage device for upto 15 days recording for 40 Sony cameras | 1 | Nos |
| **वरिलप्रमाणे बॅकअपसाठी थेट खरेदी केल्यास** | | **रु. १८,००,०००/-** | |
| **सहा महिन्यासाठी Turnkey प्रकल्पासाठी** | | **रु. ३,२५,०००/- प्रतिमहा** | |

वरिलप्रमाणे सर्व साहित्य मे. Vantage यांना खरेदी करावयाचे आहे. कारण सध्याची सिस्टीम त्यांचेमार्फत कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

भविष्यात बाजारात उपलब्ध असणा-या तंत्रज्ञानानुसार, सन २०१७ चे दरम्यान नविन दर्शनरांग व मंदिर परिसरासाठी अद्दवात सीसीटीव्ही Security system विकसीत करावी लागणार आहे असे मत आहे. यामुळे सध्याचे साहित्य हे फक्त नविन प्रस्ताव सादर होईपर्यंतच वारण्यात येणार आहे. परंतु सध्याचे सुरक्षा यंत्रणा मे. Vantage यांची असल्यामुळे, सदरचे पंधरा दिवसांचे video footage backup करणेची कार्यवाही त्यांचेमार्फत करावी लागणार आहे. असे श्री ढगे, सल्लागार यांनी सुचविलेले आहे.

त्यानुसार मे. व्हेन्टेज यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार खालीलप्रमाणेदोन पर्याय उपलब्ध होतात -

१) **पर्याय क्र. १ –** सध्याचे video footage backup पंधरा दिवस करण्यासाठी साधारणपणे १२५ कॅमे-याची सिस्टीम असणारे बॅकअप सिस्टीमसाठी थेट व्हेन्टेजमार्फत खरेदी केल्यास रु. १८ लाख + Tax इतका खर्च अपेक्षित आहे. सदरची रक्कम दहा लाखापेक्षा जास्त असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाची मान्यता घ्यावी लागेल.

२) **पर्याय क्र. २** - सध्याचे video footage backup पंधरा दिवस करण्यासाठी साधारणपणे १२५ कॅमे-याची सिस्टीम असणारे बॅकअप सिस्टीमसाठी सहा महिन्याचे Turnkey तत्वार प्रकल्प राबविल्यास प्रतिमहा रु. ३.२५ लाख + Tax खर्च अपेक्षित आहे.

तसेच तरी video footage backup संदर्भात श्री ढगे, कंन्सलटंट यांनी सदरचे साहित्य सध्याची सीसीटीव्ही यंत्रणा बसविणारे मे. व्हेन्टेज यांचेमार्फत खरेदी करण्यात यावे असे निर्देशित आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी असे नम्र

मत आहे. तसेच सदर प्रकल्पास मान्यता मिळालेनंतर, सदर प्रकल्प २०० दिवसात पुर्ण करता येईल.

तरी उपरोक्त विवेंचनानुसार, मंदिर परिसरात मे.व्हेन्टेज यांचेमार्फत बसविण्यात आलेल्या सुरक्षा यंत्रणेचे तीन दिवसांचे video footage backup पंधरा दिवसांवर करणेसाठी पर्याय क्र.१ नुसार थेट खरेदी करणेसाठी रु. १८ लाख + Tax अथवा सहा महिन्याचे Turnkey तत्वावर राबविणेसाठी प्रतिमहा रु.३.२५ लाख + Tax मात्र खर्चाचे मान्यतेसाठी यथा-योग्य निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.९६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे मंदिर व मंदिर परिसराच्या सुरक्षिततेसंदर्भात मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचेबरोबर बैठक आयोजित करणेत यावी, त्या बैठकीसाठी यापुर्वीच्या सुरक्षा ऑडीटमधील मुद्यांवर संस्थानने काय कार्यवाही केली आहे, याविषयीची माहिती संकलीत करणेत यावी. मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचेबरोबर बैठक झाल्यानंतर उपरोक्त प्रस्तावावर निर्णय घेण्यात येईल, त्याकरिता सदरहू प्रस्ताव त्यावेळी फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख )

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३८ सुट्टी बुंदी व मोतीचूर लाडू भरणेकामी ६”x७” या साईजची लॅमिनेटेड पेपर पिशवी व मशिन पेपर रोल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतुद</u> :-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१ (१घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**<u>प्रस्तावीक</u>:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्थेमार्फत साईक्तांना श्री साईबाबांचा प्रसाद म्हणून १५ ऑगस्ट २०१३ पासून ते दिनांक ३०/०९/२०१४ अखेर मोतीचूरलाडू दर्शन रांगेत मोफत वाटप केले जात होते. तसेच लाडू विक्री काऊंटरला तीन नगाचे एक लाडू पाकिट साईभक्तांना विक्री केली जाते. दररोज अंदाजे लाडू विक्री काऊंटरला २० ते २५ हजार मोतीचूर लाडू पाकिटे विक्री होते. व मंदिर मोफत दर्शन रांगेत ४५ ते ६५ हजार बुंदी पाकिटे वाटप केली जातात. मा.त्रिसदस्य समिती सभा दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०३ अन्वये चर्चा होऊन दर्शन रांगेत भक्तांना सुमारे १०० ग्रॅम वजनाचे दोन लाडू पाकिटांएैवजी त्याच वजनाच्या सुट्टी (लुज) बुंदीचे पाकिट प्रसाद रुपाने देणेस मान्यता देण्यात आली. मात्र प्रसाद लाडू विक्री काऊंटरवर पुर्वीप्रमाणेच १५० ग्रॅम वजनाचे ०३ नग लाडूंचे पाकिट विक्रीसाठी ठेवण्यात यावे असे ठरले.

मंदिर मोफत दर्शन रांगेत सुमारे १०० ग्रॅम वजनाचे बुंदीचे पाकिट भरणेकामी ६"×७" या साईजची लॅमिनेटेड पेपर पिशवी वापरण्यात येणार आहे. तसेच प्रायोगिक तत्वावर तीन नगाचे काऊंटर विक्री लाडू पाकिटे पॅकिंगसाठी मशिनचा वापर करणेत येणार आहे. या करिता पेपर रोल खरेदी करणे आवश्यक आहे. सध्या लॅमिनेटेड पेपर पिशवी वापरात आहे. अंदाजे बुंदीसाठी व लाडू विक्री पाकिटे याकरिता दोन्ही मिळून सहा महिन्यासाठी ६०७ क्विंटल पिशवी लागेल.

त्यामध्ये मोफत लाडू विक्री काऊंटरसाठी सह महिन्याकरिता २२१ क्विंटल व मंदिर मोफत दर्शन रांगेत वाटपासाठी ३८६ क्विंटल पिशवी लागेल. जर मशिनमध्ये अचानक तांत्रिक अडचण आल्यास लाडू व बुंदीसाठी पॅकिंग पिशवी स्टॅंड बाय ठेवावी लागेल.

**<u>मागणी</u>:-** दि. १ ऑक्टोबर २०१४ पासून दर्शन लाईनमधुन दर्शन घेणा-या सर्व साईभक्तांना १०० ग्रॅम वजनाचे मोफत बुंदी पाकिट वाटपाचा निर्णय झाल्याने लॅमिनेटेड पिशवीचा वापर करण्यात येणार आहे. सदर पिशवीचा दर पत्रकातील मान्य दर रु १४४ प्रति किलो असून सहा महिन्यासाठी ६०७ क्विंटल खरेदीसाठी अंदाजीत रक्कम रुपये ८७,४०,८००/- (अक्षरी रक्कम रु.सत्याएैंशी लाख चाळीस हजार आठशे मात्र) इतका खर्च लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-** सन २०१४–२०१५ मध्ये ६"×७" या साईजची लॅमिनेटेड पेपर पिशवी व मशिन पॅकिंग रोल खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ८७,४०,८००/- (अक्षरी रक्कम रु.सत्याएैंशी लाख चाळीस हजार आठशे मात्र) चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मोतीचूर लाडू भरणेकामी ६"×७" या साईजची लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास सिव्हील अर्ज क्र.९२१९ वरील मा.उच्च न्यायालयाचे दि.२६.०९.२०१४ रोजीच्या आदेशान्वये मान्यता मिळालेली असल्याने प्रस्तावित लॅमिनेटेड पेपर पिशवी व मशिन पॅकिंग रोल त्याच खर्चाचे अधीन राहून खरेदी करणेत यावा, असे ठरले.**
(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू प्रसाद निर्मिती विभाग)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३९ नविन लाडू किचन- ठेकेदाराचे बुंदीचे मजुरी बील दरमाह अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतुद</u>-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१ (१घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रस्तावित –** जुने लाडू किचन येथे साईभक्तांना विक्रीसाठी ०३ नगाचे प्रसाद लाडू पाकिटे बनविले जातात. व नविन लाडू किचन येथे मोफत बुंदी प्रसाद बनविण्याचे काम चालु असते. व्यवस्थापन मंडळ सभा दिनांक ०८/१०/२०१३ निर्णय क्र. ८०१ अन्वये दोन्ही ठेकेदारांना नविन लाडू किचन व जुने लाडू किचन येथे प्रत्येकी दोन महिने या प्रमाणे काम दयावे असे ठरले.

त्यानुसार आजपर्यंत कार्यवाही चालु आहे. सध्या या दोघानांही मोतीचूर लाडू बनविणेकामी मजुरी रुपये २३० प्रति हजारी या प्रमाणे देण्यात येत आहे. त्यानुसार दरमहाचे बील अदा केले जाते. जा.नं.एसएसएस/ वशी/प्रसादा/ ३१२/ दि.१९/०४/२०१४ ने शिवसाई केटरर्स व जा.नं. एसएसएस/वशी/प्रसाद/३०९/ दि.१९/०४/२०१४ ने श्री दिपक माधव नाईकवाडी यांना मोतीचूर लाडू बनविणे कामीचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

परंतु मा. व्यवस्थापन मंडळाची सभा दि.११/०९/२०१४ निर्णय क्र. ८०३ अन्वये साईभक्तांना मंदीर दर्शन रांगेत मोफत लाडू प्रसाद वाटप एैवजी सुमारे १०० ग्रॅम वजनाचे सुटटी बुंदीचे पाकिट प्रसाद रुपाने देण्यात मान्यता मिळालेली आहे. मा.त्रिसदस्य व्यवस्थापन समिती सभा दि. १२/०६/२०१४, निर्णय क्र.४६८ ने निर्णय होऊन सन २०१४-१५ साठी न्युनतम दर धारकांचे दर मान्य करणेत आलेले आहेत. मा. उच्च न्यायालय औ. बाद खंडपीठास मान्यतेसाठी सादर केलेले आहे. मा. उच्चन्यायालय औ.बाद यांचेकडील निर्णय होईपर्यंत

सध्याचे **<u>मुदतवाढ दिलेल्या ठेकेदारांचे पुर्वीच्या मान्य दराने बील अदा करावे लागेल.</u>** परंतु हि टेंडर प्रक्रिया मोतीचूर लाडू व बर्फीसाठी आहे.

तसेच मोतीचूर लाडू बनविणेकामी प्रती हजारी रु २३०/- याप्रमाणे मजुरी देण्यात येत आहे. एक क्विंटलमध्ये मोतीचूर लाडू प्रती ५० ग्रॅम या वजनाचे सुमारे ४,९९२ नग लाडू तयार होतात.

सध्या एक क्विंटलचे लाडू तयार करणेकामी ठेकेदारास रु ११४८ = १६ या दराने मजुरी मिळते, त्यामध्ये मोतीचूर बुंदी तळणे, साखरेचा पाक करुन पाकात बुंदी भिजविणे, लाडू वळवून पॅकिंग करणे, अशी सर्व कामे येतात. परंतु सुटटी बुंदी तयार करणेकामी लाडू वळविणे एैवजी बुंदी सुकविणे अशी कामे येतात.

**मोतीचूर लाडू व बुंदीचा तपशिल खालिल तक्त्याप्रमाणे** –

| **मोतीचूर लाडू तयार करणेस लागणारे मटेरियल** | | | | **बुंदीस तयार करणेस लागणारे मटेरियल** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | मालाचे नांव | किलो | ग्रॅम | अ.नं | मालाचे नांव | किलो | ग्रॅम |
| ०१ | साखर | १०० | ००० | ०१ | साखर | १०० | ००० |
| ०२ | ह.बेसन | ६५ | ००० | ०२ | ह.बेसन | ५० | ००० |
| ०३ | गा.तुप | ८० | ००० | ०३ | गा.तुप | ४९ | ९०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | काजु | ०२ | ००० | ०४ | काजू | ०२ | ००० |
| ०५ | खिसमिस | ०२ | ००० | ०५ | खिसमिस | ०२ | ००० |
| ०६ | हि.विलायची | ०० | ५०० | ०६ | जि.रंग | ---- | १०० |
| ०७ | जि. रंग | ०० | १०० | | एकूण मटेरियल | २०४ | ००० |
| | एकुण मटेरियल | २४९ | ६०० | | | | |

| मोतीचूर लाड्ड | बुंदी |
|---|---|
| किलो/ग्रॅम प्र.कि.लाडू नग(५०ग्रॅ) एकुण तयार नग<br>२४९=६००  × २०  = ४,९९२ ÷ २=२४९६ पा.<br>१००० लाडू नग वजन<br>०.५० ×१००० = ४९ कि.९०० ग्रॅ.<br>लाडू तयार करुन पॅकिंग करणे<br>ठेकेदारास मजुरी खालिलप्रमाणे<br>तयार नग × दर ÷ १००० =  रु.  पैसे<br>४९९२ × २३० ÷ १००० = ११४८ = १६ | किलो/ग्रॅम  एकुण बुंदी पाकिटे (१०० ग्रॅम)<br>२०४ ×  १० नग  =  २०४० पाकिटे<br>१००० लाडूचे वजन सरासरी ५० कि.आहे.<br>त्याचा दर रु २३० प्रमाणे एक क्विंटल<br>१ क्विंटल तयार बुंदीचे वजन २०४ कि.आहे<br>या मटेरियल पासून मोतीचूर लाडू ५० ग्रॅम<br>चे ४०८० नग तयार होतील<br>४०८० नग × २३० ÷ १००० = ९३८/- याप्रमाणे<br>मजुरी होईल. |

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत -** बुंदीची फेर निविदा होईपर्यंत सध्या आहे त्याच ठेकेदारांकडून **<u>आहे त्याच दरात काम करुन घेणेस मान्यता असावी.</u>** सध्या एक क्विंटलचे मोतीचूर लाडू तयार करणेसाठी रु ११४८/- (रु. २३० प्रति हजारी ) व एक क्विंटल बुंदी तयार करणेकामी रु ९३८/- ठेकेदाराची मजुरी होते.

**<u>विभागाची मागणी -</u>**

| अ.नं. | किचनचे नांव | दर |
|---|---|---|
| ०१ | जुने लाडू किचन –मोतीचूर लाडू ५० ग्रॅम विक्रीसाठी तयार करुन व पॅकिंग करुन देणे | रुपये २३०/- प्रतिहजारी |
| ०२ | नविन लाडू किचन – सुटटी बुंदी पॅकेट १०० ग्रॅम वजनाचे तयार करुन पॅकिंग करुन देणे | **रुपये २३० /- प्रति ५०० पाकिटे** |

वरील दरात जो ठेकेदार जुने लाडू किचन व नविन लाडू किचनकडे कार्यरत असेल त्यानुसार दरमहा त्यांचे बील अदा करणेस मान्यता असावी.

तसेच बुंदी बनविणे कामी इ निविदा काढणेस सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू प्रसाद निर्मिती विभाग)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४० श्री साई प्रसादालय अन्नपदार्थ तपासणी प्रयोगशाळा साहित्याबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम **2004** मधिल तरतूद :- **अधिनियम** 21(1)(**घ) साईभक्तांना जेवन पुरविणे व अन्नछत्र चालविणे.**

व्यवस्थापन समितीचा ठराव :- 1) **मा.व्यवस्थापन समिती सभा दि.**08/10/2012 **मधील** 31**निर्णय क्र.**830

2) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.27.04.2013 मधील निर्णय क्र.424

प्रस्ताविक:- 1) मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचे दि.08/10/2012 मधील 31निर्णय क्र.830 अन्वये श्री साई प्रसादालयामध्ये अन्नपदार्थ व लाडूप्रसाद तपासणी करणेकामी फुड सेफ्टी ऍण्ड स्टॅण्डर्डस् ऍक्ट2006, रुल्स ऍण्ड रेग्युलेशन-2011 नूसार अद्ययावत प्रयोगशाळेची उभारणी करणेत यावी, यासाठी प्रसादालय मुख्य कार्यालया शेजारील प्रकाशने काऊंटरचे रिकाम्या जागेत बांधकाम विभागाकडून आवश्यक प्रयोगशाळा सेटअप तयार करुन घेणेस तसेच लॅब टेक्निशियन म्हणून Bsc with Chemistry अर्हता प्राप्त असलेल्या 2 तांत्रिक कर्मचाऱ्यांची संस्थानमार्फत नियुक्ती करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दोन बीएस्सी केमिस्ट्री पात्रता धारक कर्मचाऱ्यांची प्रसादालय विभागास बदली करण्यात आलेली आहेत. तसेच तात्कालीन कार्यकारी अधिकारी तसेच बांधकाम विभागाने प्रकाशने काऊंटरचे रिकामे जागा पाहून सदरील जागा न वापरता अन्नदान हॉल शेजारील बंद असलेले चेंजींग रुमची जागा वापरणेत यावी असे सांगितले.

**2)** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.**27.04.2013** मधील निर्णय क्र.**424** नुसार संस्थानचे अन्नपदार्थ क्वॉलिटी कंट्रोल व पृथ्थकरणाची प्रयोगशाळा उभारणीकरीता प्रयोगशाळा ले-आऊट बनविणे, तपासणीचे पध्दती, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे इत्यादीकामे फुड हायजीन व हेल्थ लॅबोरेटरी, पुणे यांची तज्ञ एजन्सी म्हणून नियुक्त करणेस व त्याकामी त्यांना रक्कम रु.**3,40,000/- (**अक्षरी रु.तिन लाख चाळीस हजार मात्र) सर्व करांसहीत आदा करणेस मान्यता मिळालेली असुन, त्यानुसार बांधकाम व विघुत विभागामार्फत

प्रसादालयचे कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या चेंजींग रुम येथे प्रयोगशाळा उभारणीकामी आराखडा बनविणेत येऊन प्रयोगशाळेचे कामकाज सुरु करणेत आलेले आहे.

प्रसादालय अन्नदान शेजारील चेंजींग रुमचा अर्धा भाग हा केमिस्ट्री लॅब बनविणेसाठी उपयोगात येत असून, केमिस्ट्री प्रयोगशाळा कार्यान्वीत झालेनंतर मायक्रोबॉयलॉजी प्रयोगशाळेसाठीची कार्यवाही करणेत येणार आहे. केमिस्ट्री प्रयोगशाळेत अन्न सुरक्षा कायदयानुसार शक्य असलेल्या बेसीक तपासण्या (रासायनिक चाचण्या) करता येईल. मे.फुड हायजिन, पुणे यांनी त्यांचे दि.**19/08/2014** चे पत्रात सदरच्या तपासणीसाठी दोन तांत्रिक कर्मचाऱ्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण देवून त्यांचेकडून अपेक्षित व शक्य होणाऱ्या तपासण्या करुन घेता येईल त्यासाठी आपण त्यांचे नाव व शैक्षणिक पात्रता कळवावी असे नमुद केले असल्याने, दि.**26/08/2014** प्रसादालयाकडील टिपणी अन्वये मंजूरी घेवून दि.**22/09/2014** रोजी प्रसादालयातील दोन तांत्रिक कर्मचारी पुणे येथे प्रयोगशाळा साहित्य व केमिकल्सची माहिती घेण्यासाठी पाठविले असता, फुड हायजिन, पुणे यांनी साहित्याची माहिती देवून साहित्याची यादी, काचेचे साहित्य, केमिकल्सच्या यादया दिलेल्या आहेत तथापि प्रशिक्षण होणे बाकी आहे.

मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचे दि.08/10/2012 मधील 31निर्णय क्र.830 नुसार प्रयोगशाळा सुरु करणेसाठी BSc with Chemistry तांत्रिक कर्मचाऱ्याचे नियुक्ती केल्यानंतर लॅबसाठी इतर आवश्यक स्टाफ, इन्स्ट्रुमेंट, मशिनरी वगैरेबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करता येईल असे नमुद केलेले आहे. श्री साई प्रसादालयात सध्या गावरान तूप व खादयतेल, साखर, रवा डाळीची प्रामुख्याने तपासणी करणे आवश्यक असल्याने प्रथमत: प्रसादलाडूसाठी आवश्यक गावराण तुप व खादयतेलास प्राधान्य दयावे असे नम्र मत आहे. त्यासाठी लागणारे साहित्याचा तपशिल सोबतचे परिशिष्टात सादर केलेला असून साहित्यास रु.8 लाख व उर्वरीत केमिकल्स व किरकोळ साहित्यासाठी रु.1 लाख 50 हजार असे एकुण रु.9 लाख 50 हजार खर्च अपेक्षित आहे. खरेदी करणेत येणाऱ्या साहित्यापैकी काही साहित्य देणगी स्वरुपात साईभक्तांनी देऊ केल्यास त्यांचेकडून घेणेत येऊन त्याऐवजी इतर मालाचे तपासणीसाठी लागणारे दुसरे साहित्य खरेदी करता येईल. प्रयोगशाळा मशिनरी व साहित्य खरेदी करीता वार्षिक बजेटमध्ये रु.16,60,000/- शिल्लक आहे.

**प्रयोगशाळेसाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदीकामी लागणारा कालावधी-**

01. खरेदी प्रस्ताव प्र.अ./उप का.अ./का.अ. यांची मान्यता घेऊन
    06 दिवस
    सभा कामकाज विभागाकडे देणे

02. खरेदी प्रस्तावास त्रिसदस्य समितीची मान्यता घेणे.
15 दिवस

03. जाहिरात करणे, निविदा विक्री करणे व स्वीकारणे
20 दिवस

04. मा.त्रिसदस्य समितीचे सभेत कोटेशन सादर करुन निर्णयास ठेवणे
15 दिवस

05. पुरवठा आदेश देणे, माल पुरवठा करण्याची मुदत
10 दिवस

**मागणी:-** श्री साईप्रसादालयातील अन्न पदार्थ तपासणीकामी आवश्यक असणारे प्रथम टप्प्यातील सोबत दिलेले परिशिष्टात नमुद केलेप्रमाणे गावरान तूप व खादयतेल तपासणी करणेकामी इन्स्ट्रूमेंटस, साहित्य, केमिकल्स जाहिर निविदाद्वारे खरेदीस व त्यासाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास अंदाजे रक्कम रु.9,50,000/- (अक्षरी रक्कम रुपये नऊ लाख पन्नास हजार) अथवा देणगी स्वरुपात मिळालेस देणगी स्वीकारणेस मान्यता असावी.

**संस्थान अधिनियम /ठराव यानूसार अनुमान :- आर्थिक**

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** श्री साई प्रसादालयातील अन्नपदार्थ तपासणीसाठी प्रयोगशाळेचे काम पुर्ण होत येत असल्याने प्रयोगशाळा साहित्य, केमिकल्स आदी साहित्य खरेदी करणे गरजेचे असल्याने उपरोक्त मागणीत नमूद केलेले प्राथमिक टप्प्यातील साहित्य जाहिर निविदाद्वारे खरेदीस व त्यासाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास अथवा देणगी स्वरुपात स्वीकारणेस मान्यता असावी. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील अन्नपदार्थ तपासणीसाठी प्रयोगशाळेचे काम पुर्ण होत असल्याने प्रयोगशाळेमध्ये आवश्यक असलेले प्राथमिक टप्प्यातील प्रयोगशाळा साहित्य, केमिकल्स आदी साहित्य विहीत पध्दतीने जाहिर निविदेद्वारे खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.९,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४१ श्री साईबाबा संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालय (Senior College) सुरु करणेकरीता प्रस्ताव दाखल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतूद</u>-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४) मधील तरतूद क्र.१७(१) व १७ (२)(ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्म निरपेक्षइस शिक्षणास

चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**<u>प्रास्तविक-</u>** शिर्डीत उच्च शिक्षणाची सुविधा नसल्याने शिर्डीतील व परिसरातील मुलींना उच्च शिक्षणासाठी बाहेर गावी जावे लागते त्यामुळे मुलींची सुरक्षितता धोक्यात आली आहे. त्यांना सुरक्षित जीवन जगता यावे व पुढील शिक्षण घेता यावे यासाठी शिर्डीत वरिष्ठ महाविद्यालय (सिनिअर कॉलेज) सुरु करण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन रक्षाबंधन कार्यक्रमात, कृषी व पणन मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.साईबाबा संस्थानच्या कनिष्ठ महाविद्यालयात रक्षाबंधनाचा दि.११ ऑगस्ट २०१४ रोजी कार्यक्रम आयोजित केला होता. त्याप्रसंगी नामदार विखे बोलत होते.यावेळी संस्थानचे कार्यकरी अधिकारी तथा प्रांताधिकारी कुंदनकुमार सोनवणे, उपकार्यकारी अधिकारी अप्पासाहेब शिंदे, पोलीस उपअधीक्षक विवेक पाटील, पोलीस निरीक्षक राम सोमवंशी, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संपत भोसले, तहसीलदार सुभाष दळवी, गटविकास अधिकारी कमलाकर रणदिवे, मुख्याधिकारी धैर्यशील जाधव, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब डांगे, नितीन कोते, नगरसेवक राजेंद्र कोते, उत्तम कोते,ज्ञानेश्वर गोंदकर, विलासआबा कोते, प्राचार्य विकास शिवगजे, प्रशासकिय अधिकारी दिलीप उगले,उत्तमराव गोंदकर,प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रमोद आहेर तसेच सर्व शिक्षक आदींची प्रमुख उपस्थिती होती. नामदार विखे पुढे म्हणाले की सिनिअर कॉलेज बरोबरच एम.सी.व्ही.सी. यासारखे कोर्स शिर्डीत सुरु करता येणे शक्य आहे. त्यासाठी संस्थानचे अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा न्यायाधीश यांना आपण विनंती करू. राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्याची जबाबदारी माझी राहील. सन २०१५ पर्यंत सिनिअर कॉलेज सुरु करता येईल अशा पद्धतीने नियोजन करून मास्टर प्लान तयार करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संस्थानच्या अधिका-यांना दिल्या.

मा.कार्यकारी अधिकारी यांचे निर्देश व मा.मंत्री महोदय यांचे निर्देशानुसार दि.२६ ऑगस्ट २०१४ रोजी पुणे विद्यापीठ येथे समक्ष भेट देऊन माहिती घेतली.पुणे विद्यापीठ येथील उपकुलसचिव श्री बाळासाहेब नाईक (मोबाईल नं.९४२२०८६१६१) यांचेशी तसेच नवीन महाविद्यालय संलग्नता कक्षाचे अधिकारी यांचेशी चर्चा केली. सन २०१५-१६ करीता नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणे करीता तालुकावार बृहद आराखडा दि.३० सप्टेंबर२०१४ अखेर विद्यापीठाचे वेबसाईट वर (www.unipune.ac.in) प्रसिद्ध होईल. बृहद आराखड्यात तालुक्याकरीता जे महाविद्यालय मंजूर असेल त्यानुसार दि.१ ऑक्टोबर ते ३१ऑक्टोबर २०१४ अखेर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतील. त्यावेळी अर्ज करावेत, असे सांगितले.

श्री साईबाबा संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणे करीता राहाता तालुक्या साठी " कला,वाणिज्य व विज्ञान शाखेचे महाविद्यालय" बृहद

आराखड्यात समाविष्ट करणे करीता विद्यापीठाला पत्र देण्यात आले. आणि दि.३०/०९/२०१४ रोजी जाहीर झालेल्या बृहद आराखड्यात राहाता तालुक्याचा आपले मागणीनुसार समावेश झाला आहे.

**मागणी** : (१) श्री साईबाबा संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणे करीता राहाता तालुक्यासाठी " कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे महाविद्यालय" बृहद आराखड्यात समावेश झाल्याने दि.१/१०/२०१४ ते दि.३१/१०/२०१४ अखेर नवीन महाविद्यालया करीता ऑनलाईन अर्ज करण्यास मुदत आहे. मुदतीत अर्ज दाखल करता येईल.या करीता आवश्यक असलेले नवीन महाविद्यालय मान्यता व विद्यापीठ संलग्नता शुल्क (कला,वाणिज्य व विज्ञान शाखानिहाय व विषय निहाय) विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.या करीता रुपये नऊ लक्ष पर्यंतच्या खर्चास मान्यता असावी.

(२) नवीन महाविद्यालयाकरीता फर्निचर,बेंचेस, इमारत यांची आवश्यकता आहे.याबाबत संस्थानचे बांधकाम विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता असावी..

(३) नवीन महाविद्यालया करीता स्टाफ यांची आवश्यकता आहे.याबाबत विद्यापीठ आणि शेजारील महाविद्यालयात जाऊन माहिती घेऊन प्रस्ताव करण्यास मान्यता असावी.

(४) वरिष्ठ महाविद्यालय हा स्वतंत्र विभाग असणार आहे.या वारिष्ठ महाविद्यालयाचा मान्यता प्रस्ताव करणे,त्याकामी पाठपुरावा करणे, फर्निचर, बेंचेस, प्रयोगशाळा साहित्य खरेदी प्रस्ताव करणे, स्टाफ नेमणूकीबाबत प्रस्ताव तयार करणे, संस्थानचे इतर विभागांचे बरोबर समन्वय ठेऊन कार्यवाही करणे,या सर्व बाबी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय या विभागामार्फत करण्यास आणि या कामी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री विकास महादेव शिवगजे (M.Sc.(Physics), M.Ed.,SET (Education)) यांना संस्थान नियमानुसार अतिरिक्त कामाचे मानधन देऊन विशेष कार्य अधिकारी (O.S.D.)/प्रभारी प्राचार्य म्हणून काम नेमून देण्यास मान्यता असावी.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार अनुमान:** नवीन महाविद्यालय सुरु करण्याचा विषय धोरणात्मक व खर्चाचा आहे.

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत-** नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी वरील मागणी (१) ते (४) आवश्यक असून त्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९६४** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालय (Senior College) सुरु करणेकरीता जागा निश्चित करणेत यावी व त्यानंतर वरीष्ठ महाविद्यालय सुरु करणेसाठी शासनास काय आवश्यक आहे, यासह सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा.**

**तसेच, तोपर्यंत शासनाचे बृहद आराखडयामध्ये नोंद होणेसाठी ऑनलाईन अर्ज करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४२ सन २०१३-१४ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतुद :- 17-2 (ण)

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०७/२०१३ निर्णय क्रमांक ५६४ Clause No. ९ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

प्रस्ताविक :- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ६६ पुरवठाधारकांना एकुण रक्कम रु. ३०,५२,८८,३५८/- चे दि. १९/०३/२०१४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे. तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यांचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. वार्षीक मागणी पुर्ण झालेली आहे. व ती औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना दि.१६/११/२०१३ रोजी कार्यान्वित झालेली आहे. तर वार्षीक मागणी प्राप्त होऊन त्यावर मा. त्रिसदस्य समिती सभा दि. २६/०७/२०१३ चे निर्णय क्र. ५६४ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे वार्षीक मागणी मधील संख्या कमी पडेल म्हणून जी औषधे/सर्जिकल साहित्य हे सदर योजने अंतर्गत रुग्णालयासाठी लागतील त्याची अतिरिक्त मागणी वाढवण्यात आलेली आहे अशा एकुण ५८ औषधांसाठी एकुण रक्कम रु. १,३८,४७,४१२ चे खर्चास मा. त्रिसदस्य समिती ची दि. १२/०४/२०१४ रोजी मान्यता मिळालेली असून प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्यास मान्यता मिळणे आहे.

त्यास मान्यता मिळाले नंतर अंतिरिक्त मागणी वार्षीक मंजुर दराने खरेदी करता येईल. परंतु तो पर्यंत रुग्णांना उपचार चालू ठेवणेसाठी सोबतच्या यादीतील औषधांची गरज आहे.

सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा अचानक वाढलेला आहे, राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळतो. त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व  कन्झूमेबल साहित्य वार्षीक मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहे. ती एकाच वेळी खरेदी करुन ठेवता येत नाही जर असे केले तर ती मुदत बाह्य होण्याची शक्यता जास्त असते. व त्यामुळे संस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होईल.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठाधारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ६,९१,०९९/- इतका खर्च येणार आहे. सदर प्रस्तावातील अ. नं. २, ३, ५, ६, ८, ९, १३ व १७ यापुर्वी खरेदी केलेली आहे. याबाबत सोबतच्या तक्त्यातील अ. नं. (६) या रकान्यात दर्शविण्यात आलेले आहे.

मागणी:- सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे,

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय  रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे / सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत एक वर्षासाठी मोफत दयावयाची औषधे उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी वार्षीक मंजुर दराने आहे. सदरचे दर विहीत पध्दतीचा अवलंब करुन एक वर्षाकरिता निश्चित केलेले आहे. व त्यास मा. व्यवस्थापन सभा दि.१५/०३/२०१४ निर्णय क्र. २५४ अन्वये मान्यता देखील आहे. त्यामुळे त्याच मंजुर दराने खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदरचे औषधे खरेदी करुन याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ६,९१,०९९/- चे खर्चाची नोंद घेण्यास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.९६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व झालेल्या खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४३ राष्ट्रीयकृत बँकेमध्ये दोन बचत खाती उघडण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० मधील कलम ४१ क क मधील तरतुदी अंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजुर केलेल्या योजनेनुसार धर्मदाय रुग्णांलयांमध्ये एकुण कार्यान्वीत असलेल्या खाटांच्या संख्येपैकी निर्धन रुग्णांसाठी १०% खाटा मोफत वैद्यकीय उपचाराकरीता व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी १०% खाटा सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचाराकरीता आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे. दोन्ही रुग्णालयांमध्ये वैद्यकीय बिलात सवलत देण्यासाठी स्वतंत्र विभाग कार्यरत आहेत. रुग्णांना वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची मासिक विवरणे मा.सहाय्यक धर्मदाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर येथे सादर केली जातात.

तसेच मासिक निर्धन रुग्ण व दुर्बल घटकांतील रुग्ण (Indigent and Weaker Section Patients) यांचे एकुण बिल वजा जाता उर्वरीत बिल रकमेवर २ टक्के Indigent Patients Fund निर्माण करुन त्याचा विनियोग निर्धन रुग्ण व दुर्बल घटकांतील रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्यासाठी करण्यात यावा व शिल्लक रक्कम पुढे समायोजीत (Carry Forward) करावी अशी तरतुद आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मासिक साधारणतः ७ ते ८ लाख रुपयांपर्यंत रक्कम Indigent Patients Fund खाती वर्ग केले जाते व मासिक सवलत रु.८० ते ९० लाखापर्यंत दिली जाते. त्यामुळे सदर फंड खात्यात रक्कम शिल्लक राहत नाही, तथापि आयपीएफ खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडुन त्याचा नंबर धर्मदाय आयुक्त कार्यालय, अहमदनगर यांना देणे आवश्यक असल्याचे दि.११/०७/२०१४ रोजी मा.धर्मदाय आयुक्त कार्यालय, अहमदनगर येथे सर्व रुग्णालयांची मिटींग झाली त्यामध्ये सुचविले आहे.

त्यास अनुसरुन महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० मधील कलम ४१ क क मधील तरतुदी अंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजुर केलेल्या योजनेस अनुसरुन हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय बिलात सवलत देण्यासाठी कार्यरत असलेल्या स्वतंत्र विभागांनी आवश्यक त्या नियमांची अंमलबजावणी करुन वित्त विभागामार्फत रुग्णालयासाठी निर्देशित केलेल्या कार्पोरेशन बँक शिर्डी शाखेत दोन स्वतंत्र बचत बँक खाती उघडण्यास व त्यासाठी प्रत्येकी रु.५,०००/- असे एकुण रु.१०,०००/- सेव्हींग बँक खात्यातुन वर्ग करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीच्या सभेत सादर.

**निर्णय क्र.९६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------

**विषय नं.४४ आर.एम.ओ. पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणूका करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम 2004 मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम 13 (4) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्‍वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

तसेच शासन निर्णय क्रमांक: सासंवि-2009/433/(37/9) का. सोळा. मंत्रालय मुंबई-400 032 दि. 07/08/2009 नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलकडील नविन आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. सदर आकृतीबंधामधील अट शर्त क्र. 08 समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही असे नमूद आहे.

खालील उमेदवारांनी संस्थान रुग्णालयांमध्ये आर एम ओ या पदावर कंत्राटी पध्दतीने काम करणेस संधी मिळणेकामी अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक करावायाचे हॉस्पीटलचे |
|---|---|---|---|
| 1 | आर जे व्ही एस साई महादेव, | एम.बी.बी.एस. | श्री साईबाबा हॉस्पीटल. |
| 2 | डॉ. वैभव प्रकाश बागुल, कल्याण | एम.बी.बी.एस. | श्री साईनाथ रुग्णालय. |

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये आर एम ओची 40 पदे मंजूर आहेत. त्यापैकी 26 पदे भरलेली असून 14 पदे रिक्त आहेत व एक आर एम ओ उच्च शिक्षणाकरीता दोन वर्षे कालावधीसाठी असाधारण रजेवर आहेत. तसेच श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये 16 पदे मंजूर असून 08 पदे रिक्त आहेत. म्हणजेच दोन्ही रुग्णालयांकडे आर एम ओ ची एकूण 56 पदे मंजूर असून 22 पदे रिक्त आहेत. सध्या श्री साईनाथ रुग्णालयाकडे 02 व श्री साईबाबा हॉस्पीटलकडे 03 असे एकूण 05 आर एम ओ 11 महिने कालावधीसाठी कार्यरत आहेत. त्यांना प्रत्येकी मासिक रु. 27,000/- मानधन देण्यात येत आहे.

या पदाची पात्रता 1) Age not more than 45 years; 2) M.B.B.S. from any Government recognized University अशी असून वेतनबॅन्ड रु. 15600-39100 व ग्रेड पे रु. 5400/- मंजूर आहेत.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, इतर वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी असे एकूण 29 प्रकारची पदे भरणेकामी उमेदवारांकडून अर्ज मागविणेसाठी संस्थान वेबसाईटवर व दि. 30/07/2014 रोजीचे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमध्ये आर एम ओ या पदाच्या 15 जागांचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि जाहिरातीव्दारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्याने रुग्णालयांमध्ये रुग्ण सेवेत अडथळे येऊ नये म्हणून उपरोक्त तक्त्यातील उमेदवारांना त्यांचे नावासमोर स्तंभ क्र. 4 मध्ये दर्शविलेल्या हॉस्पीटलकडे 11 महिने कालावधीकरीता किंवा जाहिरातीव्दारे पदे भरेपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीसाठी कंत्राटदारामार्फत आर एम ओ या पदावर घेण्यात यावे, अशी मागणी प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी केली आहे. त्याचे मानधनासाठी 11 महिने कालावधीकरीता संस्थानवर रु. 5,94,000/- वार्षिक आर्थिक बोजा पडेल. याकामी मा. हायकोर्टाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलकडे एक व श्री साईनाथ रुग्णालयाकडे एक अशी आर.एम.ओ. ची दोन पदे संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत भरण्यात यावी.**

**तसेच सदरहू आर.एम.ओ. यांना प्रस्तावातील स्तंभ क्र. 4 मध्ये दर्शविलेल्या हॉस्पीटलकडे 11 महिने कालावधीकरीता किंवा जाहिरातीव्दारे पदे भरेपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीसाठी प्रत्येकी रु.२७,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४५ श्री साईबाबा हॉस्पिटलकडील आर.एम.ओ यांना वेतनश्रेणी लागू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. सुभाष शामकुवर, डॉ. सुर्यकांत पाटील, डॉ. दिपक कांदळकर, डॉ. उल्हास पवार या चार निवासी वैद्यकीय अधिकारी यांनी दि. 18.08.2014 रोजीचा विनंती अर्ज सादर केला आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, आकृतीबंधास शासनाची मान्यता आलेनंतर नियुक्ती तारखेपासून त्यांना वेतनश्रेणीनुसार मासिक वेतन देण्यात येवून त्यांच्या नेमणूका करण्यात याव्यात असे कार्यकारी अधिकारी यांचे स्पष्ट आदेश असतांना सुध्दा 2005 पासून वेतनश्रेणी लागू केलेली नाही. सन 2005 मध्ये डॉ. दिपकसिंग सरदार यांना नियुक्ती तारखेपासून वेतनश्रेणी दिली गेली. परंतू डॉ. सुभाष शामकुवर, डॉ. सुर्यकांत पाटील हे सुध्दा सन 2005 मध्ये रुजू झालेले असतांना त्यांना नियुक्ती तारखेपासून वेतनश्रेणी

दिली गेली नाही. त्यांना मानधन देण्यात आले हे अन्यायकारक आहे. सदरच्या चार वैद्यकीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे मागण्या केलेल्या आहेत.

1. रुजू झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागू करुन फरकाची रक्कम अदा करावी.

2. सर्व्हिस रेकॉर्डला हजर तारखेमध्ये तशी नोंद करण्यात यावी.

3. पगार स्लीपमध्ये रुजू झालेल्या तारखेची नांेद करावी.

4. सहाव्या वेतन आयोगानुसार मिळणारा फरक देण्यात यावा.

5. रुजू झालेल्या तारखेपासून तत्सम फायदे, रजा वगैरे मिळावेत.

वरिल चार वैद्यकीय अधिकारी यांनी याकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन्स् दाखल केले होते. त्यामध्ये मा. न्यायालयाने दि. 30.06.2014 रोजी असा आदेश दिला की, मा. व्यवस्थापनाने अर्जदारांचे अर्जाबाबत चार महिन्यात निर्णय घ्यावा.

वरिल चार वैद्यकीय अधिकाऱ्यांचा पूर्व इतिहास खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | कामावर हजर तारीख | मानधन | सुरुवातीस वेतनश्रेणी दिलेची तारीख | रिट पिटीशन क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | डॉ. सुभाष शामकुवर आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल | 17.10.2005 | 17,000 | 01.08.2007 | ५२६७/२०१४ |
| 2 | डॉ. सुर्यकांत पाटील बी. टी. ओ. साईनाथ रुग्णालय | 07.10.2005<br>01.09.2008 | 17,000 | 01.08.2007 | ५२५९/२०१४ |
| 3 | डॉ. दिपक कांदळकर आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल | 07.09.2006 | 17,000 | 07/09/2007 | ५२७६/२०१४ |
| 4 | डॉ. उल्हास पवार आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल | 01.06.2006 | 17,000 | 01/08/2007 | ५२६०/२०१४ |

वरिल चार वैद्यकीय अधिकारी यांना नेमणूका देताना नेमणूक आदेशात स्पष्टपणे असे म्हटले होते की, त्यांच्या नेमणूका महाराष्ट्र शासनाच्या आकृतीबंधास मिळणाऱ्या मंजूरीच्या अधिन राहून नेमणूका देण्यात येत आहे. कारण त्यांच्या नेमणूकीच्या वेळेस त्यांच्या पदासाठी महाराष्ट्र शासनाने आकृतीबंधामध्ये मंजुरी दिलेली नव्हती म्हणून त्यांना दरमहा वेतन न देता मासिक मानधन देण्यात आले होते. सदरचा आदेश विनातक्रार स्विकारुन सदरचे वैद्यकीय अधिकारी कामावर हजर झाले होते.

डॉ. दिपकसिंग सरदार यांची नेमणूक रिक्त पदावर करण्यात आली होती. त्यामुळे त्यांना सुरुवातीपासूनच वेतनश्रेणीमध्ये पगार देण्यात आला होता. या कारण मिमांसेचा विचार न करता अर्जदार डॉ. दिपकसिंग सरदार यांच्या नेमणूकीशी तुलना करुन अवास्तव व बेकायदेशीर मागण्या करत आहेत. शासन निर्णय क्रं. सासावि/2005/317 ( 103) का. 16, विधी व न्याय विभाग, दि. 13.06.07 अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि. 22.09.2007 रोजीचे सभेत निर्णय क्रं. 702 अन्वये असे ठरले की, ज्या कर्मचाऱ्यांना सेवेत 1 वर्ष पूर्ण झालेनंतर त्यांचा परिविक्षाधीन कालावधी वाढविण्यात आला आहे. त्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात आणून त्यांना दि. 01.08.2007 पासून वेतनश्रेणीवर नेमणूका देणत याव्यात. त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलकडे मेडीकल व पॅरामेडीकल कर्मचारी यांना वेतनश्रेणी देवून सेवा पुढे चालू ठेवण्यात आलेली आहे. अर्जदारांना देखील दि. 01.08.2007 पासून वेतनश्रेणी देवून सेवा पुढे चालू ठेवण्यात आलेली आहे. त्यानंतर दरवर्षी त्यांना वार्षिक वेतनवाढ अदा केलेल्या आहेत.

अर्जदार त्यांच्या अर्जामध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि. 05.11.2005 रोजीचे सभेतील निर्णय क्र.667 व मा. कार्यकारी अधिकाऱ्यांचे आदेश जा. नं. एसएसएस/वशी 01/75/2005 दि. 07.01.2006 यांचा आधार घेवून मागण्या मान्य कराव्यात असे म्हणत आहेत. परंतू सदरच्या कागदपत्राचे अवलोकन करता असे दिसते की, कार्यकारी अधिकारी यांचे आदेशात असे नमूद केले आहे की, कर्मचारी आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळालेनंतर संबंधितांच्या हजर तारखेपासून त्यांना वेतनश्रेणी देवून देय्य होणारी फरकाची रक्कम रोखीने अदा करण्यात यावी. तसेच मा. व्यवस्थापनाच्या निर्णयात असे म्हटले आहे की, वेतनश्रेणीनुसार संबंधितांना देय्य होणारे एकूण मासिक वेतन विचारात घेवून शासनाची मान्यता होईपावेतो खालीलप्रमाणे मासिक मानधन देण्यात यावे. व आकृतीबंधास शासनाकडून मान्यता झालेनंतर संबंधितांच्या नियुक्ती तारखेपासून त्यांना वेतनश्रेणीनुसार मासिक वेतन देण्यात येवून त्यांच्या नेमणूका नियमित करण्यात याव्यात. आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळेपर्यंत त्यांना खालीलप्रमाणे मानधन तत्वार नेमणूका दयाव्यात. अशाप्रकारे

मा. व्यवस्थापनाचा निर्णयात किंवा कार्यकारी अधिकारी यांचे आदेशात असे कुठेही नमूद नाही की, अर्जदारास त्यांचे सुरुवातीचे रुजू तारखेपासून वेतनश्रेणीत पगार अदा करण्यात यावा. उलटपक्षी असे म्हटले आहे की, शासनाची मान्यता मिळेपर्यंत शासनाच्या मान्यतेस अधिन राहून अर्जदाराने मानधन देण्यात यावे. शासनाची मान्यता मिळाल्यानंतर अर्जदारांना वेतनश्रेणीमधे वेतन अदा करण्यात यावे. असे म्हटलेले आहे. परंतू अर्जदार व्यवस्थापन निर्णय व कार्यकारी अधिकारी यांचे आदेश यातील विवेचनाचा स्वत:च्या बाजूने विपर्यस्त अर्थ काढत आहे. तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेशात देखील तशा प्रकारचा उल्लेख नाही.

अर्जदार अ. नं. 1 यांनी यापूर्वी याच मागण्यांसाठी दि. 21.08.2012 व दि. 16.12.2013 रोजी अर्ज सादर केले होते. त्यांना यापूर्वी दि. 04.03.2013 रोजी कळविण्यात आले आहे की, तुमच्या मागण्या मान्य करता येत नाही तसेच वरिल चारही अर्जदारांनी यापूर्वी याच मागण्यांसाठी दि. 05.03.2014 व दि. 12.02.2014 रोजी विनंती अर्ज सादर केले होते. त्यावेळी देखील त्यांना दि. 22.03.2014 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे की, आकृतीबंधास व श्री साईबाबा संस्थान आस्थापनावरील विविध पदांचे आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळालेनंतर मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार तुम्हास वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. त्यामुळे तुमच्या मागण्या मान्य करता येणार नाही. असे असतांनाही देखील अर्जदार यांनी मा. उच्च न्यायालयासमोर रिट पिटीशन दाखल केले होते.

अशाप्रकारे महाराष्ट्र शासनाची आकृतीबंधास मंजूरी नसल्याने अर्जदार यांना वेतनश्रेणीत पगार न देता सुरुवातीस मानधन अदा करण्यात आलेले आहे ते आदेश त्यांनी विनातक्रार स्विकारलेले आहेत. शासनाची आकृतीबंधास मान्यता आलेनंतर मा. व्यवस्थापनाचे निर्णयानंतर अर्जदार यांना वेतनश्रेणीमध्ये वेतन अदा करण्यात आलेले आहे. त्यानंतर प्रत्येक वर्षी अर्जदारास वार्षिक वेतनवाढी अदा करण्यात आलेल्या आहेत. आकृतीबंधास शासनाची मान्यता नसलेने अर्जदारांना सुरुवातीचे रुजू तारखेपासून वेतनश्रेणीमध्ये वेतन देता येणार नाही. अर्जदारावर कुठल्याही प्रकारचा अन्याय झालेला नाही. अशाच प्रकारे डॉ. दादासाहेब लुमा कांबळे, असो, कन्सलटंट यांनी विनंती अर्ज व रिट पिटीशन नं. 8911/2013 दाखल केले होते. मा. व्यवस्थापन समितीने दि. 03.08.2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 651 अन्वये त्यांची मागणी अमान्य करणेत आलेली आहे.

तरी अर्जदारांचे दि. 12.02.2014 रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकडील ०४ आर.एम.ओ. यांना त्यांचे हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४६ क्लिनिकल असिस्टंट पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम 2004 मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम 13 (4) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

तसेच शासन निर्णय क्रमांक: सासंवि-2009/433/(37/9) का. सोळा. मंत्रालय मुंबई-400 032 दि. 07/08/2009 नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलकडील नविन आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. सदर आकृतीबंधामधील अट शर्त क्र. 08 च् समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमूद आहे.

डॉ. महेश जगन मिस्तरी यांनी दि. 30/09/2014 रोजी अर्ज सादर करुन श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये क्लिनिकल असिस्टंट (सीव्हीटीएस) या पदावर कंत्राटी पध्दतीने काम करणेस संधी मिळावी अशी विनंती केली आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता एम.बी.बी.एस., एम.एस. (जनरल सर्जरी), एम.सी.एच. (सीव्हीटीएस) अशी आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये क्लिनिकल असिस्टंटची 10 पदे मंजूर असून ती रिक्त आहेत. या पदाची पात्रता 1) Age not more than 45 years; 2) MD/MS/DNB/MCH/DM from any Government recognized University. अशी असून वेतन बॅन्ड रु. 15600-39100 मध्ये मुळ वेतन रु. 18750+ग्रेड वेतन रु. 6600 असे मंजूर आहेत.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, इतर वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी असे एकूण 29 प्रकारची पदे भरणेकामी उमेदवारांकडून अर्ज मागविणेसाठी संस्थान वेबसाईटवर व दि. 30/07/2014 रोजीचे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमध्ये क्लिनिकल असिस्टंट (सीव्हीटीएस) चे दोन पदांचा समावेश आहेत. तथापि जाहिरातीव्दारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्याने डॉ. महेश जगन मिस्तरी यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे 11 महिने कालावधीकरीता किंवा जाहिरातीव्दारे पदे भरेपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीसाठी कंत्राटदारामार्फत सदरचे पदावर नेमणूक करण्यात यावी, असे प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी सुचविले आहे.

डॉ. महेश जगन मिस्तरी यांना प्र. वैद्यकिय संचालक यांचे अभिप्रायानुसार कंत्राटदारामार्फत घेता येईल व त्यांना आदेश क्र. 3502/2009 दि. 01/10/2009 अन्वये मासिक रु. 35,000/- मानधन देता येईल. 11 महिने कालावधीकरीता संस्थानवर रु. 3,85,000/- वार्षिक आर्थिक बोजा पडेल. याकामी मा. हायकोर्टाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आवश्यक असलेल्या क्लिनिकल असिस्टंट या पदावर, संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत त्या पात्रतेचा कुशल कंत्राटी कर्मचारी घेण्यात यावा.**

**तसेच सदरहू क्लिनिकल असिस्टंट यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे 11 महिने कालावधीकरीता किंवा जाहिरातीव्दारे पदे भरेपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीसाठी रु.३५,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४७ क्लिनिकल असिस्टंट (सी.व्ही.टी.एस.) व कन्सल्टंट (प्लास्टीक सर्जरी) या पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणूका करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम 2004 मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम 13 (4) मध्ये प्रामुभेख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

तसेच शासन निर्णय क्रमांक: सासंवि-2009/433/(37/9) का. सोळा. मंत्रालय मुंबई-400 032 दि. 07/08/2009 नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलकडील नविन आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. सदर आकृतीबंधामधील अट शर्त क्र. 08 समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही असे नमूद आहे.

कंत्राटी पध्दतीने काम करणेस संधी मिळणेकामी खालील उमेदवारांनी अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | डॉ श्वेता प्रल्हाद शेंडे, | क्लिनीकल असि (सीव्हीटीएस) | एमसीएच (सीव्हीटीएस) |

| | | | |
|---|---|---|---|
| | सातारा | | |
| २ | डॉ अक्षय पदमाकर देशपांडे, सातारा | कन्सल्टंट (प्लास्टीक सर्जरी) | एमसीएच, डीएनबी (प्लॅस्टिक सर्जरी) |

डॉ. स्वेता प्रल्हाद शेंडे व डॉ अक्षय पदमाकर देशपांडे यांनी दि. 17/10/2014 रोजी अर्ज सादर करुन अनुक्रमे क्लिनिकल असिस्टंट (सीव्हीटीएस) व कन्सल्टंट (प्लास्टीक सर्जरी) या पदावर कंत्राटी पध्दतीने काम करणेस संधी मिळावी अशी विनंती केली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये क्लिनीकल असि (सीव्हीटीएस) व कन्सल्टंट (प्लॅस्टीक सर्जरी) पदांसाठी खालीलप्रमाणे पात्रता व वेतन बॅन्ड मंजूर झालेले आहे.

| अ नं | पदाचे नाव | मंजूर शैक्षणिक पात्रता व वेतन बॅन्ड | मंजूर पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | क्लिनिकल असिस्टंट (सीव्हीटीएस) | 1) Age not more than 45 years; 2)MD/MS/DNB/MCH/DM from any Government recognized University. 3) Pay band-15600-39100, Basic-18750+GP-6600. | १० | १० |
| २ | कन्सल्टंट (प्लास्टीक सर्जरी) | 1) Age not more than 45 years; 2)MD/MS/DNB/MCH/DM from any Government recognized University. 3) Pay band-15600-39100, Basic-18750+GP-6600. | ०१ | ०१ |

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, इतर वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी असे एकूण 29 प्रकारची पदे भरणेकामी उमेदवारांकडून अर्ज मागविणेसाठी संस्थान वेबसाईटवर व दि. 30/07/2014 रोजीचे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमध्ये क्लिनिकल असिस्टंट (सीव्हीटीएस) चे दोन पदांचा समावेश आहेत. तथापि जाहिरातीव्दारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्याने डॉ. श्वेता प्रल्हाद शेंडे व डॉ अक्षय पदमाकर देशपांडे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे 11 महिने कालावधीकरीता किंवा जाहिरातीव्दारे पदे भरेपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीसाठी कंत्राटदारामार्फत सदरचे पदावर नेमणूक करण्यात यावी, असे प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी सुचविले आहे.

डॉ. श्वेता प्रल्हाद शेंडे व डॉ अक्षय पदमाकर देशपांडे यांना प्र. वैद्यकिय संचालक यांचे अभिप्रायानुसार कंत्राटदारामार्फत श्री साईबाबा हॉस्पिटलकडे घेता येईल व त्यांना आदेश क्र. 3502/2009 दि. 01/10/2009 अन्वये प्रत्येकी मासिक रु. 35,000/- मानधन देता येईल. 11 महिने कालावधीकरीता

संस्थानवर रु. 7,70,000/- वार्षिक आर्थिक बोजा पडेल. याकामी मा. हायकोर्टाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आवश्यक असलेल्या क्लिनिकल असिस्टंट (सी.व्ही.टी.एस.) व कन्सल्टंट (प्लास्टीक सर्जरी) या पदावर, संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत त्या पात्रतेचे कुशल कंत्राटी कर्मचारी घेण्यात यावे.**

**तसेच सदरहू क्लिनिकल असिस्टंट (सी.व्ही.टी.एस.) व कन्सल्टंट (प्लास्टीक सर्जरी) यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे 11 महिने कालावधीकरीता किंवा जाहिरातीव्दारे पदे भरेपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीसाठी प्रत्येकी रु.३५,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४८ लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी नेमणूक असलेल्या श्री.रवि आगुस्तीन मुन्तोडे यांची मुदत संपुष्टात आल्याने त्यांना पुढील ११ महिने तात्पुरते कालावधीसाठी नेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८/१०/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७६२ अन्वये मुलाखतीत पात्र ठरलेल्या 37 उमेदवारांना एक वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीसाठी नेमणूक आदेश देण्यात आले होते. परंतु, बिंदु नामावलीनुसार प्रवर्गातील पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने मुलाखतीत पात्र ठरलेल्या उमेदवारांमधून 27 उमेदवारांना 11 महिने कालावधीसाठी तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आले होते. असे एकूण 64 (३७+२७=६४) उमेदवारांना स्टाफनर्स या पदासाठी नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. त्यापैकी 14 उमेदवार हजर न झाल्याने त्यांचे नेमणूक आदेश रद्द करून त्यांचे जागेवर व उर्वरित रिक्त जागांवर मुलाखती घेण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीतील उर्वरित उमेदवारांना नेमणूक आदेश देण्यात आलेले आहे. सदर उमेदवारांमध्ये श्री रवि आगुस्तीन मुन्तोडे यांचे नावाचा समावेश असून त्यांची श्री साईबाबा हॉस्पिटलकडे स्टाफनर्स या पदावर जा.नं.एसएसएस/वशी०१/१८९४३/२००८ दि. २९/१२/२००८ नुसार 11 महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करण्यात आली होती. सदर 11 महिन्यांची तात्पुरती नेमणूक संपुष्टात आल्यानंतर मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार वेळोवेळी खालीलप्रमाणे नेमणूक देण्यात आलेली आहे.

| अनं | पासून | पर्यंत |
|---|---|---|
| ०१ | ०१/०१/२००९ | ३०/११/२००९ |
| ०२ | ०५/०२/२०१० | ०४/०१/२०११ |
| ०३ | ०७/०१/२०११ | ०६/०७/२०११ |

| | | |
|---|---|---|
| ०४ | ०७/०७/२०११ | ०६/१२/२०११ |
| ०५ | ०९/१२/२०११ | ०८/११/२०१२ |
| ०६ | १०/११/२०१३ | ०९/१०/२०१४ |

मा त्रिसदस्यीय समितीचे दि. १७/०९/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६३१ व मा मुंबई हायकोर्टाचे खंडपीठ औरंगाबाद यांचा सिव्हील अॅप्लीकेशन नं. ९४१७/२०१३ मधील दि. ०२/०८/२०१३ रोजीचे आदेशानुसार श्री रवि आगुस्तीन मुन्तोडे, कंत्राटी परिचारक यांना 11 महिने कालावधीसाठी (दि.१०/११/२०१३ पासून ते दि. ०९/१०/२०१४ अखेर) लेबर कॉन्ट्रॅक्टर मार्फत कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यात आली होती.

जा.नं.एसएसएस/वशी-एसएसबीएच/मेट्रन-७०/२०१४ दि. ०८/१०/२०१४ अन्वये श्री रवि आगुस्तीन मुन्तोडे, कंत्राटी परिचारक यांचे उपरोक्त कालावधीतील काम समाधानकारक आहे. तसेच हॉस्पिटलमध्ये परिचारीकांची संख्या कमी असल्याने त्यांना मुदतवाढ देण्यात यावी असा अभिप्राय प्र वैद्यकीय संचालक यांनी दिलेला आहे.

तरी, प्र. वैद्यकीय संचालक यांचे अभिप्रायास अनुसरून व मा न्यायालयाचे आदेशानुसार श्री रवि आगुस्तीन मुन्तोडे, कंत्राटी परिचारक यांना पुढील 11 महिने कालावधीसाठी लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलकडे आवश्यक असणारे कंत्राटी परिचारक, संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून ११ महिने कालावधीसाठी सिव्हील अॅप्लीकेशन नं.९४१७/२०१३ वरील मा.उच्च न्यायालयाचे दि. ०२/०८/२०१३ रोजीच्या आदेशानुसार घेण्यात यावे**

**तसेच, समिती कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर घेण्यास मान्यता देत आहे, कुणाच्या विशिष्ट नावाची शिफारस करत नाही, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४९ Portable 2D Echo मशिनचे दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 5323, दि. 30/03/2010 अन्वेय मे. टुलिप्स इलेक्ट्रॉनीक्स इंडिया प्रा. ली. मुंबई यांचेकडुन M/s. Fujifilm Sonosite India Pvt. Ltd., या कंपनीचे एक Portable 2D Echo मशीन (मॉडेल- Micromaxx) दोन प्रोब सह एकुण रु. 14,50,000/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर मशीन दि. 20/05/2010 रोजी बसविण्यात आले असुन दि. 19/05/2005 रोजी सदर मशीनचा वॉरंटी कालावधी संपत आहे. कंपनीने मुळ मशिनकरीता पाच वर्षाचा वॉरंटी कालावधी दिलेला आहे. तसेच मशिन सोबत असलेल्या ऍक्सेसरीज (उदा. Probe (S) MiniDock, Battery, Power Adaptor, DVD Writer & Thermal Printer) करीता कंपनीने एक वर्षाचा वॉरंटी दिलेली आहे.

सदर वॉरंटी कालावधी मध्ये कंपनीचे इंजिनीअर मशिनचे दुरूस्ती व देखभाल करीत आहे.

सध्या उपरोक्त मशिन व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार सदर मशिनची तपासणी कली असता मशिनचे Battery charger खराब झाल्याचे व सदर Charger दुरूस्त होउ शकत नसल्यामुळे नवीन खरेदी करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर मशिन कार्डीयाक विभागामध्ये नियमीत वापरात असुन तातडीने Battery charger खरेदी करणे आवश्यक आहे. त्यासाठी मशिनचे मुळ उत्पादक कंपनी M/s. Fujifilm Sonosite India Pvt. Ltd, Gurgaon यांचेकडे Battery charger करीता विचारणा केली असता त्यांचे पत्र दि. 04/10/2014 अन्वये सदर Battery charger (Exchange) करीता सर्व करांसहीत एकुण रू 46,836/- (अक्षरी रू. शेहेचाळीस हजार आठशे छत्तीस मात्र) इतका खर्च येणार असुन सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केली आहे. सदर Battery Charger करीता कंपनी तीन महिन्यंाची वॉरंटी देत आहे.

तरी M/s. Fujifilm Sonosite India Pvt. Ltd, Gurgaon यांचेकडुन Portable 2D Echo मशीनचे Battery Charger बदलणेकामी येणाऱ्या एकुण रू.46,836/- चे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.९७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५० Cyto Centrifuge (Sakura) मशिनचे कन्झयुमेबल स्पेअर पार्ट खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलच्या हिस्टो-पॅथोलॉजी लॅब मध्ये रूग्णांचे शस्त्रक्रियेनंतर काढण्यात आलेल्या अवयवांची तपासणी करणेकामी पुरवठा आदेश क्र.1750/2008, दि.29/01/2008 अन्वये मे.जे.एस.पी. सर्जिकल, नाशिक यांचेकडुन SAKURA कंपनीचे Cyto Centrifuge (Model-Cyto-Tek) मशिन एकुण रू. 5,52,900/-इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर मशिनसाठी कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे. वॉरंटी कालावधी संपल्यानंतर बायोमेडिकल इंजिनीअरींग विभागामार्फत सदर मशिनची नियमीत दुरूस्ती व देखभाल केली जात आहे. परंतु मशिन दरूस्ती करीता आवश्यक असणारे कन्झ्युमेबल पार्टस संबधित कंपनीकडून खरेदी केले जातात.

सध्या उपरोक्त मशिन करीता आवश्यक असणारे कन्झ्युमेबल स्पेअर पार्टस् (उदा. Specimen Chember, Filter Paper) मिळण्यासाठी सदर विभागाने कळविले आहे. त्यानुसार मशिनचे मुळ उत्पादक SAKURA कंपनीचे

अधिकत सर्व्हिस डिलर मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. मुंबई यांचेकडे विचारणा केली असता सदर स्पेअर पार्टस्‌चा पुरवठा करू शकत असल्याचे कळविले आहे. त्यासाठी कंपनीने त्यांचे क्र. पत्र THPL/QUO/2014-15/405, दि. 30/08/2014 अन्वये कन्झ्युमेबल स्पेअर पार्ट बदलणेकामी सर्व करांसहीत एकुण रू 1,07,997/- (अक्षरी रु.एक लाख सात हजार नउशे सत्याण्णव मात्र) इतका खर्च आहे. सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेअंती वरील कन्झ्युमेबल स्पेअर पार्ट श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये प्राप्त झालेनंतर सदर रक्कम अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे. सदर Cyto Centrifuge मशिनचे स्पेअर पार्ट करीता मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. मुंबई हे एकमेव पुरवठाधारक आहेत व त्यांचेकडेच सदर Cyto Centrifuge चे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात. सदर कन्झ्युमेबल स्पेअर पार्टस् प्राप्त होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनंतर अंदाजे सहा ते आठ आठवडयांचा कालावधी अपेक्षीत आहे.

तरी मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. मुंबई यांचेकडुन Cyto Centrifuge मशिन करीता कन्झ्युमेबल पार्ट खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. 1,07,997/- च्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या हिस्टो-पॅथोलॉजी लॅबमधील Cyto Centrifuge मशिन करीता आवश्यक असलेले कन्झ्युमेबल पार्ट मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. मुंबई यांचेकडुन खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.१,०७,९९७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५१ श्री साईनाथ रुग्णालयातील सर्जरी ऑपरेशन थिएटर विभागाकरीता LED Light Source with Lamp खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील सर्जरी ऑपरेशन थिएटर विभागाने दि.07/08/2014 (औषध भांडार प्राप्त दि.01/09/2014) चे मागणी पत्रान्वये 1 नग LED Light Source with Lamp ची मागणी केलेली आहे. सध्या सर्जिकल ऑपरेशन थिएटर विभागात एक Xenon Light Source आहे.

सदरचे 01 नग LED Light Source with Lamp खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.3,47,000/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.12/06/2014 रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.522 अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 1 विभागा करीता LED Light Source with Lamp विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदीकामीचा अंदाजे रक्कम रु.3,47,000/- चे प्रस्तावास मान्यता मिळालेली असून त्यानुसार दैनिक - सार्वमत, पुण्यनगरी या वर्तमान पत्रात जाहिरात

देण्यात येऊन दि.23/09/2014 अखेर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. तेंव्हा सदरचे प्रस्तावामध्ये निर्णय होऊन मंजुर झालेल्या मंजुर दराने सदरहू LED Light Source with Lamp खरेदी करता येईल

मागणी :- श्री साईनाथ रुग्णालयातील सर्जरी ऑपरेशन थिएटर विभागाने दि.07/08/2014 (औषध भांडार प्राप्त दि.01/09/2014) रोजीचे मागणी पत्र.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2 (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे 02 धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:- तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील सर्जरी ऑपरेशन थिएटर विभागाकरिता 01 नग LED Light Source with Lamp श्री साईबाबा रुग्णालयाकरिता विहीत पध्दतीने खरेदी करण्यात येत असलेल्या मंजुर दराने खरेदी करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाकरिता खरेदी करणेत आलेल्या मंजूर दराने श्री साईनाथ रुग्णालयातील सर्जरी ऑपरेशन थिएटर विभागाकरीता आवश्यक असलेला LED Light Source with Lamp खरेदी करणेस व या खरेदीकामी येणा-या रु.३,४७,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.९२ श्री साईबाबा रुग्णालयातील सी.आर.यु. I विभागाकरीता A.C.T. Machine (Activated Clotting Time Machine) खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I विभागाने दि. ०४/०९/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग Activated clotting Time (ACT) Machine ची मागणी केलेली आहे. सध्या CRU I विभागात ACT Machine उपलब्ध नाही. सदरहू मशिन कार्डियाक शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्णांना जे रक्त द्यावयाचे असते त्याचे प्रमाण कमी-जास्त करण्यासाठी होतो. ज्यामुळे रक्त शरीरात गेल्यावर गोठून जाऊ नये व पर्यायाने त्याचा त्रास रुग्णाला होऊ नये.

सदर Activated clotting Time (ACT) Machine खरेदीकामी अंदाजे रु. १,८०,०००/- (अक्षरी रु. एक लाख ऐंशी हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे.

<u>**मागणी–**</u> श्री साईबाबा रुग्णालयातील सी.आर.यु. I विभागाचे दि. ०४/०९/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०६/०९/२०१४)

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–</u>** श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I विभागात ACT Machine उपलब्ध नाही, सदरहू मशिन कार्डियाक शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्णांना जे रक्त द्यावयाचे असते त्याचे प्रमाण कमी-जास्त करण्यासाठी होतो. त्यामुळे सदरहू मशिन घेण्यास हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे ०१ नग Activated clotting Time (ACT) Machine विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. १,८०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.आर.यु. I विभागाकरीता A.C.T. Machine (Activated Clotting Time Machine) विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५३ श्री साईबाबा रुग्णालयातील ICCU व GICU विभागाकरीता डायलेसिस मशिन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील डायलेसिस विभागाने दि. ०४/०६/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये दोन नग डायलेसिस मशिनची मागणी केलेली आहे. सध्या डायलेसीस विभागात ४ मशिन हे Nipro कंपनीचे असुन ते व्यवस्थित कार्यान्वित आहेत. सदर डायलेसिस मशिन सन २००४ मध्ये ०२, सन २००८ मध्ये ०१ व सन २००९ मध्ये ०१ खरेदी केलेले आहे. परंतु दिवसेंदिवस रुग्णांची संख्या सतत वाढतच आहे, त्यामुळे तेथील ४ मशिनवर कामाचा बोजा वाढतच आहे. मागील वर्षात २०४१ रुग्णांचे डायलेसिस झालेले आहे. एका मशिनवर सरासरी ५०० रुग्णांचे डायलेसिस होते. तसेच ICCU व GICU मधील रुग्ण हे अत्यवस्थ असल्यास ते रुग्ण कॉटवरुन हलवणे व ते डायलेसिस विभागात नेऊन डायलेसिस करणे हे रुग्णांसाठी जास्त त्रासदायक असते. त्यामुळे जर ICCU व GICU मध्ये मशिन ठेवल्यास तेथे रुग्णांचे कॉटजवळ नेऊन डायलेसिस करता येईल त्यासाठी डायलेसिस मशिन खरेदी करणे अत्यावश्यक वाटते, असे मत आहे.

सध्या एक नग डायलेसिस मशिन खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ७,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

<u>**मागणी–**</u> श्री साईबाबा रुग्णालयातील डायलेसिस विभागाचे दि. ०४/०६/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०३/०९/२०१४).

<u>**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छानती, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छानती करुन अनुमान –**</u> अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

<u>**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–**</u> सध्या डायलेसीस विभागात ४ मशिन हे Nipro कंपनीचे असुन ते व्यवस्थित कार्यान्वित आहेत. परंतु दिवसेंदिवस डायलेसिस विभागातील रुग्णांची संख्या सतत वाढतच आहे, त्यामुळे सध्या ICCU व GICU विभागातील अत्यवस्थ रुग्ण व डायलेसिस विभागातील मशिनवरचा ताण कमी होणेसाठी सध्या एक मशिनची आवश्यकता आहे. सदरहू एक नग डायलेसिस मशिन खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ७,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे ०१ नग डायलेसिस मशिन विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ७,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील ICCU व GICU विभागाकरीता ०१ नग डायलेसिस मशिन विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५४ श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता सर्जिकल साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडिक ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२८/०७/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये त्यांना आवश्यक असणा-या सर्जिकल साहित्याची मागणी केलेली आहे. कारण सध्या त्यांचेकडे असलेले सर्जिकल साहित्य हे वापरुन खराब झालेले आहे. सदरचे साहित्य सन २००८-०९ या वर्षात खरेदी केलेले होते. सदरचे साहित्य जुने झाल्यामुळे व वापराने खराब झालेले आहे, त्यामुळे त्यांनी नवीन साहित्यांची मागणी केलेली आहे. सदरचे साहित्य खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी मे. कालेलकर सर्जिकल इंडस्ट्रीज, मुंबई यांचेकडून

दरपत्रक मागविण्यात आलेले होते. त्यांचे दरानुसार सदरचे साहित्य खरेदीकामी खालीलप्रमाणे खर्च येणार आहे.

| Sr. No. | Item Name | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Punch/Ronger, Kerrison, 5mm-40Ald. Up Bite. 18/7” | 2 Pc. | 5,820.00 | 11,640.00 |
| 02. | Punch, Disc. 3mmx10mm. Cloward, Serr. Edges. Str. 18cm/7” | 1 Pc. | 2,845.00 | 2,845.00 |
| 03. | Punch, Disc. 4mmx10mm, Cloward. Serr. Edges. Str. 18cm/7” | 1 Pc. | 2,845.00 | 2,845.00 |
| 04. | Punch, Disc. 5mmx10mm, Cloward, Serr. Edges. Str. 18cm/7” | 1 Pc. | 2,845.00 | 2,845.00 |
| 05. | Punch, Disc. 3mmx10mm. Cloward. Serr. Edges, Ald. Up-45, 18cm/7”. | 1 Pc. | 2,910.00 | 2,910.00 |
| 06. | Punch, Disc. 4mmx10mm. Cloward, Serr. Edges, Ald. Up-45, 18cm/7” | 1 Pc. | 2,910.00 | 2,910.00 |
| 07. | Punch, Disc. 5mmx10mm. Cloward, Serr. Edges, Ald. Up-45, 18cm/7” | 1 Pc. | 2,975.00 | 2,975.00 |
| 08. | Punch, Disc. 3mmx10mm. Cloward, Serr. Edges, Ald. Down-45, 18cm/7” | 1 Pc. | 2,975.00 | 2,975.00 |
| 09. | Punch, Disc. 4mmx10mm. Cloward, Serr. Edges, Ald. Down-45, 18cm/7” | 1 Pc. | 2,975.00 | 2,975.00 |
| 10. | Punch, Disc. 5mmx10mm. Cloward, Serr. Edges, Ald. Down-45, 18cm/7” | 1 Pc. | 2,975.00 | 2,975.00 |
| 11. | Nibbler/Rongeur, Beyer. D/A. 3mm-Jaw. Cvd. 18cm/7” | 5 Pc. | 2,650.00 | 13,250.00 |
| 12. | Fcps., Bone Cutting. S/A. Liston, Aof.20cm/8” | 2 Pc. | 2,175.00 | 4,350.00 |
| 13. | Ccps., Bone Cutting. D/A. Tudor-Edwards Rib cutting SCv. 27cm/10.75”. | 2 Pc. | 3,985.00 | 7,970.00 |
| | **Total Amt. in Rs.** | **20 Pc.** | | **63,465.00** |

वरीलप्रमाणे सर्जिकल साहित्य खरेदीकामी अंदाजे रु. ६३,४६५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी –** श्री साईबाबा रुग्णालयातील Ortho Operation Theater विभागाचे दि. २८/०७/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १६/०८/२०१४)

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत –</u>** श्री साईबाबा रुग्णालयातील Ortho Operation Theater विभागात सध्या त्यांचेकडे असलेले सर्जिकल साहित्य हे वापरुन खराब झालेले आहे. सदरचे साहित्य सन २००८-०९ या वर्षात खरेदी केलेले होते. सदरचे साहित्य जुने झाल्यामुळे व वापराने खराब झालेले आहे, त्यामुळे त्यांनी नवीन सर्जिकल साहित्यांची मागणी केलेली आहे. त्यामुळे नवीन साहित्य खरेदी करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे सर्जिकल साहित्य निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. ६३,४६५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता प्रस्तावात नमुद केलेले सर्जिकल साहित्य विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.६३,४६५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५५ श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Peripheral Nerve Stimulator/ Locator खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि. १३/०८/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये Peripheral Nerve Stimulator/ Locator १ नगाची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे Peripheral Nerve Stimulator/ Locator उपलब्ध नाही. त्यांनी ऑपरेशन थिएटर विभागामध्ये खालील कारणास्तव नवीन मागणी केलेली आहे. "Peripheral Nerve Stimulator/ Locator is very useful in giving peripheral nerve blocks as it identifies the correct location of nerves. Its also used in patient during general anaesthesia to determine the adequancy of muscle relevant used for recovering the patients from general anaesthesia".

सदरहू एक नग Peripheral Nerve Stimulator / Locator खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. १,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>मागणी–</u>** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाचे दि. १३/०८/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०१/०९/२०१४).

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–</u>** जनरल ऑपरेशन थिएटर विभागात Peripheral Nerve Stimulator / Locator सध्या उपलब्ध नाही, त्यामुळे नवीन खरेदी करणे गरजेचे आहे.

तरी वरीलप्रमाणे ०१ नग Peripheral Nerve Stimulator / Locator विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. १,५०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता आवश्यक असलेले ०१ नग Peripheral Nerve Stimulator/ Locator विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५६ श्री साईबाबा रुग्णालयातील टी.एस.आर. या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील टी.एस.आर. या विभागाने दि. २८/०८/२०१४ रोजीचे मागणी पत्रान्वये तीन नग Multiparameter Monitor ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेला Monitor व्यवस्थित काम देत नाही.

हॉस्पिटलमधील अॅडमीट (दाखल) असलेल्या रुग्णांच्या शरीरात होणारे बदल उदा. रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण, रक्तदाब, ई.सी.जी. इत्यादी बदलाचे नियमित निरीक्षण करणेसाठी सदर Multiparameter Monitor चा वापर होत असतो. सदर बदलानुसार डॉक्टर पेशंटवर योग्य ते उपचार पद्धती ठरवु शकतात.

वरीलप्रमाणे Multiparameter Monitor खरेदीकामी अंदाजे एका नगासाठी रक्कम रु. ३,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>मागणी–</u>** श्री साईबाबा रुग्णालयातील टी.एस.आर. विभागाचे दि. २८/०८/२०१३ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०४/०९/२०१४).

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या

किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–</u>** वॉर्डमध्ये अॅडमीट (दाखल) असलेल्या रुग्णांच्या शरीरात होणारे बदल उदा. रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण, रक्तदाब, ई.सी.जी. इत्यादी बदलाचे नियमित करणेसाठी सदर Multiparameter Monitor चा वापर होत असतो. सदर बदलानुसार डॉक्टर पेशंटवर योग्य ते उपचार पद्धती ठरवतात, त्यामुळे वरीलप्रमाणे Monitor खरेदी करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे ०३ नग Multiparameter Monitor विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या एकूण ०३ नगांसाठी अंदाजे खर्च रु. ९,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील टी.एस.आर. या विभागाकरीता आवश्यक असलेले ०३ नग Multiparameter Monitor विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकिय संचालक)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५७ श्री साईनाथ रुग्णालयातील फिमेल मेडीकल वॉर्ड या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील फिमेल मेडिकल वॉर्ड या विभागाने दि. १९/०८/२०१४ रोजीचे मागणी पत्रान्वये एक नग Multiparameter Monitor ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेला Monitor व्यवस्थित काम देत नाही.

हॉस्पिटलमधील अॅडमीट (दाखल) असलेल्या रुग्णांच्या शरीरात होणारे बदल उदा. रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण, रक्तदाब, ई.सी.जी. इत्यादी बदलाचे नियमित निरीक्षण करणेसाठी सदर Multiparameter Monitor चा वापर होत असतो. सदर बदलानुसार डॉक्टर पेशंटवर योग्य ते उपचार पद्धती ठरवु शकतात.

वरीलप्रमाणे Multiparameter Monitor खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ३,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>मागणी –</u>** श्री साईनाथ रुग्णालयातील Female Medical Ward विभागाचे दि. १९/०८/२०१३ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ११/०९/२०१४).

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त

कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–** वॉर्डमध्ये अॅडमीट (दाखल) असलेल्या रुग्णांच्या शरीरात होणारे बदल उदा. रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण, रक्तदाब, ई.सी.जी. इत्यादी बदलाचे नियमित करणेसाठी सदर Multiparameter Monitor चा वापर होत असतो. सदर बदलानुसार डॉक्टर पेशंटवर योग्य ते उपचार पद्धती ठरवतात, त्यामुळे वरीलप्रमाणे Monitor खरेदी करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे ०१ नग Multiparameter Monitor विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ३,००,०००/- चे खर्चास असावी.

**निर्णय क्र.९८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील फिमेल मेडीकल वॉर्ड या विभागाकरीता आवश्यक असलेले ०१ नग Multiparameter Monitor विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५८ श्री साईबाबा रुग्णालयात न्युरो आय.सी.यू. व नवीन सर्जिकल आय.सी.यु. या विभागासाठी लागणारे सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हे रुग्णालय सन २००६ साली कार्यान्वित झालेले आहे. सदर रुग्णालयात Neuro अपघात कक्ष इ. विभाग आहे तसेच सिटी स्कॅन, एम. आर. आय. हे तपासणी विभाग देखील कार्यरत आहे. साईबाबा रुग्णालयात बाहेरील रुग्णालयांच्या तुलनेत अत्यल्प दरात उपचार होतात. त्यामुळे परिसरातील तसेच दुरवरुन इतर जिल्ह्यातील रुग्ण या रुग्णालयातील सुविधाचा फायदा घेतात. शिवाय सदरचे रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वित आहे. सदरचे रुग्ण देखील पुर्णपणे मोफत उपचार घेत असतात. त्यामुळे दिवसेंदिवस सदर रुग्णालयात रुग्णांची दिवसेंदिवस संख्या ही वाढतच आहे. सध्या आपणाकडे गंभीर किंवा अवघड शस्त्रक्रिया (Complicated) झाल्यानंतर रुग्णांना आय.सी.सी.यु. मध्ये ठेवणे गरजेचे असते. सध्या आपणाकडे ICCU - 11 बेड, GICU – 11 बेड, CRU I - 20 बेड, CRU III – 10 बेड, Neuro ICCU (Recovery) - 8 बेड असे चार आय.सी.सी.यु. आहेत, असे एकूण 60 बेडचे 5 ICCU आहे.

परंतु रुग्णांचे वाढत्या संख्येमुळे ते देखील कमी पडत आहे. रुग्णालयात सध्या इतर ठिकाणी नविन आय.सी.सी.यु. तयार करणेसाठी जागा नाही तसेच नवीन रुग्णालय तयार होऊन कार्यान्वित होणेस किती कालावधी लागेल

याबाबत देखील अंदाज नाही. तेव्हा सध्य परिस्थितीत Ortho O.T. मधील Recovery Ward एकत्र करुन त्या ठिकाणी १०-१२ बेडचे आय.सी.सी.यु. बनविता येऊ शकेल. याकामी संस्थानचे बांधकाम विभागास पत्र देऊन सदर बिल्डींगमध्ये काही दुरुस्ती करुन नवीन आय.सी.सी.यु. बनविता येऊ शकेल. रुग्णालयाचे मागणीवरुन बांधकाम विभागाने प्रस्ताव सादर करुन तेथील बांधकाम, तोडफोड, दुरुस्ती, रंगकाम इ. कामी रु.३,३६,०००/- चे खर्चास दि. १२/०६/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ५२५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. त्या व्यतिरिक्त सदर आय.सी.सी.यु. साठी खालीलप्रमाणे सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदी करावे लागणार आहे. त्यासाठी अंदाजे रु. ५३,०५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Item Description | Qty. | App. Rate per in Rs. | Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Tray-Instrument with cover. SS. 22G. 27cm x 18cm / 11” x 7” | 08 Pc. | 530.00 | 4240.00 |
| 02. | Fcps., Sponge, Foerster. Str. 20cm/8” | 12Pc. | 575.00 | 6900.00 |
| 03. | Bowl, SS. 26G. 9.5cm/3.75” (Wall Small) | 12Pc. | 50.00 | 600.00 |
| 04. | Needle Holder, Mayo-Hanger. 15cm/6” | 12 Pc. | 530.00 | 6360.00 |
| 05. | Surgical/ Dressing Scissors, BS. Str. 15cm/6” | 08 Pc. | 375.00 | 3000.00 |
| 06. | Fcps., Dsctg. Sup. 3mm, 1x2 Tth. 15cm/6” | 12 Pc. | 420.00 | 5040.00 |
| 07. | Fcps., Dsctg. 3mm. Serr. Tips. Sup. 15cm/ 6” | 12 Pc. | 400.00 | 4800.00 |
| 08. | Fcps., Artery. Sp-Wells. Cvd. 15cm/6” | 12 Pc. | 410.00 | 4920.00 |
| 09. | Fcps., Artery. Mosquite. Cvd. 12.5cm/5” | 12 Pc. | 370.00 | 4400.00 |
| 10. | Fcps., Dsctg. Sup. 3 mm. 1x2Tth. 15cm/6” | 02 Pc. | 420.00 | 840.00 |
| 11. | Fine Operating / Eye Scissors, SS. Str. 1 2.5cm/5” | 02 Pc. | 735.00 | 1470.00 |
| 12. | Metzenbaum Scissors, Cvd. 18cm/7” | 02 Pc. | 685.00 | 1370.00 |
| 13. | Needle Holder, Debakey. 15cm/6” | 02 Pc. | 545.00 | 1090.00 |
| 14. | Fcps., Aartery, Mosquito. Cvd. 12.5cm/5” | 04 Pc. | 370.00 | 1480.00 |
| 15. | Fcps., Artery,. Mosquito, Str. 12.5 cm/5”. | 02 Pc. | 370.00 | 740.00 |
| 16. | Retractor, Double hook. Blunt. 16cm/6.25” Alsofor Tracheostomy. | 02 Pc. | 290.00 | 580.00 |
| 17. | Fcps., Tracheal Dilating. Two | 02 | 905.00 | 1810.00 |

| Sr. No. | Item Description | Qty. | App. Rate per in Rs. | Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| | Prongs. Trosseau/ Laborde. 15cm/6” | Pc. | | |
| 18. | Retractor, Single hook. Sharp. 16cm/6.25”. Aslo for Tracheostomy. | 02 Pc. | 240.00 | 480.00 |
| 19. | Retractor, Senn-Miller/ Kilner. Sharp. D/E. 16cm/6.25” | 04 Pc. | 390.00 | 1560.00 |
| 20. | Suction Canula No. 02 (Metal) | 02 Pc. | 685.00 | 1370.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | **53,050.00** |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** रुग्णांची वाढती संख्या व उपचाराची गरज इ. चा विचार करता नविन आय.सी.सी.यु. तयार करता येईल व त्यासाठी मशिनरी / उपकरणे / फर्निचर, किरकोळ साहित्य यांची खरेदी करणेस हरकत नाही.

तरी श्री साईबाबा रुग्णालयात नवीन Surgical ICU व Neuro ICU या विभागाकरिता लागणारे मशिनरी / उपकरणे / फर्निचर व किरकोळ साहित्य विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. ५३,०५०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयात न्युरो आय.सी.यू. व नवीन सर्जिकल आय.सी.यु. या विभागासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मशिनरी / उपकरणे / फर्निचर व किरकोळ साहित्य विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.५३,०५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५९ श्री.राजेंद्र सोपान सदाफळ यांना वैद्यकीय उपचाराकरीता आगाऊ रक्कम मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. राजेंद्र सोपान सदाफळ, प्रसादालय विभाग (मदतनीस) हे स्वत: ब्लड कॅन्सर या रोगाने आजारी आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ. मेहरोत्रा यांचेकडे प्राथमिक तपासणी केली असता ब्लड कॅन्सर या आजाराचे निदान झालेले आहे. त्यामुळे त्यांनी पुढील उपचारासाठी दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल ऍन्ड रिसर्च

सेंटर, पुणे येथे दि.08/10/2014 रोजी दाखल झालेले आहेत. तेथील उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी त्यांना 04 Chemotherapy च्या सायकल घेणेबाबत सुचविलेले आहे 01 सायकलसाठी अंदाजे रु.300000/- खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार एकुण 04 Chemotherapy साठी अंदाजे रु.1200000/- खर्चाचे इन्स्टीमेंट दिलेले आहे.

परंतु श्री. राजेंद्र सोपान सदाफळ यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती हालाकिची आहे व तेच त्यांच्या घरातील कर्ता पुरुष असल्यामुळे इतकी मोठी रक्कम ते उपलब्ध करु शकत नाही. तरी वरील रक्कम बघता त्यांनी सुरवातीस 3,00,000/- इतकी आगाऊ रक्कम मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल ऍ़न्ड रिसर्च सेंटर, पुणे हे संस्थानच्या मान्यता यादीत आहे व त्यांना संस्थानच्या डॉक्टरांनी शिफारस केलेली आहे. तसेच त्यांच्या अर्जावर मा. कार्यकारी अधिकारी साहेब सांनी तपासून त्वरीत सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.13-14/01/2012 रोजीचे सभेत निर्णय क्र. 67 अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे. येथुन पुढे वैद्यकीय उपचारासाठी आगाऊ रक्कम मिळणेबाबतचे प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात येऊ नये असे ठरले. त्यामुळे त्यांना सदरील नियमानुसार आगाऊ रक्कम देता येणार नाही. परंतु विशेष बाब म्हणून दयावयाचे झाल्यास त्यास मा. त्रिसदस्य समितीची मान्यता घ्यावी लागेल. तथापि श्री सदाफळ यांना तातडीचा उपचार घेणे गरजेचे आहे. तेव्हा मा. त्रिसदस्य समितीचे निर्णयास आधिन राहून तुर्तास रु. 300000/- आगाऊ रक्कम देता येईल. सदर उपचाराची बीले त्यांनी संस्थानमध्ये परतावा मिळणेकामी सादर केल्यानंतर वरिल प्रमाणे आगाऊ रक्कम जमा नावे करता येईल.

मान्यता मिळाल्यानंतर सदरचा डी.डी. दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल ऍ़न्ड रिसर्च सेंटर, पुणे यांचे नावे देण्यात येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर पुढील निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. व्यवस्थापन समितीच्या दि.13-14/01/2012 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 67 अन्वये यापुढे वैद्यकीय उपचारासाठी आगाऊ रक्कम मिळणेबाबतचे प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात येऊ नये, असे ठरलेले आहे. त्यामुळे उपरोक्त प्रस्तावावर एक विशेष बाब म्हणून धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित आहे, परंतु सध्या अस्थायी समिती अस्तित्वात असल्यामुळे धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नाही, त्यामुळे सदरचा विषय तुर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------

<u>**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**</u>

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ श्री साईबाबा संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेतील साठवण तलाव व जलशुध्दीकरण यंत्रणेची क्षमता वाढविणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र मौजे कनकुरी ग्रामपंचायत हद्दीमध्ये आहे. साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र इ. चे कामे १९९२ साली पुर्ण करण्यात आलेली आहेत. सदरहु योजना ही मौजे कनकुरी, मौजे पिंपळवाडी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी सुयुक्त योजना आहे. सदरहू योजनेव्दारे मंदिर परिसर, संस्थान भक्तनिवासस्थाने, स्टाफ क्वॉर्टर, श्री साई प्रसादालय, मौजे कनकुरी व मौजे पिंपळवाडी येथे शुध्दीकरण केलेल्या पाण्याचा पुरवठा केला जातो.

**पाणी पुरवठा योजनेचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे:-**

| अं.नं. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| ०१ | पाणी पुरवठा योजना कधीपासून कार्यान्वित करण्यात आली | सन १९९२ |
| ०२ | महिन्याला इरिगेशन विभागाकडुन घेण्यात येणारे सरासरी पाणी | १२,५९,१०,३३३ लिटर्स. |
| ०३ | साठवण तलावाची क्षमता | ३३२ एम.एल. |
| ०४ | साठवण क्षमता किती दिवस पुरते (सर्वसाधारण गर्दीचे काळात) | ४० ते ४५ दिवस |
| ०५ | साठवण तलावात उन्हाळयात अथवा गर्दीच्या काळात किती दिवस पाणी पुरते. | ३० ते ३५ दिवस |
| ०६ | २४ तासात अंदाजे सरासरी किती दिवस पाणी पुरवठा करण्यात येतो. | ३८ ते ४० लाख लिटर्स. |

कनकुरी साठवण तलाव येथे संस्थानचे तीन साठवण तलाव आहेत. सदरहू तलावाची एकुण क्षमता ही ३३२ एम.एल. इतकी आहे. सर्वसाधारण गर्दीचे काळात व पावसाळा तसेच हिवाळयात सदरहु साठवण तलावातील पाणी हे साधारणत: ४० ते ४५ दिवस पुरते. गर्दीचे काळात, उत्सव कालावधीत व उन्हाळयामध्ये साठवण तलावातील पाणी हे ३० ते ३५ दिवस पुरते. संस्थान साठवण तलावाचे लगतचे स्थानिक शेतक-यांचे विहीरी व बोअरवेलची संख्या मोठया प्रमाणात आहे त्यामुळे साठवण तलावातील पाणी गळतीचे प्रमाणही मोठया प्रमाणावर वाढलेले आहे.

संस्थानचा दैनंदिन पाणी वापर मोठया प्रमाणात वाढलेला आहे. मात्र फिल्टर प्लँट क्षमता पुर्वीचीच असल्याने शुध्द केलेल्या पाण्याचा पुरवठा कमी पडत आहे. संस्थानची वाढीव पाण्याची गरज लक्षात घेता नविन फिल्टर प्लँटची आवश्यकता निर्माण झाल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे मार्गदर्शन मागितले असता, त्यांनी २००७-२००८ मध्ये स्केलेटन प्रोजेक्ट तयार करुन योजनेचे अंदाजे रु. ३,२६,५६,१८७/- मात्रचे इस्टिमेट दिले होते.

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि. २८/०७/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६२७ नुसार मान्यता घेवुन त्यांनी मागणी केलेली २% रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे भरणा करण्यात आली.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६/०३/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २५२ नुसार साठवण तलावावरील नविन फिल्टर प्लँट उभारणी व नविन वितरकाबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सर्व्हेनुसार व त्यांनी सादर केलेल्या नविन डी.एस.आर प्रमाणे सदर प्लॅन इस्टिमेट नुसार योजनेची एकुण किंमत रु. ७,४८,६५,५४०/- मात्रचे तत्वत: मान्यता देण्यात येवून संस्थान मार्फत कन्सलटंटची नियुक्ती करुन काम करणेसाठी प्रस्ताव मागविण्यात आले.

३) मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०३/०१/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १४ नुसार फिल्टर प्लँट उभारणी कामी आलेल्या निविदा सादर कर्त्यांशी चर्चा/वाटाघाटी करण्यात येवून किर्लोस्कर कन्सलटंट प्रा.लि. पुणे यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली.

४) मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२९१ नुसार किर्लोस्कर कन्सलटंट प्रा.लि. पुणे यांची कन्सलटंट यांची सेवा समाप्त करुन इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि. पुणे यांची कन्सलटंट म्हणून नेमणूक करणेस व उपरोक्त कामांसाठी सर्व निविदा रद्द करुन नव्याने निविदा मागविण्यात याव्या असे ठरले.

५) मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०५/०९/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्रं.७१५ नुसार वाढीव क्षमतेच्या स्वयंचलित जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे, ओव्हर हेड टँक उभारणे, जलवाहिन्या टाकणे, इ. कामांसाठी येणारे रु.२८.१६ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि. पुणे यांना सल्ला सेवा पुरविण्याकरीता प्रकल्पाच्या किमतीचे ३% अधिक सर्व्हिस टॅक्स इतकी फी आदा करण्यात यावी असे ठरले.

६) त्यानुसार दि. ११/१०/२०१० रोजीचे वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार विहीत मुदतीत खालीलप्रमाणे सिलबंद निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१. Megha Engineering & infrastructure Ltd. Hydrabad.
२. Pratibha Industries Ltd. Mumbai.
३. Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd. Kolhapur.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेत उपरोक्त तीन (०३) निविदा सादरकर्त्यांनी सादर केलेल्या सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडून त्यावर चर्चा तथा वाटाघाटीने निर्णय होणेसाठी सादर करण्यात आलेल्या होत्या त्यावर निर्णय क्रं.४ नुसार सविस्तर चर्चा होवून संस्थानला वाढीव पाणी पुरवठा होणेसाठी लोकवर्गणीच्या १०% रक्कम भरुन या योजनेसाठी अनुदान मंजुर करुन घेणेसाठी मा. मंत्री महोदय यांची तारीख घेवून त्यांचे समवेत मा.विश्वस्त समितीने बैठक लावून चर्चा करावी व अनुदान मंजुर करुन घेणेसाठी प्रयत्न करावे असे ठरले.

त्यानंतर तात्कालीन मा. मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र राज्य यांची तात्कालीन मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा. कार्यकारी अधिकारी यांनी भेट घेवून संस्थानकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना करणेबाबत चर्चा केली.

७) मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७४५ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत निळवंडे धरण उद्भव घेवून पुन्हा नव्याने सर्वेक्षण, अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेसाठी २% Preparation Charges भरावे लागणार असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना तुर्त १० लाख रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली.

८) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८५१ अन्वये संस्थानचे नविन जलशुध्दीकरण केंद्र उभारणी, नविन पाईपलाईन, नविन ओव्हर हेड टँक, पंपिंग मशिनरी, वाढीव साठवण तलाव निर्मिती इ. कामांचा रु. १३४.२४ कोटी मात्रचे खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापि यावर सविस्तर चर्चा होवून संस्थानसाठी वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी थेट निळवंडे धरणांतून पाणी आणण्याचे नियोजन आहे. याकामी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा असे ठरले.

९) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५८९ अन्वये निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन आणणे तसेच पाणी पुरवठा योजना राबविणे याकामी आवश्यक संस्थान हिस्सा रक्कम रु. १९६.९३ कोटी व पाणी आरक्षणसाठी आवश्यक रु. १८३.९३ कोटी असे एकुण ३८०.८६ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावित बाब धोरणात्मक व मेजर फायनान्शीयल असल्यामुळे समिती त्यावर निर्णय घेवू शकत नाही. यासाठी, सदरहू योजना का आवश्यक आहे, याबाबतची सर्व कारणे नमूद करुन हा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा काय? अशा मार्गदर्शनपर सुचना व आदेश मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत यावा व मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.

याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे सिव्हील ऐॅप्लिकेशन दाखल करणेबाबत संस्थानचे विधी विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

संस्थानचा WTP हा १९९२ साली तयार करणेत आला असून तो ६.६० MLD हया क्षमतेचा आहे. तसेच पाईपलाईन्स हया २२ वर्ष जुन्या झालेल्या आहेत. सध्या संस्थान परिसरातील इमारतींना कनकुरी येथील साठवण तलावातुन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. कनकुरी साठवण तलाव ते ओहर हेड टॅंक, नविन भक्तनिवासस्थान, साईआश्रम भक्तनिवास, व्दारावती, रुग्णालये, श्री साईप्रसादालय, व साईधर्मशाळा इ. करीता पाणी पुरवठा करणारी मुख्य जलवाहीनी ही कालबाहय झालेली असून सदरच्या पाईपलाईनव्दारे पुर्ण दाबाने पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही. पुर्ण दाबाने पाणी पुरवठा करावयाचा झाल्यास सदरची पाईपलाईन लिकेज होवून संस्थान परिसराचा पाणी पुरवठा खंडीत होण्याची शक्यता आहे.

तसेच श्री साईबाबा महासमाधी शताब्धी वर्ष दि. ०१/१०/२०१७ ते दि. १९/१०/२०१८ या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. त्यावेळी श्रींचे दर्शनाकरीता येणारे भक्तांमध्ये फार मोठया प्रमाणावर वाढ होणार आहे. त्यावेळी साईभक्तांना पुरेशा प्रमाणात शुध्द पाण्याचा पूरवठा करणे गरजेचे आहे.

**अ)** सध्याचे साठवण तलावामध्ये HDPE Geomembrane Fabrics Sheet टाकणेसाठी येणा-या अंदाजे रु. १०.६५ कोटी मात्रचे खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची मान्यता घेण्यात यावी व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असे दि.१२ एप्रिल, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २८५ अन्वये ठरले आहे. त्यानुसार मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे सिव्हील अॅप्लिकेशन विधी विभागामार्फत दाखल करण्यात आलेले आहे.

**ब)** सन २०१० मध्ये वाढीव क्षमतेच्या स्वयंचलित जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे, ओव्हर हेड टॅंक उभारणे, जलवाहिन्या टाकणे इ. कामांसाठी रु. २८.१६ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. आता चालू डी.एस.आर. दरानुसार सदर अपेक्षित खर्चात वाढ होणार आहे. त्यानुसार मे. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा. लि. पुणे यांचेकडुन डब्लू.टी.पी., पंपिंग मशिनरी, रायझींग मेन, डिस्ट्रीब्युशन, इ.एस.आर. एक्सप्रेस फिडर, इ. कामांचा समावेश असलेल्या नविन पाणी पुरवठा योजनेसाठी दि. १८/१०/२०१३ रोजीचे प्राथमिक ढोबळ अंदाजपत्रकानुसार एकुण रुपये ४८ कोटी मात्र इतका अपेक्षित खर्च कळविला होता. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Description | Amount in Rs. Crores |
|---|---|

| | |
|---|---|
| Cost of Tender floated in Oct. 2010 | 28.16 |
| Increase due to DSR rates | 8.45 |
| Pumping machinery and Rising Main | 5.00 |
| Express Feeder | 2.50 |
| **Total-** | **44.11** |
| Contingencies 5% | 2.20 |
| Design and PMC 3% | 1.32 |
| Technical sanction 0.25% | 0.11 |
| **Total Block cost** | **47.74** |
| **Say R/O-** | **48.00** |

**क)** तसेच साठवण तलावाची क्षमता वाढविणेकामी आर.सी.सी. बॅलंसिंग टँकचे बांधकाम करणेसाठी संस्थान मालकीचे खालील जागांचा विचार करता येईल.

| अं.नं. | गांव | गट नंबर | क्षेत्र | एकुण क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ०१ | मौजे निमगांव को-हाळे. | २२१ | ३ हे. २६ आर | ६ हे. ५६ आर |
| ०२ | मौजे निमगांव को-हाळे. | २४५ | ३ हे. ३० आर | |
| ०३ | मौजे निमगांव को-हाळे. | २३४ | ० हे. ८४ आर | ३ हे. २५ आर |
| ०४ | मौजे निमगांव को-हाळे. | २३५/३ | २ हे. ४१ आर | |

अथवा वाढीव साठवण तलावासाठी शेतीमहामंडळाकडील खालील जागांचा विचार करतां येईल.

| अं.नं. | गांव | गट नंबर | क्षेत्र | एकुण क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ०१ | मौजे निमगांव को-हाळे. | २३४ | ५ हे. ६१ आर | ५ हे. ६१ आर |
| ०३ | मौजे कनकुरी | ८८,१०७ | ५ हे. ९९ आर | ५ हे. ९९ आर |

वरीलपैकी गट नं. २२१ व २४५ मधील जागा ही विस्तीर्ण स्वरुपाची असल्याने त्याठिकाणी वाढीव साठवण तलावाच्या बांधकाम करणे योग्य होईल असे मत आहे. त्याठिकाणी आर.सी.सी बांधकामांमध्ये साठवण तलावाचे काम केल्यास मोठया क्षमतेच्या साठवण तलावाची निर्मीती करता येईल.

उपरोक्त नमुद अ प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरहू प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे सिव्हील अॅप्लिकेशन दाखल विधी विभागामार्फत दाखल करण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त ब नुसार वाढीव पाणी पुरवठा प्रकल्प हाती घेणेस तसेच क प्रमाणे वाढीव साठवण तलावाची निर्मिती करणेचे कामांस मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रकल्पासाठी मेँ. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांचेकडुन यापुर्वी सविस्तर प्लॅन इस्टिमेटसह डी.पी.आर. (Detailed Project report) तयार करणेत आलेले आहे. पुन्हा नव्याने मेँ. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांचेकडुन सदरचे काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी. यास अधीन राहून उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ श्री साईबाबा संस्थानकडे नियुक्ती असलेल्या उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता निवासव्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम 2004 मधिल तरतूद :-** 21 (1) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, 1961, च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल :-

झ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे; अशी तरतूद आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम 2004 मधिल कलम 13 (4) नुसार संस्थान विश्वस्त व्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमाने तिचे कर्तव्ये व काम पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकारी व्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणुक करता येईल अशी तरतूद आहे.

**मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णयः**

**1.** मा. त्रीसदस्य समितीचे दि.13/12/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्र.948.

**2.** मा. त्रीसदस्य समितीचे दि.09/10/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र.893.

**प्रस्ताव:-** मा. कार्यकारी अधिकारी यांचे व्यतिरिक्त संस्थानकडे उप कार्यकारी अधिकारी यांची नियुक्त करणेत आलेली आहेत. सध्या त्यांना निवासव्यवस्थेकामी 970.00 चौ.फुट क्षेत्रफळाचे फ्लॅट उपलब्ध करुन देण्यात

आले आहे. उप कार्यकारी अधिकारी यांचेकरीता निवासस्थानांचे बांधकाम करणे आवश्यक आहे. यापुर्वी मा.कार्यकारी अधिकारी यांचेसाठी संस्थानचे सर्व्हे नं.107,108 व 109 पैकी मधील जागेत 2020 चौ.फुट क्षेत्रफळाचा बंगला निवासासाठी बांधणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे उप कार्यकारी अधिकारी यांचेकरीता बंगल्याचे बांधकाम करणेस हरकत नाही. अशी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समवेत समक्ष चर्चा झाली आहे.

महाराष्ट्र शासनाचे, सामान्य प्रशासन विभागाचे निर्णय क्र. शानिवा-1509/प्र.क्र.320/09/23-अ, दि.19/04/2011 अन्वये गट अ श्रेणीतील अधिकाऱ्यांकरीता 1750 चौ.फुट क्षेत्रफळाचे शासकीय निवासस्थाने अनुज्ञेय ठरविण्याचा निर्णय झालेला आहे.

सदरहू बंगल्याचे बांधकाम संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.107,108 व 109 पै. मधील जागेत (सध्याचे रोज गार्डन) करता येईल महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र. टिपीएस-1609/2777/ प्र.क्र.346/ 09/ नवि-9 दि.08/07/2010 अन्वये धर्मदाय नोंदणीकृत संस्थांच्या धर्मशाळा/ भक्तनिवास इमारतींना अतिरिक्त 0.50 चटई क्षेत्र निर्देशांक प्रदान करणेबाबत निर्णय झालेला आहे. सदर बंगल्याचे बांधकाम करणेसाठी सदरहू शासन निर्णयानुसार नमूद शासकीय विभाग व शिर्डी नगरपंचायत यांचेकडून बांधकाम परवानगी घेणेबाबत कार्यवाही करता येईल.

मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. 107, 108 व 109 पैकी मधील जागेमध्ये उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता निवास व्यवस्थेसाठी बंगल्यांचे बांधकाम करणेस तसेच या बांधकामासाठी आर्किटेक्ट यांचेकडून बांधकामासाठी आराखडे अंदाजपत्रके तयार करुन घेता येईल असा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.13/12/2013 रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील नि.क्र.948 अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी उपलब्ध जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन निर्णय घेण्यात यावा असे ठरले."

तथापी वेळेअभावी मा. अध्यक्ष सो, यांचेमार्फत पहाणी होऊ शकली नाही. त्यामुळे दि.06/10/2014 रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांनी सदर ठिकाणी पहाणी केली, त्यावेळी खालिलप्रमाणे उपस्थिती होती.

1. मा. श्री. राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी,
2. मा. श्री. आप्पासाहेब शिंदे उप कार्यकारी अधिकारी,
3. श्री. आर.बी. आहेर उप कार्यकारी अभियंता,
4. श्री.एस.एम.जोरी, उप अभियंता,

मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.107,108 व 109 पैकी मधील जागेमध्ये उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता बंगल्याचे बांधकाम करणेसाठी पाहणी वेळी

तेथिल विद्यमान साईसहवास क्र.२ इमारतींचे उत्तरेकडील मोकळ्या जागेत सुमारे 1500 चौ. फुट बांधकाम करणेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत यावा अशी चर्चा झाली.

मौजे शिर्डी येथील संस्थानचे सर्व्हे नं.107,108 व 109 पैकी मधील जागेत उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता बंगल्याचे बांधकाम करणेसाठी तत्वतः मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. त्रीसदस्य समितीचे दि.09/10/2014 रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.893 अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार सदरहू कामी आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांचेकडून प्रस्तावित बंगल्याचे नकाशे व थ्री डी डिझाईन तयार करुन घेणेत आले आहे. त्यानुसार सदर बांधकामाचे क्षेत्रफळ 2313.40 चौरस फुट (215.00 चौरस मीटर) इतके होत आहे. त्यासाठी आर्किटेक्ट यांनी दि.05/11/2014 रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणेचे अंदाजपत्रक सादर केले आहे.

| **Sr. No.** | **Details** | **Amount (Rs.)** |
|---|---|---|
| 1) | Total Builtup Area = 215.00 Sqm. X Rs.16,140/- Per Sqm. | 34,70,100/-. |
| | Compound Wall & Watchman Cabin Lump Sum | 5,00,000/-. |
| | **Total Cost of Bunglow (1):** | **39,70,100/-.** |
| 2) | Professional Fees @ 2% of Rs.39,70,100/-. | 79,402/-. |
| | Add Service Tax @ 12.36% of Rs.79,402/-. | 9814/-. |
| | **Total Professional Fees (2):** | **89,216/-.** |
| | **Total Project Cost = 1 +2 :** | **40,59,316/-.** |
| In words Rs.: Forty lakhs fifty nine thousand three hundred sixteen only. | | |

विषयांकीत प्रकल्पाचे बांधकामासाठी उपरोक्तप्रमाणे आर्किटेक्ट फीसह एकुण रु.40,59,316/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी याकामी येणारे अंदाजे रु.40,59,316/- मात्रचे खर्चास तसेच सदरहू कामी येणारा खर्च हा रु.10 लक्ष पेक्षा जास्त असल्याने त्यास मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगी मिळणेकामी संस्थानचे विधी विभागामार्फत अर्ज सादर करणेस मा. त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.९८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, तसेच याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी. यास अधीन राहून उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ विश्वशांती साई सेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट, देशमुखी, जिल्हा नलगोंडा (आंध्रप्रदेश) यांचे साई वृदांवनम क्षेत्र १३ एकर ८ गुंठे संस्थानला दान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री नारायण स्वामी, चेअरमन तथा फाऊंडर विश्वशांती साई सेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट, देशमुखी जिल्हा नलगोंडा यांनी त्यांचे ट्रस्टची साई वृदांवनम येथील १३ एकर ८ गुंठे जागेसह श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी साठी दान स्वरुपात सर्व हक्कासह देऊ केलेली आहे. सदरहु जागेस भेट देऊन पुढील कार्यवाही संस्थान मार्फत करणेबाबत दि. २०/७/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

विश्वशांती साई सेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट यांनी देऊ केलेले क्षेत्र मोठे आहे. याबाबत धोरणात्मक निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.३/८/२०१४ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. यावर निर्णय क्र. ६२७ खालील प्रमाणे झालेला आहे.

*'यावर सविस्तर चर्चा होऊन, विश्वशांती साई सेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट, देशमुखी जिल्हा नलगोंडा (आंध्रप्रदेश) यांनी संस्थानला देणगी दाखल देऊ केलेल्या जागेची समिती सदस्य किंवा प्रतिनिधी यांनी समक्ष पाहणी करुन निर्णय घेतील, असे ठरले.'*

उपरोक्त प्रमाणे झालेल्या निर्णयानुसार सदरहु जागेची पाहणी करणेसाठी संस्थानचे वतीने खालील अधिकारी, कर्मचारी यांनी दिनांक १/११/२०१४ रोजी विश्वशांती साई सेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट, देशमुखी, जिल्हा नलगोंडा (आंध्रप्रदेश) ट्रस्टचे "साई वृदांवन" येथे भेट दिली.

०१. मा.श्री.राजेन्द्र जाधव, कार्यकारी अधिकारी तथा सदस्य

०२. मा.श्री.आप्पासाहेब शिंदे, उपकार्यकारी अधिकारी

०३. श्री. आर.बी.आहेर, उप कार्यकारी अभियंता

०४. श्री. अनिल थोरात, लिपीक- टंकलेखक, (भूसंपादन कक्ष)

यावेळी विश्वशांती साई सेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट, देशमुखी, जिल्हा नलगोंडा (आंध्रप्रदेश) येथे ट्रस्टचे खालील विश्वस्त, अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | वाय. शोभाराणी | २. | एम. हनुम्ंतराव |
| ०३. | एन. उपेन्द्रराव | ४. | एस. पांडूरंगराव |
| ०५. | पी. गोपीचंद | ०६. | एन. पद्मजा |
| ०७. | आर.विजयलक्ष्मी | ०८. | आशाराम सोनी. |
| ०९. | पी. विष्णू वर्धन | १०. | वाय.एस.एल.गिरीजा. |
| ११. | कलावती सिंग | १२. | एस. पद्दमावती. |

तसेच या ट्रस्टचे चेअरमन तथा फाऊंडर श्री. नारायण स्वामी हे पदयात्रेने भद्राचलम, सिम्हाचलम येथे गेलेले असल्याने त्यांची भेट होऊ शकली नाही.

विजयवाडा येथुन ३२ कि.मी. अंतरावर रामोजी फिल्मसीटी जवळ देशमुखी (आंध्रप्रदेश) गावामध्ये विश्वशांती साई सेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट यांचा "साई वृदांवन" नावाने आश्रम असून या आश्रमाची स्थापना दिनांक २४/८/२००० रोजी करण्यात आलेली आहे. सुमारे तेरा एकर आठ गुंठे परिसरात हा आश्रम वसलेला असून याठिकाणी पुढील प्रमाणे उपक्रम राबविले जातात.

- साईनाम संकिर्तण
- नित्य अन्नप्रसाद
- गोशाळा

तसेच

- गरीब व गरजु विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह चालविणे. त्यांना शैक्षणीक मदत पुरविणे.
- गरजु रुग्णांना वैद्यकीय मदत करणे.
- वृध्दाश्रम चालविणे

या प्रकारची सामाजीक कार्यही या आश्रमामार्फत चालविली जातात.

"साई वृदांवन" येथे श्री साईबाबांचे मंदिर असुन तेथे अखंड संकिर्तण तसेच भजन किर्तनाचे कार्यक्रम सुरु असतात. परिसरातील गरीब व गरजु विद्यार्थ्यांसाठी मोफत राहण्याची व जेवणाची सोय केलेली आहे. समाजातील निराधार महिलांसाठी महिला वृध्दाश्रम चालविले जाते. याठिकाणी पारंपारीक पध्दतीचे छोटेखानी प्रसादालय असून तेथे वस्तीगृहातील विद्यार्थी, वृध्दाश्रमातील महिला व दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना मोफत जेवणाची व्यवस्था केली जाते.

समक्ष चर्चेअंती तेथील विश्वस्तांनी सांगीतले की येथे भविष्यात-

- भव्य मंदिर,
- २०० खोल्या असलेले भक्त निवास
- अत्याधुनिक प्रसादालय
- १००० व्यक्तींसाठी वृध्दाश्रम
- विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह व वाचनालय
- शाळा
- अद्ययावत रुग्णालय
- गोशाळा

इत्यादी प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे.

तसेच "साई वृदांवन" श्री साईबाबा संस्थानला देणगी दाखल दिल्यानंतर याठिकाणी सध्या सुरु असणारे उपक्रम पुर्वीप्रमाणे सुरु राहावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

विश्वशांती साई सेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट यांचे "साई वृदांवन" जागेसह संस्थानला देणगी देणेबाबत सांगीतले आहे की,

१. देणगी दिलेल्या जमीनीवर तसेच मंदिरावर आमचा कोणत्याही प्रकारचा हक्क सांगणार नाही.

२. सदर परिसरात किंवा मंदिरात श्री नारायण स्वामी किंवा इतर कोणाचाही फोटो अथवा नाव लावण्याची मागणी करणार नाही.

३. देणगी देणात येणा-या जागेवर तसेच मंदिरावर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा नाही.

४. "साई वृदांवन" आश्रमाचे कारभारात आम्ही किंवा आमचे कुटूंबातील कोणीही व्यक्ती कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करणार नाही.

५. संस्थानने केवळ जमीनच नव्हे तर आश्रमात चालणारे इतर उपक्रमासह उदा. मंदिर, वृध्दाश्रम, वस्तीगृह, गोशाळा व उर्वरीत परिसरासह देणगी दाखल स्विकारावे अशी आमची इच्छा आहे.

६. देणगी देण्यात येणारी जमीन, मंदिर तसेच इतर मिळकतीचे कागदपत्रे श्री नारायण स्वामी हे स्वत: संस्थानकडे देतील.

विश्वशांती साई सेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट, देशमुखी जिल्हा नलगोंडा ट्रस्टचे "साई वृदांवन" आश्रम येथील १३ एकर ८ गुंठे जागेसह देणगी दाखल देऊ केलेल्या जमीनीचे कायदेशीर कागदपत्र, त्यांचे मार्फत चालू असलेले उपक्रम याबाबत लेखी स्वरुपात माहिती प्राप्त झालेनंतर सविस्तर प्रस्ताव समितीचे सभेपुढे सादर करुन निर्णय घेता येईल, असे मत आहे.

मा. त्रिसदस्य समितीचे माहितीस्तव सादर.

**निर्णय क्र.९८५** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सर्व कायदेशीर बाबी तपासून फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ संस्थानकडील चल-अचल मालमत्तेसाठी स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) निर्माण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानकडील चल-अचल मालमत्तेसाठी स्वंतत्र मालमत्ता विभाग नवीन करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधि‍ियम-2004 मधील-

कलम-3 पोटकलम (2) प्रमाणे नियत दिवशी, पुर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची स्थावर किंवा जंगम अशी सर्व मालमत्ता (सर्व मत्ता, हक्क, दायित्व व बंधो यांसह) या अधि‍ियमिावये संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे हस्तांतरीत व विहीत होईल आणि समितीच्या वतीने कार्यकारी अधिकाऱ्यास

त्या दिवसापासू‍ त्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा व तिचे व्यवस्थापा करण्याचा हक्क असेल.

कलम-4 पोटकलम (3) प्रमाणे कार्यकारी अधिकारी कलम 3 अवये संस्थान विश्वस्तव्यवस्थे‍ो विहीत केलेल्या संपूर्ण स्थावर व जंगम मालमत्तेची, प्रत्येक मालमत्तेचे तपशिलवार वर्णा व अदमासे किंमत दर्शविणारी सुची तयार करील आणि तीची प्रत, नियत दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत धर्मदाय आयुक्त आणि प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व याय विभाग यांच्याकडे सादर करील. मालमत्तांची मूळ सूची संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यालयामध्ये कायमस्वरुपी जता करु‍ ठेवण्यात येईल.यांची जबाबदारी कार्यकारी अधिका-यांवर सोपविण्यात आलेली आहे.मात्र या अभिलेखाचे योग्य रीतीने जतन करणे व नोंदी वेळोवेळी अद्यावत करणे अशी व्यवस्था केंद्रीभूतरीत्या अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले आहे.

शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांच्या संख्येत दिवसोंदिवस वाढ होत आहे. साईभक्तांना मुलभूत सेवा-सुविधा पुरविणेकामी संस्थानला मोठया प्रमाणात जागेची आवश्यकता आहे. याकरीता संस्थानो शिर्डी व परिसरातील गावांमधील जमिनी भूसंपादनाने तसेच खरेदी घेतलेल्या आहेत. या सर्व मालमत्तेचे व्यवस्थापा व संरक्षण करणे, त्यासाठी काही अतिक्रमण होऊ नये यासाठी आवश्यक ती संरक्षण व्यवस्था उभारणे, माहिती फलक लावणे तसेच संस्थानो पुर्वी भाडेपट्टयावर दिलेल्या मालमत्तेचे आवश्यक असल्यास प्रचलीत दराने नुतणीकरण करणे अथवा गरजेनुसार त्याच्या उचित प्रयोजनासाठी विनियोग करणे इत्यादी कामाचे महत्व व व्याप्ती ही मोठया प्रमाणात असल्याने सध्याची यंत्रणा याबाबी सक्षमपणे हाताळण्यास सक्षम नसल्याचे निदर्शनास येते.

संस्थानमालकीच्या जमिनींमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. या सर्व मिळकतीचे रेकॉर्ड विधी विभागाकडे आहे. विधी विभागाकडे संस्थानचे सर्व कायदेविषयक कामे केली जातात. त्यामुळे संस्थानच्या मिळकतीबाबत योग्य निये‍ाजन करणे, देखभाल ठेवणे, वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे, त्याबाबत असलेल्या अडीअडचणी दुर करणे, याबाबतची माहिती अद्यावत ठेवणे, संस्थानच्या चल-अचल मालमत्तेची माहिती मा.व्यवस्थापा समिती व मा.कार्यकारी अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे. या सर्व कामकाजाकरीता स्वतंत्र विभाग असणे आवश्यक वाटते.

याकरीता संस्थानमध्ये मालमत्ता विभाग (Estate Department) या नावाने (किंवा वरिष्ठ सुचवतील त्या नावाने) नविन विभाग सुरु करता येईल. याकरीता एक मुल्य निर्धारक/ विभाग प्रमुख, एक जमिन मोजणीदार, एक वरिष्ठ लिपीक, एक लिपिक व एक मदतनिस यांची आवश्यकता भासेल. मालमत्ता विभागाचा विभागप्रमुख म्हणून जमिनींबाबतची, महसुल विभागाची माहिती

असलेला अथवा मुल्यनिर्धारण विभागाकडील वर्ग -2 दर्जाच्या अधिका-यांची नियुक्ती करता येईल. व मदती करीता एक जमिन मोजणीदार, एक वरिष्ठ लिपीक, एक लिपिक व एक मदतनिस यांची नेमणूक करता येईल.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधि िनियम-2004 मधील कलम 3(2) व कलम 4(3) व (4) अवये अशा मालमत्तेच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी मा.कार्यकारी अधिकारी जबाबदार असल्यामुळे सदर विभागाचा विभाग प्रमुख मा.कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली काम करील.

तरी 1) संस्थानच्या चल-अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस व त्या विभागाकरीता एक विभाग प्रमुख एक जमिन मोजणीदार,एक वरिष्ठ लिपीक, एक लिपिक व एक मदतनिस यांची नेमणूक करणेस मान्यता असावी. निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.९८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या चल-अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच या विभागाकरीता एक विभागप्रमुख, एक जमीन मोजणीदार, एक वरीष्ठ लिपीक, एक लिपीक व एक मदतनिस इ. आवश्यक कर्मचारी संस्थान कर्मचा-यांमधून देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन )

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.९८७ मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** त्रिसदस्य समितीच्या दि.०३.०८.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६१ अन्वये डॉ.प्रभाकर राव, प्रभारी वैद्यकिय संचालक यांनी डॉ.हरीश बजाज व डॉ.गौरव वर्मा यांचेवर दोषारोपपत्र बजावले असून त्यावर समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

Upon considering the articles of charges and statement of imputations, there appears to be grave misconducts committed by Dr.Harish Bajaj and Dr.Gaurav Verma, prima facie. By now the enquiry is underway and Enquiry Officer was authorized to serve the notice vis-à-vis to serve charge sheet.

The charge sheet is now served on the delinquents. The Committee bereby resolves, considering the nature of enquiry, seriousness of the charges, dereliction of duties and misconduct, prima facie committed by Dr.Harish Bajaj and Dr.Gaurav Verma, both the delinquent-doctors should be kept under suspension till further orders. During suspension period they will be entitled for subsistence allowance as per rules. During suspension period their headquarters shall be Shirdi.

The committee's decision shall be implemented through the Executive Officer Shri Rajendra Jadhav, who is responsible to serve suspension order immediately on both the doctors and report the compliance to the Committee.

The Enquiry Officer to continue the further enquiry and submit his final report, as early as possible. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

----------------------------------------------------------------------------------------------------

(२) मा.उच्च न्यायालयाने तदर्थ त्रि-सदस्य समितीचे गठण केलेले आहे व या समितीमध्ये कार्यकारी अधिकारी यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. कार्यकारी अधिकारी हे संस्थानचे कार्यक्षेत्रावरील मुख्य अधिकारी म्हणून पूर्णवेळ क्रियाशील सदस्य आहेत. उपसमितीपेक्षा वरिष्ठ समितीने/ तदर्थ त्रि-सदस्यीय समितीने घेतलेल्या ठराव/ निर्णयांची अंमलबजावणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही कार्यकारी अधिकारी यांची आहे व त्यांनी ती पार पाडावयाची आहे. जर का अशी अंमलबजावणी करत असताना काही अडचण येत असेल तर त्याविषयी सविस्तर विषय त्यांनी तदर्थ त्रि-सदस्य समितीच्या येऊ घातलेल्या बैठकीमध्ये ठेवावा, जेणेकरुन त्यावर त्रि-सदस्य समिती निर्णय घेईल. यापुढे कुठल्याही विषयाचा प्रस्ताव त्रि-सदस्य समितीसमोर आणण्यापूर्वी कार्यकारी अधिकारी यांनी तो तपासून पहावा व तो प्रस्ताव बरोबर असल्याबाबत दाखला द्यावा. ई-टेंडरींग उघडण्याची प्रक्रिया स्वतः कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या समक्ष पुर्ण करावी व ई-टेंडरींग बरोबर झालेले आहे, असा दाखला द्यावा.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कार्यकारी अधिकारी कक्ष)

----------------------------------------------------------------------------------------------------

**वरील निर्णय क्र.९२४ ते ९८७ सर्वानुमते घेण्यात आले.**

**यानंतर रात्री ०६.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- **XXX** | स्वाक्षरीत/- **XXX** | स्वाक्षरीत/- **XXX** |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (शशिकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी